**अहवाल क्रमांक : १९३**

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# चौदावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी
विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०२२

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# चौदावा अहवाल

## पंचायती राज समिती

(सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि. स. स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि. स. स

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे) वि. स. स,

(४) डॉ. राहूल पाटील वि. स. स.

(५) श्री. अनिल पाटील, वि. स. स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि. स. स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि. स. स.

(८) श्री. शेखर निकम, वि. स. स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि. स. स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि. स. स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि. स. स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि. स. स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि. स. स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि. स. स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि. स. स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि. स. स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि. स. स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, वि. स. स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार , वि. स. स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि. प. स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि. प. स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि. प. स.

(२५) श्री. सुरेश धस, वि. प. स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि. स. स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि. प. स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि. स. स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि. प. स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

( १ ) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

( २ ) श्री. विलास आठवले, उप सचिव

( ३ ) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

( ४ ) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

( ५ ) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ. संजय कुटे, वि. स. स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि. स. स. यांची "समिती सदस्य" म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि. स. स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.
(५) ॲड. राहुल कुल, वि. स. स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि. स. स.
(७) डॉ. देवराव होळी, वि. स. स.
(८) * * * रिक्त.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि. स. स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि. स. स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि. स. स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि. स. स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.
(१६) श्री. भारत भालके, वि. स. स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि. स. स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि. स. स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि. स. स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.
(२२) * * * रिक्त.
(२३) श्री. विक्रम काळे, वि. प. स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि. प. स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि. प. स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि. प. स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.
(२९) * श्री. किशोर दराडे, वि. प. स.
(३०) * * श्री. निलय नाईक, वि. प. स.
(३१) * * श्री. निरंजन डावखरे, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि. प. स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि. प. स.व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि. प. स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चौदावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेस दिनांक ०४,०५ व ०६ ऑक्टोबर, २०१८ रोजी भेट देऊन श्री. विश्वजीत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी आणि सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने दिनांक १४ डिसेंबर, २०२१ व १५ डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती जयश्री मुखर्जी, अप्पर मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती नीलिमा केरकेट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. जे. पी. गुप्ता, प्रधान सचिव, कृषी व पशुसंवर्धन विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग, श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. प्रविण पुरी, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. श्रीधर डुबे-पाटील, सह सचिव, महसुल विभाग, श्री. माणिक गुट्टे, सह सचिव, कृषी व पशुसंवर्धन विभाग, श्री. दिलीप गावडे, सह सचिव, आरोग्य विभाग, श्री. विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. नि. अं. पांढरकामे, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. श्रीकांत दे. लोंढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती सरिता बांदेकर-देशमुख, उप सचिव, कृषी विभाग, श्री. का. गो. वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. पो. द. देशमुख, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. वसंत माने, उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. बि. पु. घोडके, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. ए. का. गागदे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. पांडुरंग वाबळे, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण आयुक्त कार्यालय, अहमदनगर, डॉ. विजय वृंदेवए, सहसंचालक, आरोग्य विभाग, श्री. माधव नागरगोजे, व श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर

संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०२२.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | अहमदनगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात | १ |
| (२) | दोन | सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जिल्हा परिषदेचा निधी अखर्चित राहील्याबाबत | २८ |
| (३) | तीन | समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधा व साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत | ३३ |
| | | परिशिष्ट - "अ"<br>शासन निर्णय व परिपत्रके | |
| | | परिशिष्ट - "ब"<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## अहमदनगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ०४ ते ०६ ऑक्टोंबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चा केली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी समितीच्या निदर्शनास खालीलप्रमाणे आणलेले मुद्दे :—

**१) कृषी विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत** - ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या तुषार सिंचन, गळीत तसेच कडधान्य, कृषी यांत्रिकीकरण यासह विविध योजना होत्या. जिल्हा परिषदेमार्फत या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असल्यामुळे शेवटच्या घटकापर्यंत शेतकऱ्यांना लाभ मिळत होता, परंतु या योजना राज्याच्या कृषी विभागाकडे वर्ग झालेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे विकासाच्या योजना नाहीत. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्याच्या कृषी विभागाकडील योजना जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे वर्ग करण्यात याव्यात. जेणेकरुन सदर योजनांचा लाभ ग्रामीण भागातील अल्पभुधारक शेतकऱ्यांना देता येईल.

**२) नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजुरीबाबत** - जिल्ह्यामध्ये १६ लक्ष गोवर्गीय व महिषवर्गीय जनावरे असून सुमारे २३ लक्ष लिटर दूध रोज संकलित केले जाते. बहुतांश कुटुंबांची उपजीविका दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. तथापि जिल्ह्यात पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी आहे. जिल्हा परिषदेने स्वनिधीतून एकूण २५ दवाखाने सुरू केली होती. त्यापैकी १४ दवाखाने समायोजित झाली आहेत. परंतु अद्यापही ११ दवाखाने समायोजित झालेली नाहीत. तसेच पशुधन संख्येनुसार अद्यापही ११४ दवाखान्यांचा अनुशेष आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन होणे आवश्यक आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त जनावरांना चांगल्याप्रकारे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याकरिता नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजुर करावीत. तसेच अस्तित्वात असलेल्या श्रेणी-२ दवाखान्यांचा दर्जावाढ करण्यात यावा. जेणेकरुन तज्ञ पशुवैद्यकांच्या सेवा सर्व पशुपालकांना उपलब्ध होऊ शकतील.

कोल्डकॅबिनेटबाबत - मे. गस्टो फार्मा. औरंगाबाद यांचेकडून सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये पशुदवाखान्याच्या लसमात्रा साठवणुकीसाठी २६ कोल्ड कॅबिनेट रुपये १८७०००/- या दराने खरेदी करण्यात आले होते. सदर खरेदी पशुसंवर्धन खात्याच्या दरकरारावर करण्यात आली होती. पुरवठादाराने जे कोल्ड कॅबिनेट पुरवठा केला ते दरकरारातील अटी व शर्तीप्रमाणे नसल्याचे आढळून आले. मुख्यत्वे सदर कोल्ड कॅबिनेट बाह्य विद्युत पुरवठयाशिवाय १८ तास बॅकअप देत नाहीत. त्यामुळे त्यामध्ये लसमात्रा साठवणे योग्य ठरत नाही.

जिल्हा परिषदेने दिनांक १९ मार्च २०१८ च्या सर्वसाधारण सभेमध्ये मे. गस्टो फार्मा. यांना काळ्या यादीत टाकणेबाबत ठराव करून मा. आयुक्त, पशुसंवर्धन यांना सादर केलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत या पुरवठादार कंपनीला काळ्या यादीत टाकलेले नाही, तसेच जिल्हा परिषदेची रक्कम पुरवठादाराने परत केलेली नाही. याबाबत आपले स्तरावरुन संबंधित विभागाला उचित कार्यवाही करणेबाबत शिफारस करण्यात यावी.

**औषध पुरवठ्यांबाबत –** अहमदनगर जिल्हा दुध उत्पादनात अग्रेसर असून बहुतांश शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन पशुपालन व दुग्धव्यवसाय आहे. शासनाकडून व जिल्हा परिषदेकडून पशुधनाच्या औषधी खरेदीकरिता तरतुदी उपलब्ध केल्या जातात. परंतु पशुसंवर्धन खात्याने केलेल्या भावबंद दरकराराप्रमाणे पुरवठादार औषधे वेळेवर पुरवठा करत नाहीत.

सन २०१७-२०१८ मध्ये पुरवठा आदेश दिलेल्या ७ पुरवठादारांनी रुपये ७५५५०८७/- एवढ्या रकमेच्या औषधांचा अद्यापही पुरवठा केलेला नाही. त्यामुळे योजना राबवितांना अडचणी येतात. सदर कंपन्यांवर/पुरवठादारांवर नियमानुसार कारवाई करावी.

मागील वर्षी लाळखुरकुत रोगप्रतिबंधक लसमात्रांचा शासनाकडून वेळेत पुरवठा झाला नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेला सेस निधीतून काही प्रमाणात लसमात्रा खरेदी कराव्या लागल्या. यावर्षी साखर कारखाने सुरू होण्यापूर्वी लाळखुरकुत लसमात्रा मिळाव्यात म्हणजे रोग उद्‌भवणार नाहीत.

**३) जिल्हा परिषदांना जमीन महसूल उपकर व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी असलेला थकबाकीचा निधी मिळणेबाबत**

अहमदनगर जिल्हा परिषदेस जमीन महसूल उपकर अनुदान व वाढीव उपकर अनुदान रकमेपोटी शासनाकडून रक्कम रुपये ४ कोटी ४४ लाख तसेच मुद्रांक शुल्कापोटी रक्कम रुपये ४ कोटी ३७ लाख इतकी रक्कम येणे बाकी आहे. सदरची रक्कम न मिळाल्याने जिल्हा परिषदेस स्वनिधीमध्ये समाविष्ट केलेल्या योजनांची अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती मिळून जमीन महसूल उपकर अनुदान व वाढीव उपकर अनुदान रुपये ६ कोटी ६६ लाख व मुद्रांक शुल्कापोटी रुपये ४ कोटी ३८ लाख असे एकूण जमीन महसूल उपकर रुपये ११ कोटी १० लाख व मुद्रांक शुल्क ८ कोटी ७५ लाख एवढे अनुदान अहमदनगर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत असलेल्या पंचायत समितींना मिळणेस आपल्यामार्फत शिफारस करावी.

**४) वृध्द कलावंत निवडीचा अहमदनगर जिल्ह्याला दिलेला वार्षिक इष्टांक वाढवून मिळणेबाबत** -

राज्य शासनाने राज्यातील वृध्द साहित्यीक व कलावंतांना मानधन देण्याची योजना सुरू केली आहे. यामध्ये अहमदनगर जिल्ह्यासाठी प्रतिवर्षी कमाल ६० पात्र कलाकारांची निवड करण्याचा इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. प्रत्यक्षात या योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित राहतात. सिंधुदुर्ग, भंडारा, हिंगोली सारख्या छोट्या जिल्ह्यासाठी (सुमारे दहा लक्ष लोकसंख्या) प्रतिवर्षी ६० कलाकारांचे उद्दीष्ट व ४५ लक्ष ग्रामीण लोकसंख्या असलेल्या अहमदनगर सारख्या मोठ्या जिल्ह्यालाही ६० चे उद्दीष्ट जिल्ह्यातील कलावंतांसाठी अन्यायकारक आहे. जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून, हा जिल्हा आकारमानाने व ग्रामीण लोकसंख्या पाहता राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यासाठी वृध्द साहित्यीक व कलावंताच्या निवडीचा इष्टांक ६० ऐवजी त्यामध्ये वाढ करून तो किमान २५० करावा.

**५) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना संरक्षक भिंत बांधकामासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत नवीन लेखाशीर्ष निर्माण करून निधी उपलब्ध होणेबाबत** -

अहमदनगर जिल्ह्यात ग्रामीण भागात एकूण ३५९९ प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेमार्फत सुरू आहेत. या सर्व शाळांसाठी शाळा खोल्या उपलब्ध आहेत. यापैकी राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग व जिल्हा रस्त्यांच्या लगत असणाऱ्या शाळांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या लहान मुलांच्या जीवितास धोका संभवतो. अहमदनगर जिल्ह्यातील अशा २१०६ शाळांना संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषद शाळांच्या भोवतीच्या जागा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या असल्याने व तेथे संरक्षक भिंत नसल्याने अशा जागेवर अतिक्रमणे होतात. त्याचप्रमणे संरक्षण भिंत नसल्यामुळे शाळा परिसर, शाळा पडवी या उघड्या जागेचा वापर परिसरातील ग्रामस्थ अवैध, व्यवसायिक लोक सुट्टीच्या काळात रात्री गैरवापर करतात. त्याचबरोबर शाळा खोल्यामधील संगणक व इतर मौल्यवान शैक्षणिक साहित्य चोरीस जाण्याचे प्रकार घडतात.

जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्यांसाठी संरक्षण भिंतीकरिता शासनाच्या कोणत्याही योजनेतून निश्चित स्वरुपाचा निधी उपलब्ध होत नाही. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळेसाठी महत्वाचा आहे. सदर वस्तुस्थितीचा विचार करता जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्यांच्या संरक्षण भिंतीसाठी जिल्हा नियोजन अंतर्गत कायम स्वरुपी नवीन लेखाशिर्ष निर्माण करून निधी उपलब्ध होणेबाबत आपल्यामार्फत शिफारस करावी.

**६) आरोग्य सेवा पुरविणेबाबत येणाऱ्या अडचणी** - अहमदनगर जिल्ह्यात आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी-३०, आरोग्य सेवक (महिला) ४२८, आरोग्य सेवक (पुरुष) ३१९ व इतरही पदे थोड्याफार प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे जिल्ह्यात आरोग्य सेवा पुरवण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. तरी सदरची पदे तत्काळ भरणेबाबत आपल्यामार्फत शिफारस व्हावी.

**नवीन मंजूर प्राथमिक अरोग्य केंद्र–** जिल्ह्यात नवीन मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्र व निर्लेखनपात्र प्राथमिक आरोग्य केंद्र असे एकूण २२ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येक ७ कोटी रुपयेप्रमाणे १५४ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

नवीन मंजूर आरोग्य उपकेंद्र - नवीन मंजूर आरोग्य उपकेंद्र ४३ पैकी २५ आरोग्य उपकेंद्र व इतर १९ उप केंद्रांसाठी असे एकूण ४४ आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ७० लाख रुपये प्रमाणे ३० कोटी ८० लक्ष रुपयांची आवश्यकता आहे.

रुग्णवाहिका - जिल्ह्यातील एकूण ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ३२ ठिकाणी रुग्णवाहिका उपलब्ध नाहीत. या अनुषंगाने या नवीन रुग्णवाहिका उपलब्धतेसाठी २ कोटी २४ लक्ष रुपयांची आवश्यकता आहे.

**७) ग्रामसेवक संवर्ग व इतर संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत** - अहमदनगर जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण १३१२ ग्रामपंचायती असून त्याकरिता ग्रामसेवक या संवर्गाची ९५२ पदे मंजूर आहेत. ८५३ पदे भरलेली असून ९९ पदे रिक्त आहेत. तसेच ग्रामविकास अधिकारी या संवर्गाची २५३ पदे मंजूर असून त्यापैकी २३२ पदे भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची एकूण १२० पदे रिक्त आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. कामकाजामध्ये

गती निर्माण करण्याकरिता सदरची १२० पदे भरणे आवश्यक आहेत, तसेच सध्या ग्रामसेवक पद भरतीस सन २०१५ पासून मान्यता नसल्याने सदरची पदे सतत रिक्त होत आहेत. अंगणवाडी पर्यवेक्षिका लिपिकवर्गीय संवर्ग, पशुधन पर्यवेक्षक इत्यादी संवर्गाची बरीच पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ पदाच्या भरतीस शासनाची मान्यता मिळणेकरता आपल्यामार्फत शिफारस होणे आवश्क आहे.

**८) संत गाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियानामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याबाबत** - संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात शासन निर्णय दिनांक ४ जून २०१६ मधील निकषानुसार जिल्हास्तर, विभागीय स्तर, राज्यस्तर अशा विविध स्तरांवर बक्षीस योजना लागू करण्यात ओलेली आहे. यामधून प्रथम, द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती राज्य स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरतात. बहुतांश ग्रामपंचायती या लोकसंख्येने मोठ्या असतात. अशा ग्रामपंचायती हागणदारीमुक्त करताना अधिक काम करावे लागते. त्यांना त्या प्रमाणात बक्षिसाची रक्कम तुटपूंजी ठरते. मोठ्या ग्रामपंचायतीसाठी बक्षिसाची रक्कम मोठी असल्यास स्वच्छतेचा कार्यक्रम पुढे नेण्यास प्रोत्साहन मिळेल. सबब शासनास संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत बक्षिस देताना लोकसंख्येच्या प्रमाणात उदा. २००० लोकसंख्येसाठी, २००० ते ५००० लोकसंख्येसाठी व ५००० वरील लोकसंख्येसाठी बक्षिसाच्या रकमा त्या त्या प्रमाणात वाढवून देण्याबाबत आपल्यामार्फत शिफारस व्हावी.

**९) जिल्हा परिषदेकडील समाजकल्याण विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे आकृतीबंधाबाबत**- जिल्हा परिषदेमध्ये पूर्वी वर्ग-२ चे समाजकल्याण अधिकारी होते. त्यांचेकडे फक्त जिल्हा परिषदेच्या सेसमधील योजना राबविण्याची जबाबदारी होती. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या आकृतीबंधामधून पद निर्माण करून देण्यात येत होते. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्य शासनाच्या काही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या व जिल्हा परिषद सेस व राज्य शासनाच्या योजना यासाठी समाजकल्याण अधिकारी वर्ग-१ हे पद निर्माण केले व राज्य शासनाचे काही कर्मचारी जिल्हा परिषदेकडे वर्ग केले. सदरचे कर्मचारी राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणीसाठी आहेत. जिल्हा परिषदेच्या सेसच्या योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे. समाजकल्याण विभागाने योजनानिहाय राबवण्यासाठीचा कर्मचारी वृंद काढून घेतला आहे त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सेस योजना कोणत्या स्टाफमार्फत राबवाव्या हा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य शासनाचे कर्मचारी जिल्हा परिषदेकडे काम करण्यास इच्छूक नसतात त्यामुळे त्यातील ५० टक्क्यापेक्षा जास्त जागा रिकाम्या राहतात व त्यामुळे समाजकल्याण विभाग आपल्या खात्याकडील योजना राबविण्यासाठी अधु झालेला आहे. तरी जिल्हा परिषदेकडील समाजकल्याण विभागाकरिता शासकीय योजना व जिल्हा परिषद सेसचा योजनानिहाय आकृतीबंध तयार करून वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिल्यास जिल्हा परिषद सेसमधून दिला जाणारा २० टक्के निधी शासनाकडून प्राप्त होणारा दलितवस्तीचा निधी, तसेच राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सर्व योजनांचा निधी खर्च होऊ शकेल. तशी शिफारस आपल्यामार्फत करण्यात यावी.

**१०) जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत –** सदर वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करत असताना त्या समुपदेशनाने करण्यात येतात. त्यामध्ये प्रशासकीय बदली अगोदर करावी किंवा विनंती बदली अगोदर करावी याबाबत शासनाचे बदल्यांचे निर्णयामध्ये स्वयंस्पष्टता नाही. त्यामुळे प्रशासकीय बदल्या केल्यानंतर विनंती बदल्या करण्यास अडचण निर्माण होते. परंतु शासनाचे ग्राम विकास विभागाचे बदल्यांबाबतचे दिनांक १५ मे २०१४ रोजीच्या निर्णयानुसार समानीकरण करणे बाबतही निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे एकदा प्रशासकीय बदल्या केल्यानंतर त्यामध्ये समानीकरण धोरण राबविल्यामुळे नंतर अशा कर्मचाऱ्यांच्या विंनती बदलीबाबतचा विचार करता येत नाही. त्यामुळे अशा वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या काही प्रमाणात बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना प्रदान करणेबाबत आपलेमार्फत शासनाचे संबंधित विभागास शिफारस करावी.

**११) अनुकंपा भरती करणेबाबत** - शासनाचे ग्राम विकास विभागाच्या धोरणानुसार जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असणारे कर्मचारी दिवंगत झाल्यानंतर त्याचे जवळचे वारसास अनुकंपा नोकरी देणे बाबतचे शासनाचे धोरण आहे. तथापि सद्यस्थितीत फक्त भरती प्रक्रिया राबवित असतानाच १० टक्के अनुकंपा भरती करण्याबाबत शासनाने धोरण स्वीकारलेले आहे. वास्तविक पाहता कर्मचारी दिवंगत झाल्यानंतर त्या घरातील कर्ता व कमावता माणूस गेल्याने संपूर्ण कुटूंब निराधार होते. त्यामुळे अशा कुटुंबांना तातडीने हातभार लागावा म्हणून शासनाने ही योजना सुरू केलेली आहे. तथापि राज्य शासनाची भरती दोन, चार वर्षे होत नाही व परिणामी अनुकंपा सदरी नियुक्ती द्यावयाची कर्मचाऱ्यांची भरतीही रिक्त जागा असतानाही केली जात नाही. काही प्रकरणांमध्ये जास्त दिवस होवूनही अनुकंपा भरती न झाल्याने अनुकंपा नोकरीसाठी जवळचे वारस पात्र असूनही जादा वय झाल्यामुळे त्या कुटुंबाला अनुकंपा नोकरीचा लाभ मिळत नाही. अशा कुटुंबातील आर्थिकदृष्टया परवड होते. तरी याबाबत विनंती करण्यात येते की, अनुकंपा नियुक्ती जस जशी पदे रिक्त असतील त्याप्रमाणे करण्यात यावी व ज्यांचे जादा वय झालेले आहे त्यांना विशेष बाब म्हणून वय क्षमापित करून अनुकंपा नियुक्तीचा लाभ देणेबाबत संबंधित विभागास आपलेमार्फत शिफारस करावी.

**१२) नगरपालिकेकडील थकित शिक्षण कर जिल्हा परिषदेला मिळणेबाबत** - नगरपालिका हद्दीत प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकेची असून, ज्या नगरपालिका शिक्षणाची जबाबदारी पूर्ण करीत नाहीत, त्याऐवजी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हा परिषद पूर्ण करीत असल्याने शासनाने विहित दराने नगरपालिकेने प्राथमिक शिक्षण वर्गणीची रक्कम दरवर्षी जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे आवश्यक आहे. याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. आज अखेर सुमारे रुपये ११ कोटी २२ लक्ष थकित वर्गणी नगरपालिकेकडे आहे. सदर रक्कम जिल्हा परिषदेला मिळण्यासाठी शिफारस करण्यात यावी.

**१३) जिल्हा परिषदेतील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना राज्य स्तरावरील गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतनवाढ देणेबाबत -**

शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णयानुसार राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत काम करणाऱ्या वर्ग- ३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची ( ग्रामसेवक व शिक्षक वगळता) गुणवंत कर्मचारी म्हणून दरवर्षी राज्यस्तरावरुन प्रत्येक जिल्हा परिषदेमधून निवड करून त्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार केला जातो. ग्रामसेवक व शिक्षक यांना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतनवाढ एकरकमी रक्कम मिळते. त्याच धर्तीवर जिल्हा परिषदेकडील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतनवाढ मिळण्यासाठी आपल्यामार्फत शिफारस व्हावी, अशी विनंती आहे.

**१४) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात होत असलेल्या कपातीबाबत** - ग्रामीण भागात जलसंपदा विभागामार्फत शेती, पिण्याचे पाणी यासाठी जो पाणी पुरवठा केला जातो, त्यासाठी पाणीपट्टी आकारुन वसुली केली जाते. शेतकरी, ग्रामपंचायत व इतर संस्थांकडून पाणीपट्टी वसुली करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची आहे. त्यासाठी जिल्हा परिषद जबाबदार नाही व जिल्हा परिषद जबाबदार असलेबाबत कोणत्याही अधिनियमात तरतूद नाही. या उलट जलसंपदा विभागाकडून शेतीसाठी पाणी, पिण्यासाठी पाणी इ. करिता ग्रामीण भागात वसुल होणाऱ्या पाणीपट्टीमधून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १५० अन्वये पाणीपट्टीपैकी २० टक्के रक्कम जिल्हा परिषदेला देणे या तरतुदीनुसार बंधनकारक आहे. जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यापासून ते सन २०१० पर्यंत अशा प्रकारे २० टक्के पाणीपट्टी, सेस, जलसंपदा (तत्कालिन पाटबंधारे विभाग) मार्फत जिल्हा परिषदेकडे नियमितपणे जमा करण्यात येत होता, परंतु या अधिनियमाच्या तरतुदीच्या विसंगत जलसंपदा विभागाने जिल्हा परिषदेकडे जमा होणाऱ्या पाणीपट्टी सेसमध्ये मोठया प्रमाणात कपात सुरू केली आहे. ही कपात करण्यात येऊ नये अशी विनंती आहे.

१५ ) राज्य शासनाच्या ज्या योजना १२३ खाली जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाल्यानंतर कोणत्याही स्तरावरुन त्याचे देयक अदा झाले तरी जिल्हा परिषदेला मिळणारे ४ टक्के अभिकरण शुल्क, जिल्हा परिषदेला मिळणेसंदर्भात आपल्या स्तरावरुन शिफारस करण्यात यावी. या वरील विषयासंदर्भात राज्य स्तरावरील सचिवांची साक्ष घेण्यात येईल. असे समितीने विशद केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला भेट दिली असता अहमदनगर जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यासोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी संदर्भात कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबत नविन पशुवैद्यकिय दवाखाने मंजुरी, जिल्हा परिषदेला जमिन महसुल कर व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी असलेला थकबाकीचा निधी, वृध्द कलावंत निवडीचा अहमदनगर जिल्ह्याला दिलेला वार्षिक इष्टांक वाढवून मिळणे बाबत, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंत बांधणेबाबत, आरोग्य सेवा, ग्रामसेवक संवर्ग व इतर संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामधील मार्गदर्शक सुचनामध्ये बदल करणे बाबात, समाजकल्याण विभागातील वर्ग - ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे आकृतीबंधाबाबत, जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग - ३ कर्मचा-यांच्या बदल्यांनबाबत, अनुकंपाभरती करण्याबाबत, नगरपालिकेतील थकीत शिक्षण कर जिल्हा परिषदेला मिळणे बाबत, जिल्हा परिषदेतील वर्ग-३ व वर्ग - ४ कर्मचा-यांना राज्यस्तरावरील गुणवंत्त कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतन वाढ देण्याबाबत, जिल्हा परिषदेच्या उत्त्पन्नात होत असलेल्या कपातीबाबत, जिल्हा परिषदेला मिळणारे ४ टक्के अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळणे संदर्भात उपरोक्त विषयासंदर्भात संबधित विभागाची नेमकी भूमिका काय आहे व याबाबत केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

**कृषि विभाग - कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत.**

७३ व्या घटना दुरुस्ती नुसार जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे नवीन योजना राबविणेसाठी येणे अपेक्षित होते. मात्र जिल्हा परिषदेकडील ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजना शासनाच्या कृषी विभागाकडे वर्ग झाल्या. त्यानंतर कृषी यांत्रिकीकरणाची योजना ही देखील शासनाच्या कृषी विभागाकडे देण्यात आली. तसेच गळीत धान्य विकास कार्यक्रम, तृणधान्य विकास कार्यक्रम, ऊस विकास कार्यक्रम, सधन कापूस विकास कार्यक्रम व मका विकास कार्यक्रम अमंलबजावणीसाठी जिल्हा परिषदेस निधी प्राप्त होत नाही.

त्याच प्रमाणे जिल्हा परिषदेकडील कृषी निविष्ठा परवाना देण्याचे परवाना अधिकारी म्हणून असलेले अधिकार (किटकनाशके - दि. २४ नोव्हेंबर २०१७, बियाणे दि. ६ जानेवारी २०१८ व रासायनिक खते दि. ५ मार्च २०१८ पासून) काढून घेण्यात आलेले आहेत.

उक्त नमूद योजना जिल्हा परिषदेकडे राबविण्यास देणे राज्य शासनाच्या अखत्यारीतील असल्याने या संदर्भातील कार्यवाही शासन स्तरावरुन होणे अपेक्षित आहे.

कृपया, उपरोक्त खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**पशुसंवर्धन विभाग - नवीन पशुवैद्यकिय दवाखाने मंजुरी.**

१. जिल्ह्यातील २२६ व फिरते प. वै. द श्रे १ असे एकूण २२७ पशुवैद्यकीय संस्थाव्दारे, पशुधनास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापना व स्थाननिश्चिती बाबत चा शासन निर्णय. १ जुलै २०११ मधील अटी शर्ती नुसार जिल्ह्यात सध्या १५१ दवाखान्यांचा अनुशेष आहे. सन २०११-१२ पासून आज अखेर अहमदनगर जि. प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ऑगस्ट, २०२१ अखेर २११ नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापनाबाबतचे प्रस्ताव खात्यामार्फत सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रलंबीत आहेत.

२. जि. प. सेस योजने मधून सुरू करण्यात आलेल्या ११ दवाखान्यांचे शासनाकडे समायोजना बाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडील पत्र. जा. क्र. पंस /ता. १ /६८७/२०१७, दि. ७/१०/२०१७ अन्वये मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचेकडे पाठविण्यात आले आहेत.

३. सन २०११ पासून आज अखेर जिल्ह्यातील ५५ श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करण्यासाठीचे प्रस्ताव पशुसंवर्धन विभाग जि. प. अहमदनगर कडून मा. आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांचेकडे सादर करणेत आलेले आहेत.

पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करणे किंवा पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ चे दर्जावाढ करून पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ मध्ये करणे ही बाब शासनाच्या अखत्यारीतील आहे. या करिता शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे .

उपरोक्त खुलासा मान्य होण्यास विनंती आहे.

**महसूल विभाग - जिल्हा परिषदांना जमीन महसूल, उपकर व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी असलेला थकबाकीचा निधी.**

जिल्हा परिषद व पंचायत समितींना देय असलेल्या सन २०२०-२१ अखेर जमीन महसूल उपकर अनुदान रु. १४,२३,९७,८३२ व त्या वर्षातील माफ केलेला वाढीव उपकर रक्कम रु. २१,११,८३,७६४ इतके अनुदान थकित आहे. तसेच मुद्रांक शुल्क अनुदान सन २०२०-२१ अखेर १३,७७,६७००० शासनाकडून येणे प्रलंबीत आहे.

याबाबत शासनाकडून प्रलंबित अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

सदर खुलासा स्विकृत होणेस विनंती आहे.

**सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - वृध्द कलावंत निवडीचा वार्षिक इष्टांक वाढवून मिळणेबाबत.**

मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या प्रमाणात कलावंत निवडीचा इष्टांक वाढवून मिळणेबाबत पुढीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वृकमा २०१२/ प्र. क्र. ११७/सां. का. ४, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ नुसार मान्यवर वृध्द साहित्यीक व कलावंतांना मानधन देण्याच्या योजनेबाबत सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी लाभार्थी निवडीचा इष्टांक ६० असा निश्चित करण्यात आला आहे.

संचालनालय स्तरावरुन प्रत्येक जिल्ह्याचा इष्टांक निश्‍चित करताना त्या- त्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ, लोकसंख्या तसेच तालुक्यांची संख्या विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यासाठी कलावंत निवडीचा इष्टांक निश्‍चित करणे आवश्यक आहे, अशी या कार्यालयाची धारणा आहे. परंतु राज्यातील काही जिल्हयामध्ये ७ पेक्षा कमी तालुके आहेत, अशा जिल्ह्यांनासुद्धा ६० इतकाच इष्टांक आहे. आणि काही जिल्ह्यामध्ये तालुक्यांची संख्या १५ पेक्षा जास्त असून अशा जिल्ह्यांनासुद्धा ६० इतकाच इष्टांक आहे. राज्यात क्षेत्रफळाने व लोकसंख्येने लहान असलेले अनेक जिल्हे आहेत.

| अ. क्र. | जिल्हाचे नाव | तालुक्यांची संख्या | त्यानुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | हिंगोली | ५ | ११,७७,३४५ |
| २ | भंडारा | ७ | १२,००,३३४ |
| ३ | गोंदीया | ८ | १३,२२,३३१ |
| ४ | वर्धा | ८ | १३,००,७७४ |
| ५ | सिंधुदुर्ग | ८ | ८,४९,६५१ |

लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार करता अहमदनगर जिल्हा राज्यातील इतर सर्व जिल्ह्यापेक्षा मोठा आहे. त्यामध्ये १४ तालुक्यांचा समावेश आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४५,४३,१५९ असल्याने मा. ना. सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील, अध्यक्षा, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्हा हा क्षेत्रफळाने राज्यातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने या जिल्ह्यासाठी कलावंत निवडीचा इष्टांक ६० वरुन २५० करणेबाबत शासनास विनंती करण्याच्या सुचना कार्यालयास दिल्या होत्या.

त्यानुसार सदर बाबतीत या कार्यालयाकडून

१. पत्र क्र. जिसकअ/जिप/वृकमा/इष्टांक/ १४०७ /१७-१८, दिनांक २१/६/२०१७,

२. पत्र क्र. जिसकअ/जिप/वृकमा/इष्टांक/२६१७/१७-१८, दिनांक २३/१०/२०१७

३. पत्र क्र. जिसकअ/जिप/वृकमा /इष्टांक/३४२६/१७-१८, दिनांक २९/१२/२०१७

४. पत्र क्र. जिसकअ/जिप/वृकमा/इष्टांक/७७१/१७-१८, दिनांक २६/०२/२०१८

अन्वये या कार्यालयाने यापुर्वीही अहमदनगर जिल्ह्यासाठी कलावंत निवडीचा इष्टांक वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निणर्य क्र. पुरक ६९१९/प्र. क्र. ८३/सां. का. ४, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये अहमदनगर जिल्ह्याचा इष्टांक ६० वरुन १०० इतका करण्यात आलेला आहे. त्या इष्टांक प्रमाणे महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. पुरक २०१२/प्र. क्र. ११७/सां. का. ४, दिनांक ७ फेब्रुवारी २०१४ प्रमाणे वृध्द कलावंतांची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे

कृपया अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**शालेय शिक्षण विभाग – प्राथमिक शाळांना संरक्षण भिंत बांधणे.**

अहमदनगर जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत एकूण ३५६९ शाळांपैकी २९३१ शाळांना संरक्षण भिंत ( पक्की भिंत, तारेचे कुंपण, बाडाचे कुंपण इ. ) आहे. उर्वरित ६३८ शाळांना संरक्षण भिंत आवश्यक आहे. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत यु-डायस २०२०-२१ नुसार शासन निर्णय क्र. एसएसए २६/१६/प्र. क्र. ९२/एस.एम-१, दि. ३० मार्च २०१६ अन्वये रुपये ७७४५ प्रति मीटरप्रमाणे सन २०२०-२१ मध्ये ६३८ शाळांना ५५११० रनिंग मीटर संरक्षण भिंत बांधण्यासाठी रुपये ४६,८४, ३५,००० निधीची आवश्यकता आहे. सदर निधीची मागणी केलेली असून आज रोजी पर्यंत निधी अप्राप्त आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांचा आणि अंगणवाड्यांचा भौतिक विकास अंतर्गत शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२०/प्र. क्र. ७५/रोहयो-७, दि. १डिसेंबर २०२० अन्वये ९४४ शाळांचा सन २०१९-२० मधील पुरवणी बजेटमध्ये ५० टक्के कामे व सन २०२०-२१ मध्ये ५० टक्के कामे नरेगा लेबर बजेटमध्ये प्रस्तावित करण्यात आली असून पैकी १४० मंजूर झाली असून १२ कामे सुरू करण्यात आली.

सदरचे अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**ग्रामविकास विभाग – आरोग्य सेवा संवर्ग रिक्त पदे भरणेबाबत ग्रामसेवक संवर्ग व इतर संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत.**

अहमदनगर जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण १३१८ ग्रामपंचायती असून सदर ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवकांची ९५२ व ग्रामविकास अधिकारी यांची २५३ अशी १२०५ पदे मंजूर आहेत. सदर मंजूर पदापैकी ग्रामसेवकांची ९६ व ग्रामविकास अधिकारी यांची २८ पदे रिक्त आहेत. ग्रामविकास अधिकारी हे पद ७५ टक्के पदोन्नती व २५ टक्के स्पर्धा परिक्षेने भरली जातात. ग्रामविकास अधिकारी पदोन्नती कोट्यातील ७ रिक्त पदे भरणेबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही सुरू असून स्पर्धा परिक्षेव्दारे भरावयाची २१ पदे भरणेची कार्यवाही मा. विभागीय आयुक्त स्तरावरुन सुरू आहे. सदर स्पर्धा परिक्षेबाबत कार्यवाही विभागीय आयुक्त स्तरावरुन सुरू झालेनंतर पदे भरणेत येतील. ग्रामसेवकांची ९६ रिक्त पदांपैकी शासन स्तरावरुन दि ३/३/२०१९ रोजी ६५ पदांची जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच जिल्हा परिषदेकडील सरळसेवेची १२ संवर्गातील एकूण ७०९ रिक्त पदांची भरती करणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अनुसूचित क्षेत्राबाहेरील (Non Pesa) रिक्त पदे**

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | भरतीसाठी शासनास कळविलेली पदे |
|---|---|---|
| १. | औषधनिर्माता | १३ |
| २. अ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के - (हंगामी फवारणी उमेदवारांमधून) | ११८ |
| ब | आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के - (सर्वसाधारण उमेदवारांमधून) | ६२ |
| ३. | आरोग्य सेवक (महिला) | ३२९ |
| ४. | अंगणवाडी पर्यवेक्षिका | ८ |
| ५. | विस्तार अधिकारी (कृषि) | २ |
| ६. अ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) - ग्रापं | १ |
| ब | विस्तार अधिकारी (साख्यिकी) - महिला व बालकल्याण | २ |
| ७. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ३ |
| ८. | कंत्राटी ग्रामसेवक | ६५ |
| ९. | स्थापत्य अभियंत्रिकी सहायक | ४८ |
| १०. | वरीष्ठ सहायक (लिपिक) | ११ |
| ११. | वरीष्ठ सहायक (लेखा) | १२ |
| १२. | कनिष्ठ लेखाधिकारी | ४ |
| | एकूण | ६७८ |

**अनुसूचित क्षेत्रातील (Pesa) रिक्त पदे**

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | भरतीसाठी शासनास कळविलेली पदे |
|---|---|---|
| १. अ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के - (हंगामी फवारणी उमेदवारांमधून | १ |
| ब | आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के - (सर्वसाधारण उमेदवारांमधून) | ६ |
| २. | आरोग्य सेवक (महिला) | २३ |
| | अंगणवाडी पर्यवेक्षिका | १ |
| **एकूण** | | **३१** |
| **अनुसूचित क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील एकूण** | | **७०९** |

वरीलप्रमाणे रिक्त असलेल्या ७०९ पदांची भरती करणेबाबत शासनास माहिती सादर केली असून सदर पदे भरणेकामी दिनांक ३/३/२०१९ रोजी जिल्हा परिषद स्तरावरुन जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली असून भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरू आहे. भरतीसाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीचा संक्षिप्त प्रारुप अवलोकनार्थ सादर केला आहे.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामधील मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करणेबाबत.**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येते. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. संगाग्रा-२०१६/प्र. क्र. ७२/पापु-८, दिनांक- ४ जून २०१६ नुसार संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येते. यामध्ये सहभागी होऊन पारितोषिक प्राप्त ग्रामपंचायती करिता बक्षीस देण्यात येते. सदर पारितोषिक रक्कम ही लोकसंख्येने लहान व मोठ्या ग्रामपंचायतींना एकच निकष लावून देण्यात येत आहे. त्यामुळे पारितोषिक प्राप्त लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या ग्रामपंचायतींना सदर रक्कम ही तुटपुंजी ठरत आहे. सबब पारितोषिक प्राप्त ग्रामपंचायतींना मिळणारी पारितोषिकाची रक्कम ही त्या ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येवर आधारित असावी, याबाबत जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून शासनास खालील प्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

१. मा. प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे जा. क्र/स्वभामि/ शास्वत/३६/२०१७, दिनांक २३/८/२०१७ नुसार लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षीस देताना २००० लोकसंख्या, २००० ते ५००० लोकसंख्येसाठी व ५००० वरील लोकसंख्येसाठी बक्षीस रकमा त्या त्या प्रमाणात वाढवून देणेकरिता विनंती करण्यात आलेली होती.

२. मा. अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जीटी हॉस्पिटल, मुंबई यांच्याकडे जा. क्र/स्वभामी/शाश्वत/४०/२०१७, दि. १२/९/२०१७ नुसार, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या दि. १८/८/२०१७ रोजीच्या स्थायी समिती मध्ये सर्वानुमते ठराव क्रमांक ५१ पारित करण्यात आलेला आहे. त्यानुसार लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षीस देताना २००० लोकसंख्या, २००० ते ५००० लोकसंख्येसाठी व ५००० वरील लोकसंख्येसाठी बक्षीस रकमा त्या त्या प्रमाणात वाढवून देणेकरिता विनंती करण्यात आलेली होती.

३. मा. अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जीटी हॉस्पिटल, मुंबई यांच्याकडेस या कार्यालयाकडील पत्र क्र./ स्वभामी/शाश्वत/४८/२०१७, दि. ६/१०/२०१७ नुसार, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना बक्षीस देताना लोकसंख्येप्रमाणे ग्रामपंचायतीचे गट करून त्या त्या प्रमाणात बक्षिसाची रक्कम वाढवून देण्यात यावी—

५००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा पहिला गट.

५००१ ते १०००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा दुसरा गट.

१०००१ ते १५००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा तिसरा गट.

१५००१ च्या पुढील लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा चौथा गट.

४. मा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सीबीडी बेलापूर, मुंबई यांचेकडे या कार्यालयाकडील पत्र क्र. स्वभामि/ शाश्वत/३३/१९, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियांनांतर्गत ग्राम पंचायतीना बक्षिस देतांना लोकसंख्येप्रमाणे ग्रामपंचयातींचे गट करून त्या त्या प्रमाणात बक्षिसाची रक्कम वाढवून देण्यात यावी - ५००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा पहिला गट, ५००१ ते १०००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा दुसरा गट, १०००१ ते १५००० पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचा तिसरा गट, १५००१ च्या पुढील लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायंतीचा चौथा गट. याप्रमाणे शासनास पत्रव्यवहार करून विनंती करण्यात आलेली होती. परंतु पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. संमाग्रा-२०१८/प्र. क्र. ४१/पापु-१६, दिनांक २५-४-२०१८ व शासन निर्णय क्र. संमाग्रा-२०१९/प्र. क्र. ८७/पापु-१६, दिनांक- २३ जुलै २०१९ व शासन निर्णय क्र. संगाग्रा-२०१९/प्र. क्र. ८७/पापु-१६, दिनांक २५ नोव्हेंबर २०२१ नुसार संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये वरील विनंती पत्रांचा विचार केलेला नाही. तरी, अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात मा. विभागीय सचिवांच्या साक्षीसाठीच्या प्रश्नावली मधील सदर परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

**सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - समाज कल्याण विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत.**

उपरोक्त विषय हा शासन स्तरावरील असलेने कार्यवाहीस्तव सविनय सादर

१. महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. सकआ/२०००/प्र. क्र. २७१/आस्था-२, दिनांक ४ नोव्हेंबर, २००० अन्वये समाजकल्याण विभागकडील जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या योजनांमुळे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे खालीलप्रमाणे आकृतीबंध निश्चित केला आहे.

| अ. क्र | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|
| १ | समाजकल्याण अधिकारी (गट अ) | १ |
| २ | समाजकल्याण निरीक्षक (गट-क) | ७ |
| ३ | कार्यालयीन अधीक्षक | १ |
| ४ | वरिष्ठ लिपीक | २ |
| ५ | कनिष्ठ लिपीक | १ |
| ६ | वाहन चालक | १ |
| ७ | शिपाई | ३ |
| **एकूण** | | **१६** |

२. तदनंतर महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय, क्रमांक सकआ २००१/प्र. क्र. २५१/आस्था २ , दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये समाज कल्याण विभागाकडील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकरिता आकृतीबंध निश्चित केला असून सदर पदे सामाजिक न्याय विभागाकडून भरण्यात येतात. सद्यःस्थितीत सदर पदांपैकी खालीलप्रमाणे पदे भरण्यात आलेली आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | समाजकल्याण अधिकारी (गट अ) | १ | ० | १ |
| २ | समाजकल्याण निरीक्षक (गट क) | ५ | १ | ४ |
| ३ | सहाय्यक लेखाधिकारी | १ | १ | ० |
| ४ | कार्यालयीन अधीक्षक | १ | ० | १ |
| ५ | सहाय्यक सल्लागार | १ | १ | ० |
| ६ | वैद्यकिय सामाजिक कार्याकर्ता | १ | १ | ० |
| ७ | वरिष्ठ लिपीक | २ | ० | २ |
| ८ | कनिष्ठ लिपीक | १ | १ | ० |
| ९ | वाहन चालक | १ | ० | १ |
| १० | परिचर | ३ | ० | ३ |
| | एकुण | १७ | ५ | १२ |

सद्यःस्थितीत जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडील योजनांची संख्या, त्यांचे स्वरुप व त्यावर होणारा खर्च यांचा विचार करता मंजूर आकृतीबंध हा अतिशय कमी आहे. सबब सामाजिक न्याय विभागाकडील आकृतीबंधातील कार्यालयीन कर्मचारी पदसंख्येत वाढ होणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे समाज कल्याण विभागास कर्मचारी उपलब्ध झाल्यास विविध योजना राबविण्यास सहाय्य होणार आहे.

तरी अनुपालन स्विकृत होणेस विनंती आहे.

**ग्रामविकास विभाग – जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत.**

ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दि. १५ मे २०१४ नुसार समुपदेशनाने बदल्या करताना प्रशासकीय बदली व त्यानंतर विनंती बदली या क्रमाने बदल्या केल्या जातात. उक्त शासन निर्णयानुसार १० टक्के प्रशासकिय बदल्या अनिवार्य आहेत. तसेच संवर्गामध्ये एकही बदलीपात्र कर्मचारी नसल्यास एक/दोन बदल्या कराव्यात असे निर्देश आहेत. परंतु प्रशासकिय बदल्या केल्यानंतर तालुक्यामधील रिक्त पदांच्या प्रमाणात समतोल साधणे जरुरीचे ठरते, कारण उक्त शासन निर्णयामधील तरतुदी नुसार ज्या भागात ज्या तालुक्यात सर्व पदे भरणे आवश्यक आहे ती वगळता उर्वरीत सर्व तालुक्यातील समतोल साधला जाईल याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दक्षता घ्यावी लागते. म्हणून समतोल अंतर्गत प्रशासकिय बदल्या केल्या जातात. परंतु यामध्ये समतोल राखण्याठी कमी सेवा झालेले व प्रशासकिय

बदलीसाठी पात्र नसलेले (म्हणजे शुन्य ते १० वर्षे आत सेवा झालेले) कर्मचारी यांच्या बदल्या करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे एकदा समतोल साधण्यसाठी बदल्या केल्यानंतर विनंती बदली करता येत नाही.

सर्वसाधारण बदल्यांचा कालावधी संपल्यानंतर अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही प्रमाणात प्रकरण परत्वे व रिक्त पदांचा विचार करून बदली करणेचे अधिकार जिल्हा परिषदेला देण्याबाबत शासनस्तरावर विचारविनिमय होणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अ. नगर यांचेकडील क्रं. ५२४/१९, दि. २९/६/२०१९ अन्वये मा. प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

**ग्रामविकास विभाग – अनुकंपा भरती करणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अकंपा १०१०/प्र. क्र. ३०८/१० आठ, दिनांक ६/१२/२०१० नूसार शासकिय कर्मचाऱ्याच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देणेसाठी वयाची ४५ वर्षे इतकी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानूसार निश्चित करण्यात आलेली वयोमर्यादा दिनांक ६/१२/२०१० पासून लागू करण्यात आलेली आहे.

शासनाचे पत्र क्र. ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण -२०१८/प्र. क्र. १७३ / आस्था-८, दिनांक २८/९/२०१८ अन्वये सरळसेवेद्वारे / नामनिर्देशनाने पदभरतीची कार्यवाही करतांना जिल्हा परिषदेच्या संबंधीत रिक्त घोषीत केलेल्या एकुण भरती योग्य पदाच्या १० टक्के इतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्याबाबतची कार्यवाही करणेचे निर्देश आहेत.

दरवर्षी भरतीप्रकिया होत नसल्याने अनुकंपा प्रतिक्षासूची मधील उमेदवारांचे वय ४५ वर्षे उलटून जाते. व त्यामुळे सदर उमेदवार हे नियुक्ती पासून वंचित राहतात. अशा प्रकरणी मागील अनुकंपा भरती प्रक्रिया ते चालू भरती प्रक्रिया या कालावधीत ४५ वर्ष पूर्ण वयोमर्यादा झालेले उमेदवार यांची वयोमर्यादा शिथील करावी किंवा कसे या बाबत शासन स्तरावरुन निर्णय होणे गरजेचे आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र. वशी/अकंपा/६५०/२०१९, दिनांक २५/७/२०१९ नूसार शासनाकडे ज्या अनुकंपा उमेदवारांचे वयाची ४५ वर्षे इतकी झाले आहे अशा अनुकंपा धारकांस भरतीवेळी विशेष बाब म्हणून वय क्षमापित करणे विनंती केली आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१२१९/प्र. क्र. ५६/आठ, दिनांक ११ सप्टेंबर २०१९ नूसार अनुकंपा नियुक्तीच्या भरतीसाठी असलेली १० % व २० % ची मर्यादा शिथील करून वित्त विभागाचे ज्या पदांच्या भरतीवर निर्बंध आहेत आणि ज्या पदांच्या भरतीवर निर्बंध नाहीत अशा सरळ सेवेच्या कोट्यातील सर्व पदांच्या बाबतीत, गट -क व गट -ड मधील प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २० % पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्यात याव्यात अशा सुचना आहेत.

**नगरपालिकेतील थकित शिक्षण कर जिल्हा परिषदेला मिळणेबाबत.**

प्रत्येक बिगरप्राधिकृत नगरपालिका प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोजनासाठी अशा नगरपालिकेच्या क्षेत्रातील मालमत्तांच्या पट्टीयोग्य मूल्याचा (राज्य) शासन याबाबत वेळोवेळी निश्चित करील असा प्रमाणशीर भाग आणि उक्त प्रयोजनांसाठी तिने धारण केलेल्या कोणत्याही निधींपासून (विश्वस्त निधी धरून) मिळणारी प्राप्ती आणि तसेच मिळालेला सर्व पैसा यथास्थिति (जिल्हा परिषदेला) किंवा प्राधिकृत नगरपालिकेला दरवर्षी देणेत येईल. अशी तरतूद महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण कायदा, प्रकरण आठ कलम ४१(१) मध्ये आहे.

त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातील बिगर प्राधिकृत नगरपालिकांकडून सद्यस्थितीत रुपये १२. ६६ कोटी एवढ्या रकमेची प्राथमिक शिक्षण अंशदान (शिक्षण कर) वसुली थकीत आहे. सदर थकीत वसुलीसंदर्भात अहमदनगर जिल्हा परिषदेकडून देवळाली प्रवरा, राहुरी, राहाता, पाथर्डी, शिर्डी व श्रीगोंदा या ६ बिगर प्राधिकृत नगरपालिकांकडे थकीत असलेली प्राथमिक शिक्षण वर्गणीची रक्कम भरणा करणेसाठी खालील प्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आला आहे :-

१. मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कार्या-लेखा/ऑडीट/५१८/२००४, दि. १४/१२/२००४.

२. मा. जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय यांना या कार्यालयाचे पत्र क्र. का-५/लेखा/ऑडीट/प्राशि/८, दि. २०/५/२००८.

३. मा. सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ३२, द्वारा मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचे मार्फत या कार्यालयाचे पत्र जा. क्र. कार्या-५/ले. प./१५८/२००९, दि. ८/६/२००९.

४. मा. संचालक, नगर विकास संचालनालय विभाग, वरळी, मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अर्थ/कार्या-६/बजेट/शुल्क/१६/२०१६, दि. १०/३/२०१६.

५. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अर्थ/कार्या-६/बजेट/शुल्क/१६/२०१६, दि. १०/३/२०१६.

६. मा. प्रधान सचिव , ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अर्थ/कार्या- ६/बजेट/शुल्क/१६/२०१६, दि. १०/३/२०१६.

७. मुख्याधिकारी, नगर परिषद देवळाली प्रवरा, राहुरी, राहाता, पाथर्डी, शिर्डी व श्रीगोंदा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अर्थ/कार्या-६/बजेट/शुल्क/१६/२०१६, दि. १०/३/२०१६.

८. मुख्याधिकारी नगरपरिषद राहाता, श्रीगोंदा, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, शिर्डी यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. कार्या-५/ ऑडीट/३०१ ते ३०६/२०१८, दि. १/८/२०१८.

९. मुख्याधिकारी नगरपरिषद राहाता, श्रीगोंदा, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, शिर्डी यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. कार्या-५/ ऑडीट/२२८/२०१९, दि. २६/४/२०१९.

१०. गटशिक्षणाधिकारी देवळाली प्रवरा, राहुरी, राहाता, पाथर्डी, शिर्डी व श्रीगोंदा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कार्या-५/ ऑडीट/१०६/२०२०, दि. ५/३/२०२०.

११. मुख्याधिकारी, नगर परिषद देवळाली प्रवरा, राहुरी, राहाता, पाथर्डी, शिर्डी व श्रीगोंदा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कार्या-५/ ऑडीट/५/२०२१, दि. ७/१/२०२१.

उपरोक्त प्रमाणे प्राथमिक शिक्षण अंशदान (शिक्षण कर) वसुलीबाबत अनेकवेळा या कार्यालयाकडून पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. तथापि थकबाकी अप्राप्त आहे. तरी वरील प्रमाणे अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**ग्रामविकास विभाग जिल्हा परिषदेतील वर्ग-३, वर्ग-४ कर्मचाऱ्यांना राज्यस्तरावरील गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळालेनंतर एक वेतनवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. पुरस्कार १००५/प्र. क्रं. ८३६/ समन्वय कक्ष, दि. २ सप्टेंबर २००५ नुसार राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत काम करणाऱ्या वर्ग-३ आणि वर्ग-४ कर्मचाऱ्यांची (ग्रामसेवक व शिक्षक वगळता) गुणवंत कर्मचारी म्हणून दरवर्षी राज्य स्तरावरून विभाग निहाय जिल्हा परिषदेमधून निवड करून त्यांचा स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला जातो. परंतु एक आगाऊ वेतनवाढ दिली जात नाही.

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रं. मागणी-२०१०/प्र. क्रं. २८७/आस्था-९, दि. २६ ऑक्टोबर २०१० नुसार आदर्श ग्रामसेवक पुरस्कार प्राप्त कर्मचारी यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यात येते.

२. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रं. संकिर्ण-२०१२/सं. क्रं. २४८/१२/टिएनटि-२, दि. ४ सप्टेंबर २०१४ नुसार राष्ट्रीय व राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी ऐवजी ठोक रक्कम रुपये ०१ लक्ष देण्यात येत होते.

त्यामुळे जिल्हा परिषदेकडील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक आगाऊ वेतनवाढ मिळण्यासाठी या कार्यालयाकडील पत्र जा. क्रं. साप्रवि-१/पुरस्कार/३६१/२०१९, अहमदनगर, दि. ४/७/२०१९ नुसार शासनाकडे विनंती करणेत आलेली आहे. सोबत दि. ४/७/२०१९ रोजीचे पत्र माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २४/८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार आगाऊ वेतनवाढी न देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

जिल्हा परिषद शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी न देणेबाबत दि. ४/९/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

**जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात होत असलेल्या कपातीबाबत, जि. प. ला मिळणारे अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळणेबाबत संबंधित विभागाची भूमिका.**

**कृषी विभाग :**

कृषी विभाग - जिल्हा परिषदेला अनुसुचित जाती व आदिवासी उपयोजना अंतर्गत तसेच सद्यस्थितीस अंमलबजावणी करणेत येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अंमलबजावणीकामी मिळणारे उपलब्ध अनुदानाच्या ४ टक्के अभिकरण शुल्क नियमितपणे जिल्हा परिषद खाती जमा करणेत येत आहे. सदरच्या शुल्कामुळे जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधुन विविध कल्याणकारी योजना राबविणेकामी मदत होत आहे.

**महिला व बालकल्याण विभाग :**

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे नियम १२३ अनुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयामार्फत अंगणवाड्यातील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार पुरविणे तसेच ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना तसेच गरोदर व स्तनदा मातांना टी. एच. आर. आहार पुरविणे देयकातून ४ टक्के अभिकरण शुल्क कपात करणेत येऊन जिल्हा परिषदेस भरणा करणेत येतो.

तथापि मा. आयुक्त, ए. बा. वि. से. यो. म. रा. मुंबई यांचे कडील आदेश क्र. कार्या-२ / आवपो /१२८९/२०१७, दि. २९/१/२०१७ अन्वये टी. एच. आर. पुरवठ्याचे देयके आयुक्त, ए. बा. वि. से. यो. म. रा. मुंबई यांचे स्तरावरुन होत आहेत.

१. महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर पत्र क्रमांक मवबाक/लेखा/कार्या-२/६७/२०२०, दिनांक १७/३/२०२० अन्वये ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके तसेच गरोदर व स्तनदामाता यांना पुरविणेत येणारा घरपोच आहार (टी. एच. आर.) ची देयकावरील माहे एप्रिल २०१६ ते माहे फेब्रुवारी २०२० या कालावधीतील प्रलंबित अभिकरण शुल्क रक्कम रुपये ६, ७८,४५,६२८/- इतके अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळणे बाबत मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडे मागणी केलेली आहे.

२. तसेच माहे मार्च २०२० ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीतील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके तसेच गरोदर व स्तनदामाता यांना पुरविणेत येणारा घरपोच आहार (टी. एच. आर. ) देयकावरील अभिकरण शुल्क रक्कम रुपये ४, १९,०३,८७१/- प्रलंबीत आहे.

३. कोवीड-१९ महामारीमुळे माहे मार्च २०२० पासुन लॉकडाऊन लागु केले मुळे अंगणवाडीतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहारा ऐवजी घरपोच आहार (टी. एच. आर. ) पुरवठा करणेत येत आहे. सदर आहाराचे देयके मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून अदा करणेत येत आहेत. या देयकावरील माहे मार्च २०२० ते सप्टेंबर २०२१ या कालावधीतील अभिकरण शुल्क रक्कम रुपये २, ६९,५८,७२०/- इतके अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळणे बाकी आहे.

वरील मुद्दा क्रमांक १, २ व ३ मधील नमुद कालावधीतील पोषण आहाराचे देयकावरील रक्कम रुपये १३,६७, ०८,२१९/- इतके अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला येणे बाकी आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**कृषी विभागाचे अभिप्राय :-** अप्राप्त.

**पशुसंवर्धन विभागाचे अभिप्राय.**

१. राज्यामध्ये सद्यस्थितीत ४८४९ एवढे पशुवैद्यकिय दवाखाने कार्यरत असून लोकप्रतिधिकडून वेगवेगळया ठिकाणी पशुवैद्यकिय दवाखाने सुरू करणे , कार्यरत असलेल्या श्रेणी -२ दवाखान्याचे श्रेणी-१ मध्ये दर्जा वाढ करणे इत्यादी स्वरुपाची मागणी वारंवार होत आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील अस्तीत्वात असलेल्या सर्व पशुवैद्यकिय दवाखान्याचा सर्वकष आढावा घेऊन राज्यामध्ये कोणकोणत्या पशुवैद्यकिय दवाखान्याचे श्रेणी वाढ करणे आवश्यक आहे. कोणकोणत्या ठिकाणी नवीन पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करण्याची आवश्यकता आहे. अथवा कोणकोणत्या ठिकाणी पशुवैद्यकिय दवाखान्यांच्या कार्यक्षेत्रात वाढ करणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय कृषी आयोगाने विहित केलेले पशुधन घटक संख्या या मध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. किंवा कसे, हि बाब निश्चित करणे गरजेची आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ७/१२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे.

२. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-**

सहमत आहे. थकीत अनुदान वितरीत करण्याबाबत वित्त विभागासोबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

**पर्यटन व सांस्कृतिक विभाग -**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ९-९-२०१९ नुसार राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत इत्यादींना मानधन या योजनेअंतर्गत सन्मानार्थ्याच्या निवड इष्टांकात व मानधनाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत निर्णय नमुद केलेला आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- (योजना-११)**

शिक्षण विभाग प्राथमिक शाळांना संरक्षक भिंत बांधणे ही बाब यु डायस निकषानुसार जि. प. शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे ही बाब शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या अखातरित्या आहे त्यामुळे ग्रामविकास विभागाचे अभिप्राय निरंक समजण्यात यावे.

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत संरक्षण कुपंनासाठी योजना मान्य होऊन केंद्रचा निधी प्राप्त झाल्यास राज्य हिस्सा उपलब्ध करून कामे केली जातील. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांना शिक्षण हक्क कायदयानुसार (RTI) आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधा जसे वर्ग खोली मुला मुलीकरिता स्वंतत्र स्वच्छता गृहे, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा भारत सरकार कडून समग्र शिक्षा कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध निधी असलेल्या मर्यादेत मंजूर करण्यात येतात. निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार, खासदार निधी, १४ व १५ वा वित्त आयोग व सीएसआर इत्यादी माध्यमातून संबधीत जिल्हा परिषदेकडून केली जातात. या प्रकरणी जिल्हा परिषदेने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काही भौतीक सुविधांची उभारणी केल्याचे दिसते.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय - (आस्था ८)**

वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानूसार कोव्हीड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणारा अर्थव्यवस्थेवरील परिणाम लक्षात घेऊन, सार्वजनिक आरोग्य, वैदयकिय शिक्षण, व औषध द्रव्ये वगळता अन्य विभागाने कोणत्याही प्रकारची पदभरती करू नये असे आदेश दिले आहेत.

परंतु, ग्रामविकास विभागाच्या प्रस्तावावर ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा मिळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील आरोग्य सेवेतील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, आरोग्य पर्यवेक्षक ही रिक्त पदे भरण्यास वित्त विभागाने विशेष बाब म्हणून मान्यता दिली आहे. त्यानुसार ही पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - पापु -१६**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमात ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचविणे व उस्फुर्त लोकसहभाग वाढावा या दृष्टीकोनातुन राज्याची संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान योजना आहे. या अभियानाअंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीतील उत्कृष्ट प्रभागाला व जिल्हा परिषद गटस्तर, जिल्हा परिषद स्तर, विभागीय आणि राज्य स्तरावर पात्र ग्रामपंचायतींना तसेच विशेष पुरस्काराअंतर्गत पात्र ग्रामपंचायतीना पुरस्कार देण्यात येतात. त्या अनुषंगाने दिनांक ४ जून २०१६ च्या शासन निर्णयानंतर दिनांक २५ एप्रिल, २०१८ व त्या नंतरच्या दिनांक २३ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये या अभियांनाबाबत सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा २ अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींना त्या ग्रामपंचायतीच्या सहभागी गावाच्या लोकसंख्येनुसार दरडोई निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या स्वच्छतेच्या कार्यक्रमाकरिता दरडोई निकषानुसार निधी उपलब्ध असून त्यातून कामे सुरू आहेत. या करिता २०२०-२१ करिता रुपये ३१७९५०. ३९ लक्ष इतक्या रकमेचा आराखडा केंद्रा कडून मान्य झाला आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियांनाचा मुख्य उददेश हा राज्यातील सर्व गावामध्ये स्वच्छता अबाधित राखणे व स्वच्छतेची चळवळ निर्माण करणे असा आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामध्ये देण्यात येणारे पुरस्कार हे फक्त काही विजेत्या ग्रामपंचायतीनांच मिळत असून ते ग्रामपंचायतीची लोकसंख्या विचारात न घेता, ग्रामपंचायतींना स्वच्छतेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्याकरिता प्रोत्साहित करण्याकरिता देण्यात येतात.

**सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय-**

शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये समाजकल्याण आयुक्तालय व त्यांचे नियंत्राणाखालील क्षेत्रिय कार्यालयातील पदाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे . त्यानुसार अहमदनगर जिल्हा परिषदेकरिता एकूण १७ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सद्यःस्थितीत सदर १७ पदापैकी ५ पदे भरण्यात आली असून १२ पदे रिक्त आहेत. वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध तयार करण्याची कार्यावाही सुरू आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव उच्च अधिकार समिती समोर सादर करण्याकरिता वित्त विभागास सादर करण्यात आला असता वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थितीत केले असून प्रस्ताव फेरसादर

करण्यात येत आहे. शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २ जून, २०१५ अन्वये नव्याने पदे निर्माण करण्यास प्रतिबंध करण्यात आला असून पद भरती करण्यास मर्यादा घातलेल्या आहेत, सबब समाजकल्याण आयुक्तालयाचे नियंत्राणाखालील विविध क्षेत्रीय कार्यालयातील गट क संवर्गाची ४६ टक्के व गट ड संवर्गाची ५२ टक्के पदे रिक्त् आहेत.

विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवरील महत्त्वाच्या संवर्गातील पदे भरण्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- आस्था १४**

शासनाचा बदल्याबाबतचा दिनांक १५ मे २०१४ चा शासन निर्णय स्वंयस्पष्ट आहे. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- (आस्था ७)**

अनुकंपा भरतीबाबतचे स्थायी आदेश / धोरण हे सामान्य प्रशासन विभागामार्फत निश्चित केले जाते. त्यामुळे पंचायत राज समितीने तशी शिफारस केल्यास, ती शिफारस सामान्य प्रशासन विभागास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

**नगर विकास विभागाचे अभिप्राय :**

उपसचिव नगर विकास विभाग यांचे कडील पत्र क्रमांक एमयुएम/ २०२१/ स. क्र. ३१९३/ नवि-१७ दि. ९ डिसेंबर, २०२१ अन्वये शिक्षण अंशदानाच्या थकित (शिक्षण कर) रकमेबाबत आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे अभिप्राय शासनास कळविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- (आस्था ४)**

उत्कृष्ट काम असल्याबद्दल आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतचे धोरण सामान्य प्रशासन विभागामार्फत निश्चित केले जाते.

६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या कालावधी पासून आगाऊ वेतनवाढी न देण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्गमित केला आहे. त्यामुळे आता यापुढे अतिरिक्त / आगाऊ वेतनवाढ देण्याची मागणी मान्य करता येणार नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

**पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ व १५ डिसेंबर, २०२१ या कालावधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की,** समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला भेट दिली असता जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व पत्रकारांशी केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी कृषी विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबतचा मुद्दा मांडण्यात आला होता. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे नवीन योजना राबविण्यासाठी येणे अपेक्षित होते. मात्र, जिल्हा परिषदेने ठिबक सिंचन, तुषार सिंचन योजना शासनाच्या कृषी विभागाकडे वर्ग केल्या. राज्य शासनाकडील कृषी विभागाच्या योजना अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेल्या नाहीत, यावर सचिव, कृषी विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या कृषी विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा निर्णय सन २००१ मध्ये झाला होता. परंतु या निर्णयावर शासनाने लगेच स्टे दिला, परिणामी त्या योजना हस्तांतरित होऊ शकल्या नाहीत. त्यानंतर सन २००९ मध्ये या प्रकरणी श्री. बाळासाहेब रघुनाथ हराळ, अहमदनगर यांनी माननीय न्यायालयात रिट पीटीशन दाखल केले. परंतु सदरहू रिट पीटीशन २०१६ मध्ये फेटाळण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने निर्णय दिला की, राज्य सरकारच्या निर्णयात आम्हाला हस्तक्षेप करता येणार नाही. या प्रकरणी सविस्तर विश्लेषण करून ज्या योजना हस्तांतरीत करणे शक्य होते त्या योजना उदाहरणार्थ डीपीसीच्या ३ आणि सेसच्या ७, अशा एकूण १० योजना जिल्हा परिषद त्यांच्या क्षमतेनुसार राबवित आहे. **(परिशिष्ट क्रमांक १. १)** परंतु नंतर या संदर्भात पुढे शासन स्तरावरून कोणताच निर्णय झालेला नाही. सदरहू योजना हस्तांतरीत करणे शक्य नाही या बाबत तत्कालीन सचिवांनी सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर केले होते. आता शेती हा विषय केवळ उत्पादनापुरता मर्यादित राहिलेला नाही. आता कृषी क्षेत्रात नवनवीन टेक्नॉलॉजीकल इंटरव्हेंशन मोठ्या प्रमाणात होत आहे. मग त्यामध्ये जेनेटीकली मॉडीफाईड सीड असेल, रिमोट सेंन्सीगचा वापर असेल, पीक विम्याच्या बाबतीत इतकी गुंतागुंत आहे की त्या जिल्हा परिषदेच्या क्षमतेत नाहीत. तूर्त स्थितीत हा विषय शासनाच्या विचाराधीन नाही. जर हा विषय शासनापुढे आला तर त्या बाबत समितीला अवगत करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सुरुवातीला संपूर्ण कृषी विभाग हा जिल्हा परिषदेकडे होता. त्यावेळी राज्य सरकारकडे डिव्हीजन सॉईल कन्झर्व्हेशनचे कार्यालय होते. त्यावेळी जिल्हा परिषदेमध्ये कृषी विकास अधिकारी हे उच्चतम पद होते. त्यानंतर उप संचालक, संचालक अशी पदे होती. कालांतराने राज्य सरकारने जिल्हा परिषदेच्या अधिकारांवर अतिक्रमण केले

व सर्व योजना स्वतःकडे वर्ग करून घेतल्या. जर असेच करायचे असेल तर आपण मंत्री महोदयांना सांगावयास पाहिजे की, जिल्हा परिषदेकडून संपूर्ण कृषी विभागच काढूनच टाकावा. शासनामुळे सध्या जिल्हा परिषदेच्या ठिकाणी केवळ एक्स्टेंशनचा कार्यक्रम सुरू आहे, राज्य सरकारने संपूर्ण विभागच स्वतःकडे घ्यावयास पाहिजे. राज्य सरकारकडून जिल्हा परिषदेला एकप्रकारे दुय्यम लेखले जात आहे. जिल्हा परिषदेला पूर्वी कृषी संदर्भातील परवाने देण्याचे अधिकार होते. परंतु ते अधिकार सुद्धा काढून टाकण्यात आलेले आहेत. जिल्हा परिषदेला कृषी विभाग आणि जलसंपदा विभागाचे काही अधिकारच राहीलेले नाहीत. जिल्हा परिषद काही काम करीत नाही असे शासन स्वतःच समजायला लागले तर कसे होईल, यावर सचिव, कृषी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेला दुय्यम वगैरे लेखले जात नाही. क्वॉलिटी कंट्रोलच्या इनपुटचे अतिशय महत्त्वपूर्ण काम हे जिल्हा परिषदेकडेच आहे.

सन २०१७-१८ मध्ये यवतमाळ येथे एक प्रकरण घडले होते. त्या ठिकाणी सीडस् बाबत आणि इतर इश्यू निर्माण झाल्यामुळे ते अधिकार जिल्हा परिषदेकडे कायम ठेवून, ते काम कृषी विभागाचे लोक सुद्धा करतील असे ठरले. तरी सुद्धा समितीमध्ये झालेल्या चर्चेचा संदर्भ देऊन ही बाब पुन्हा मंत्री महोदयांपुढे मांडण्यात येईल. जिल्हा परिषदेमध्ये कृषी विभागाची पूर्वी जी पदे होती ती जशीच्या तशीच आजही कायम आहेत. जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाची जी रचना होती तीच रचना आजही कायम आहे. असे स्पटीकरण देण्यात आले. समितीने पशुवैद्यकीय नवीन दवाखाने यांच्या मंजुरीबाबत विचारणा केली असता सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदित केले की, राज्यामध्ये सद्यःस्थितीत ४ हजार ८४९ वैद्यकीय दवाखाने आहेत. नवीन दवाखाने स्थापन करण्याकरिता दिनांक १ जुलै, २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये देण्यात आलेल्या निकषांनुसार ५ हजारांपेक्षा जास्त पशुधन असेल तर त्यांच्यासाठी एक दवाखाना स्थापन करणे अपेक्षित आहे. तसेच डोंगरी व दुर्गम भागामध्ये ३ हजार पशुधनासाठी नवीन दवाखान्याची निर्मिती करणे अपेक्षित आहे. हा निकष राष्ट्रीय कृषी आयोगाच्या निर्णयानुसार राज्य सरकारने स्विकारलेला आहे.

दरम्यानच्या काळात वेगवेगळया जिल्हा परिषदांकडून श्रेणीवाढ करण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले. ते प्रस्ताव सादर केले असता त्यातील अनेक प्रस्ताव आर्थिक उपलब्धतेअभावी अमान्य झाले आहेत. तसेच बऱ्याच ठिकाणी अशी स्थिती आहे की तेथे दवाखाना निर्माण केला आहे परंतु तेथील पशुधनामध्ये दरम्यानच्या काळात मोठा बदल झालेला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी दवाखान्याची निर्मिती करण्यात आली तेथे आता किती पशुधन आहे व कोणत्या ठिकाणी दवाखान्याची गरज आहे याचा नव्याने आढावा घेण्याची गरज आहे. याकरिता दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी एक निर्णय घेऊन अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. **(परिशिष्ट क्रमांक १. २)** ही समिती उपरोक्त नमुद बाबींचा सर्वंकष अभ्यास करेल. संपूर्ण राज्याचा आढावा घेतल्यानंतर कोणत्या ठिकाणी दवाखाने स्थापन करणे गरजेचे आहे ते निश्चित करता येईल. सर्व विभागांचे सह आयुक्त या समितीचे सदस्य आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, राज्यामध्ये ४ हजार ८४९ दवाखाने आहेत. सध्या किती जनावरांमागे एक दवाखाना आहे. यावर सहसचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस माहिती दिली की, १९ व्या पशुगणनेनुसार राज्यामध्ये २ कोटी ३४ लाख ८२ हजार ६७७ पशुधन घटक आहेत. त्यापैकी डोंगरी भागामध्ये ५५ लाख ७० हजार ६८३ पशुधन घटक व बिगर डोंगरी भागामध्ये १ कोटी ७९ लाख ११ हजार ९९४ पशुधन घटक आहेत. याचा मॅपिंग करून अभ्यास करणे आवश्यक असल्यामुळे आता ढोबळमानाने ६१३ दवाखान्यांचा अनुशेष दिसत आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २०११-१२ पासून आजअखेर अहमदनगर जि. प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ऑगष्ट, २०२१ अखेर २११ नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव खात्यामार्फत सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदीत केले की, शासन निर्णयामध्ये दवाखाने स्थापन करण्याबाबतचे दोन निकष देण्यात आलेले आहेत. पहिला निकष ५ हजार जनावरांसाठी १ दवाखाना असा आहे तर दुसरा निकष असा आहे की, ५ किलोमीटर अंतराच्या आत दुसरा दवाखाना असता कामा नये. मग एखाद्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या हद्दीमध्ये १० हजार पशुधन असले तरीही तेथे एकच पशुवैद्यकीय अधिकारी असतील कारण ५ किलोमीटर परीघाच्या आतील निकषामध्ये तसे नमुद केलेले आहे. हा निकष देखील राष्ट्रीय कृषी आयोगाचाच आहे. त्याचा स्विकार राज्य सरकारने केलेला आहे. त्यामुळे आपल्याला सविस्तर मॅपिंग करावे लागेल. आता असलेल्या दवाखान्याच्या हद्दीमध्ये किती पशुधन आहे व तेथे नवीन दवाखान्याची आवश्यकता आहे का, तसेच ५ किमीच्या निकषामध्ये बसत आहे किंवा कसे हे याचाही समिती अभ्यास करेल. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण सांगितलेली पशुधनाची आकडेवारी सन २०११-१२ मधील आहे. परंतु तेव्हाच्या तुलनेत राज्यातील पशुधनामध्ये सुमारे ५० टक्क्यांची घट झालेली आहे.

पूर्वी ज्या शेतकऱ्यांकडे शेतीकामासाठी आठ-दहा बैल होते ते आता यंत्रांच्या सहाय्याने शेती करीत आहेत. अगदी चाळीस-पन्नास एकर जमीन असलेला शेतकरी असेल तरच त्यांच्याकडे एखादी बैलजोडी आहे. तसेच गाई-म्हशी देखील स्वतःला आवश्यक दुग्ध उत्पादनापुरत्याच पाळत आहेत. अलीकडील काळात दुधाळ जनावरांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. तर दूध उत्पादनामध्ये वाढ झाली पाहिजे. केवळ दुधाळ जनावरांची वाढ झाली असे म्हणून चालणार नाही. दूध संकलनामध्ये वाढ झाली किंवा कसे हे पाहावे

लागेल. आपण ५ हजार जनावरे व ५ किलोमीटर अंतराचे निकष सांगितले. जनावरांची संख्या ३ हजारांपर्यंत खाली आणली पाहिजे. ५ किलोमीटर परीघामध्ये ५ हजारांपेक्षा जास्त पशुधन आहे. समितीने असे मत व्यक्त करून अशी विचारणा केली की, सध्या आपल्याकडे किती पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता आहे, यावर सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदीत केले की, सद्यःस्थितीत सुमारे ६०० पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता आहे. त्यापैकी ४३२ पदे एका महिन्याच्या आत भरली जाणार आहेत. यावर समितीने मत व्यक्त केले की, केंद्र सरकारच्या कृषी आयोगाच्या शिफारशीनुसार आपण ५ हजार जनावरांची अट ठेवलेली आहे व त्या अटीचे पालन आपण करीत आहोत. परंतु महाराष्ट्र हे दुधाच्या उत्पादनात अग्रेसर राज्य आहे. एक पशुवैद्यकीय अधिकारी ५ हजार जनावरांसाठी पुरेसे नाहीत. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदीत केले की, नेमण्यात आलेली समिती या सर्व बाबींचा आढावा घेणार आहे. समितीने सादर केलेला अहवाल शासनाकडे पाठविला जाईल. त्यावर शासनाकडून निर्णय होणे अपेक्षित आहे. पंचायती राज समितीची भूमिका त्यांना कळविण्यात येईल असे आश्वासन दिले.

आपल्या खात्यामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. परंतु ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहेत ते महिना-महिनाभर संबंधित गावास भेट देत नाहीत. लोकांनी त्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तर ते त्यालाही प्रतिसाद देत नाहीत. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींबाबत देखील त्यांना माहिती नसते. किमान त्यांनी प्रामाणिकपणे सेवा द्यावी या तरी सूचना निर्गमित कराव्यात.  अशी समितीने नाराजी व्यक्त करून सूचना दिली. यावर सह सचिव, पशुसंवर्धन यांनी माहिती दिली की,  मागील वर्षी फिरती पशु स्वास्थ्य योजना सुरू केली असून ती राबविण्यासाठी वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत तसेच पुणे येथे एक कक्ष स्थापन करण्यात आला आहे . उक्त कक्षाला फोन केला तर स्वास्थ्य उपचारासाठी किती वेळात वाहन पोहोचले व कोणते उपचार केले ही सर्व माहिती जमा करण्यात येत आहे. आता ज्या ठिकाणी पशु वैद्यकीय दवाखाने नाहीत त्या तालुक्यांसाठी ७३ वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या योजनेसाठी पुढील टप्प्यात राज्य सरकारकडून काही वाहने उपलब्ध करून देण्यात येणार असून केंद्र सरकारकडून ८० वाहने पुरवठा करण्यात येणार आहेत. अशा प्रकारे सर्व राज्यामध्ये उक्त सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. ही योजना संपूर्ण राज्यासाठी राबविण्यात येत आहे, समितीने अशी विचारणा केली की, पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती व कर्मचाऱ्यांची निवासस्थानांची दुरावस्था झाली असून अनेक ठिकाणच्या दवाखान्यामध्ये जनावरांना उभे करून तपासण्यासाठीचे लोखंडी थ्रेड आढळून आले नाहीत, ज्या ठिकाणी होते ते सडलेल्या अवस्थेत होते. पशु वैद्यकीय डॉक्टर व कर्मचारी दवाखान्यात वेळेत उपलब्ध नसतात. अशी राज्यातील पशु वैद्यकीय दवाखान्यांची स्थिती आहे. काही डॉक्टर खाजगी प्रॅक्टीस करतात. ५ कि. मी. क्षेत्रात एक दवाखाना असेल व त्या भागात दोन हजार जनावरे असतील तर त्यांनी पायी चालत ५ कि. मी. उपचार घेण्यासाठी जावे काय अशी नाराजी समितीने व्यक्त करून अशी विचारणा केली की, राज्यात किती तालुके आहेत , यावर सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदीत केले की, राज्यामध्ये ३५० तालुके आहेत आपण आता ७३ फिरते पशु चिकित्सालय स्थापन केले आहेत. ज्या ठिकाणची जनावरे आजारी असतील तेथे जाऊन त्यांना उपचाराची सेवा देण्यात येत आहे. पुढील टप्प्यात संपूर्ण राज्यात फिरती पशु स्वास्थ्य योजना लागू करावयाची आहे. समितीने अशी विचारणा केली की, पशु संवर्धन विभागातील रिक्त जागा केव्हा भरण्यात येतील, पशुसंवर्धन विभागातील अनेक डॉक्टरांकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. आता नवीन पद भरती करण्यात येत आहे. सदरहू डॉक्टर कोणत्या ठिकाणी उपलब्ध राहतील याची माहिती लोकांना असेल तर ते त्यांची जनावरे उपचारासाठी त्यांच्याकडे घेऊन जातील. त्यांना उपचार करण्याची जागा ठरवून दिल्यानंतर त्यांनी संबंधित दिवशी तेथे उपस्थित राहणे बंधनकारक केले पाहिजे. त्यासाठी लोक प्रतिनिधी किंवा विभागाच्या माध्यमातून तपासणी केली पाहिजे व अनियमितता आढळून आल्यास कारवाई केली पाहिजे. तेव्हा ते डॉक्टर त्यांची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडतील. सदरहू तपासणीची भीती नसल्याने डॉक्टर एक एक महिना पशु वैद्यकीय दवाखान्यात हजर राहत नाहीत. अशी समितीने नाराजी व्यक्त केली. यावर सह सचिव, पशुसंवर्धन यांनी समितीस विदीत केले की, १ महिन्यात ४३२ पदे भरण्यात येणार आहेत. समितीच्या निदेशानुसार शासन स्तरावरून आयुक्त व सर्व यंत्रणांना सूचना देण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीने राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांना भेट दिली आहे. सन १९६० मध्ये जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या. त्यावेळच्या पशुधन संख्येत आता वाढ झाली आहे. सदरहू विभागासाठी करण्यात आलेली पदांची रचना ही त्यावेळची आहे. त्यामध्ये काही बदल झाला नाही. इतर विभागातील पदांचा सातत्याने आढावा घेऊन त्यांची पद संख्या वाढविण्याची आवश्यकता असेल तर वाढविण्यात येते व कमी करण्याची आवश्यकता असेल तर कमी करण्यात येते. पशुसंवर्धन विभागातील पदांचा आढावा घेण्यात आला आहे काय, यावर समितीला सह सचिव यांनी विदीत केले की, विभागातील पदांच्या आढाव्यासाठी अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली असून एक नवीन सिस्टम उभारण्याचा विभागाचा मानस आहे. यावर समितीने आपण केवळ पदांचा आढावा घेऊ नये. तो घेताना लोकसंख्या व पशुधनाचाही विचार करून दवाखाने व पदे वाढविण्याच्या संदर्भात विचार करण्यात यावा तसे विभागामध्ये आता नवीन पद भरती करण्यात येणार आहे. सदरहू पद भरती ही जुन्या आराखड्यानुसार रिक्त पदांची भरती करण्यात येत आहे नवीन पदांचा आराखडा तयार करताना

सर्वंकष विचार करून तयार करावा. आता नवीन पद भरती करण्यात येत असून चक्राकार पध्दतीने नियुक्ती देण्यात येणार आहे काय, अशी विचारणा केली यावर सह सचिव यांनी माहिती दिली की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार प्राप्त झाले असून त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे या संदर्भात शासनाने सन २०२१ मध्ये अधिसूचना काढलेली आहे, त्याचे पालन करण्यात येते. उक्त अधिसूचनेनुसार एमपीएससीकडून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्तीसाठी एका विभागाचा विकल्प देता येतो. त्यांना गुणवत्तेनुसार त्यांच्या पसंतीच्या विभागामध्ये नियुक्ती देण्यात येते व उर्वरित उमेदवारांना विकल्पानुसार विभाग मिळाला नसेल तर चक्राकार पध्दतीने वेगवेगळ्या विभागात नियुक्ती देण्यात येते. त्याचे एक सूत्र आहे. सदरहू कार्यवाही पारदर्शक असून त्यामध्ये मानवी हस्तक्षेपास वाव नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, एलएसएसच्या जागा भरण्यात आल्या आहेत काय, यावर सह सचिव यांनी समितीस विदित केले की, एलएसएसच्या २६१ जागा कंत्राट पध्दतीने यावर्षी भरण्यात आल्या आहेत. एलएसएसची नियमित पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून वित्त विभागास नस्ती सादर करण्यात आली आहे. उक्त पद भरतीसाठी विभागाचा आकृतीबंध निश्चित करून कार्यवाही करावी लागणार आहे. ४३२ पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती व तेवढे पात्र उमेदवार विभागाला मिळाले आहेत. नव्याने २१२ पदे भरण्यासाठी पुन्हा जाहिरात देण्याची विनंती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला करण्यात आली आहे. पुढील १ वर्षात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उक्त उमेदवार निवड होऊन मिळाले तर सुमारे ९० टक्के रिक्त पदे भरली जातील. उर्वरित वर्ग ३ व ४ ची पदे भरण्यासाठी आकृतिबंध मंजूर करून ती पदे भरावी लागणार आहेत. डॉक्टरांना अडचण येऊ नये म्हणून तात्पुरती व्यवस्था म्हणून एलएसएसच्या २६१ जागा कंत्राट पध्दतीने यावर्षी भरण्यात आल्या आहेत. उक्त नियमित पदे भविष्यात भरण्याचा मानस आहे. यावर समितीने उक्त संदर्भात संबंधितांना विभागाने पत्र देण्याबाबत निदेश देण्यात आले यावर सह सचिव यांनी होकारात्मक आश्वासन दिले.

समितीने पशुसंवर्धन विभागातील पदोन्नतीच्या नस्त्या जिल्हा परिषदेकडे प्रलंबित असल्याबाबत विचारणा केली असता पशुसंवर्धन विभागामध्ये सद्यःस्थितीत पदोन्नतीच्या संदर्भातील एक ही प्रकरण प्रलंबित नाही, याबाबतीत पशुसंवर्धन विभाग एकमेव असेल. एक पदोन्नतीची नस्ती मुख्यमंत्री महोदयांकडे पदस्थापनेसाठी सादर करण्यात आली आहे. यावर समितीने जिल्हा पातळी स्तरावर अनेक पदोन्नतीची प्रकरणे प्रलंबित आहेत. पदोन्नतीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत जिल्हा परिषदेला सूचना देण्यात याव्यात. यावर सह सचिव यांनी समितीस अशी माहिती दिली की, जिल्हा परिषद स्तरावरील पदांच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यांचा आढावा घेण्याबाबत विभागाला सूचित केले. समितीने अशीही विचारणा केली की, पशुसंवर्धन विभाग राज्य पातळीवरील पदोन्नतीची प्रकरणे हाताळतो, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून हाताळण्यात येतात . पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा परिषदेवर नियंत्रण नाही काय , यावर सह सचिव यांनी समितीस विदित केले की, आम्ही जिल्हा परिषदांना कळवू शकतो. जिल्हा परिषदेला पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत सूचित करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागनिहाय वातावरणानुसार जनावरांचे ब्रीड त्या विभागांना वाटप केले पाहिजे. विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील वातावरण वेगळे आहे. विदर्भामध्ये पुर्वी जरशी गायीचे ब्रीड वापरण्यात येत होते ते फारसे सफल झाले नाही. आपल्याकडे किती गायींचे ब्रीड आहे, यावर सहसचिव, पशुसंवर्धन यांनी समितीला अवगत केले की, कंधारी, देवणी, गीर, सेवाल या गायींचे ब्रीड आहे. यासंदर्भात राज्य सरकारने एक महत्त्वाचा कार्यक्रम हाती घेतला असून आता देशी गायीच्या ब्रीडला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. गोवंशामध्ये बैलांचे महत्त्व हळूहळू कमी होत असून तंत्रज्ञानाचा विकास झाल्याने त्यांच्या ऐवजी आता ट्रॅक्टरचा वापर करण्यात येत आहे. बैलांच्या ऐवजी गायींची संख्या वाढविण्याकरिता सेक्सॉर्टेस् सीमेनचा वापर करून भविष्यात दुग्धोत्पादनाला चालना देण्यासाठी देशी गायींच्या माध्यमातून गुणवत्तेच्या गायी व पशू तयार होतील. या दृष्टीकोनातून राज्य सरकारने फार मोठा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. हे तंत्रज्ञान जगभरातील फार कमी कंपन्यांकडे आहे. उक्त तंत्रज्ञान १०० रुपयांपेक्षा कमी किंमतीमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहोत. यासाठी पूर्वी १ हजार रुपये इतका खर्च येत होता तो साधारणतः ५०० ते ६०० रुपयांवर आणला व उर्वरित खर्च शासन करीत असून १०० रुपयांच्या आत खर्च येतो. हा खर्च स्थानिक संस्था किंवा सहकारी साखर कारखान्यांनी सोसून शेतकऱ्यांना मोफत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले तर शून्य खर्चामध्ये शेतकऱ्यांना चांगल्या देशी गायी उपलब्ध होतील. यासाठी प्रयत्न सुरू आहे. फिरते पशु चिकित्सालयाचा निर्णय संपूर्ण राज्यासाठी घेण्यात आला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, सन २०२०-२१ अखेर जमीन महसूल उपकर अनुदान १४,२३, ९७,८३२ व त्यावर्षात माफ केलेला वाढीव उपकर २१,११, ८३,७६४ रुपये इतके अनुदान थकीत आहे. तसेच मुद्रांक शुल्क अनुदान सन २०२०-२१ अखेर १३,७७, ६७,००० रुपये शासनाकडून येणे प्रलंबित आहे, ते अद्याप प्राप्त झाले नाही, त्यासंदर्भात ग्रामविकास विभागाने वित्त विभागाकडे किती वेळा पाठपुरावा करण्यात आला, अनुदान न देण्याचे कारण काय यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सह सचिव, महसूल विभाग यांनी समितीस अवगत केले की, मुद्रांक शुल्कावरील अधिभार रक्कम वित्त विभागाकडे जमा करण्यात येतो. महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील उक्त अधिभार रकमेची यादी एक वर्षात तयार करून ती संबंधित विभागाला पाठविण्यात येते. सदरहू जिल्हा परिषदेच्या जमीन महसूल उपकराची निधी यादी ग्रामविकास विभागाला पाठविण्यात आली आहे. ग्रामविकास विभाग उक्त निधी वित्त विभागाकडून अर्थसंकल्पात मंजूर करून महसूल विभागास पाठवतो, त्यांनतर तो निधी जिल्हा परिषदेला देण्यात येतो. ग्रामविकास विभागाकडून जेवढा निधी प्राप्त झाला आहे तो जिल्हा परिषदांना देण्यात आला आहे. जो निधी मंजूर करून घेण्यात आला आहे तो निधी वित्त विभागाकडून प्राप्त करून महसूल विभागास उपलब्ध करून दिला तर तो जिल्हा परिषदांना देण्यात येईल यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीला सादर केलेल्या माहितीबाबत वस्तुस्थिती सांगण्याबाबत सूचना केली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेच्या वतीने जमीन महसूल व उपकराची वसुली जिल्हाधिकारी यांच्या यंत्रणेमार्फत करण्यात येते. मुद्रांक शुल्काची वसुली आयजीआर यंत्रणेमार्फत करण्यात येते. स्वउत्पन्नाच्या मार्गाने मिळालेली रक्कम सेस फंडामध्ये जमा होते. ही रक्कम शासनाकडून जिल्हा परिषदेला वर्ग करण्यात येते. सन २०२०-२१ अखेर जिल्हा परिषदेला उपकराचे उत्पन्न मिळाले पाहिजे होते ते मिळाले नाही. त्याची माहिती सादर करण्यात आली आहे. **(परिशिष्ट क्रमांक १. ३)** सन २०२०-२१ अखेर जमीन महसूल व उपकर तसेच माफ केलेला वाढीव जमीन महसूलाची ३५. ३५ कोटी रुपये रक्कम येणे होती ती अद्याप प्राप्त झाली नाही. मुद्रांक शुल्काची १३. ७७ लाख रुपये रक्कम प्राप्त झाली नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामविकास विभागाने उक्त निधीसाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा केला आहे उक्त निधी पाठपुरावा करूनही मिळत नसल्याने योजना राबविण्यास अडथळा येत आहे. यावर सह सचिव, महसूल यांनी समितीस विदित केले की, महसूल विभागाने उक्त थकबाकी निधी मिळण्याकरिता पाठपुरावा करण्यासाठी ग्राम विकास विभागाला कळविले आहे. त्यांनी उक्त निधी वित्त विभागाकडून अर्थसंकल्पामध्ये मंजूर करून महसूल विभागाला पाठवावयाचा असतो.

समितीने उक्त पाठपुराव्याची सद्यःस्थिती विचारली असता उप सचिव ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, सर्व जिल्हा परिषदांना थकीत अनुदान वितरित करण्यासाठी आगामी हिवाळी अधिवेशनात ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून वित्त विभागाकडे पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. परंतु २०२१-२२ या वर्षातील वितरित तरतूद ७५ टक्के पेक्षा कमी खर्ची पडत असल्यामुळे वित्त विभागाने ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून सादर करण्यात आलेली पुरवणी मागणी नाकारलेली आहे. वित्त विभागाकडून अर्थसंकल्पीय अंदाज व मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी प्रमाणात जमीन महसूल, उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क अनुदान वितरित करण्यात येते आणि त्यामुळे अनुदान थकीत राहते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, उक्त निधीतून योजना चांगल्याप्रकारे राबविता येतात समितीच्या माध्यमातून वित्त विभागाकडे या विषयाच्या संदर्भात शिफारस करण्यात येईल.

वृद्ध कलावंत निवडीचा वार्षिक इष्टांक वाढवून मिळणे बाबतचा विषय समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी उपस्थित झाला होता. त्यानुषंगाने शासनाने ६० ऐवजी १०० इतका इष्टांक वाढवून दिला आहे व त्यामध्ये माहे फेब्रुवारी, २०१४ मधील नियमानुसार वृद्ध कलावंताची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, अशी समितीला माहिती देण्यात आली. याबाबत समितीने विचारणा केली असता आयुक्त, समाज कल्याण यांनी समितीस विदित केले की, सदरहू प्रकरणी इष्टांक वाढविला असून निवड करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येते. उक्त प्रकरणी सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिल्या आहेत. समितीने अशी विचारणा केली की, वृद्ध कलावंतांना किती मानधन देण्यात येते यावर आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस असे विदित केले की, या प्रकरणी तीन प्रकारची वर्गवारी करण्यात आली आहे. अ वर्गवारीतील राष्ट्रीय कलावंतांना पूर्वी दरमहा २,१०० रुपये मानधन देण्यात येत होते आता ३,१५० रुपये मानधन देण्यात येते. ब वर्गवारीतील राज्यस्तरीय कलावंत यांना पूर्वी दरमहा १,८०० रुपये मानधन देण्यात येत होते ते आता २,७०० रुपये देण्यात येत आहे. क वर्गवारीतील स्थानिक कलावंत यांना दरमहा १,५०० रुपये मानधन देण्यात येत होते ते आता २,२५० रुपये इतके देण्यात येत आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणी जिल्हा स्तरावर अशासकीय समिती गठीत करण्यात येते ती अनेक जिल्ह्यांमध्ये गठीत करण्यात आली नाही. त्यामुळे वृद्ध कलावंतांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे २-३ वर्षापासून प्रलंबित आहेत. संजय गांधी योजना व इतर योजनांच्या संदर्भात तहसिलदार यांना अधिकार देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे या योजनेसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर अधिकारी यांना अधिकार देऊन वृद्ध कलावंत यांची निवड केली पाहिजे. उक्त समितीमध्ये अद्याप अशासकीय सदस्य यांची निवड करण्यात आली नाही. या प्रकरणी उशीर झाल्याने २-३ वर्षे प्रस्ताव प्रलंबित राहतात. या प्रकरणी संबंधितांना अधिकार प्रदान करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात तसेच उक्त समितीचे काम अशासकीय सदस्य नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहत असल्यामुळे अधिकाऱ्यांनी बैठका घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढले पाहिजेत. समितीने दिलेल्या निदेशानुसार आयुक्त समाजकल्याण यांनी उक्त प्रकरणी सूचना देऊन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले.

समितीने अशीही विचारणा केली की, अ, ब व क वर्गवारीतील लाभार्थी किती आहेत व “अ”, “ब” आणि “क” निवडीचे निकष

आहेत. राष्ट्रीय स्तरावर ही निवड कोणी करायची यावर आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस माहिती दिली की, अ वर्गवारीमध्ये १३, ब वर्गवारीमध्ये १४ व क वर्गवारीमध्ये १,४८६ लाभार्थी आहेत, ही जिल्हा स्तरावरील माहिती आहे. तसेच जिल्हास्तरीय समिती आहे. त्यांच्या निकषानुसार जिल्हास्तरीय समितीला निवडण्याचे अधिकार आहेत. यावर समितीने असे सूचित केले की, अशासकीय सदस्यांऐवजी नॉमिनी सदस्य म्हणजे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, समाजकल्याण सभापती, आमदार, सभापती, माजी अधिकारी असे करण्याची गरज आहे. यासंदर्भात असा शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता आहे. उक्त सूचेनेनुसार आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस असे विदित केले की, समितीने दिलेल्या सूचनेनुसार आम्ही सांस्कृतिक कार्य विभागाला समितीने केलेली सूचना पुढील कार्यवाहीसाठी पाठविणार आहोत. कारण सांस्कृतिक कार्य विभागाकडून शासन निर्णय निर्गमित होतो. आमच्या विभागाकडून केवळ निधी देण्याचे काम केले जाते.

समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक शाळांना संरक्षक भिंत बांधणे यामध्ये ८८ कोटी ४४ लाख ३५ हजार रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे नमूद केलेले आहे. त्या शाळांच्या संरक्षक भिंतीच्या कामासाठी सद्यःस्थिती काय आहे तसेच राज्यातील सर्व शाळांच्या संरक्षक भिंतीचे काम कधीपर्यंत पूर्ण होईल , यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हापरिषदेने, ग्रामविकास विभागाने आणि शालेय शिक्षण विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. वेगवेगळ्या निधीतून फंड उपलब्ध होतात. निधीच्या उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, आवार भिंत (कम्पाऊंड वॉल) बांधण्यासाठी डीपीडीसीमध्ये लेखाशीर्ष नाही आणि राज्य स्तरावरुन शालेय शिक्षण विभाग पैसे देत नाही. मग कामे कशी करणार लेखाशीर्ष निर्माण करून प्रत्येक जिल्ह्यांत अमुक शाळा बांधल्या पाहिजेत असे टार्गेट देण्याची आवश्यकता आहे. शाळा दुरुस्तीचा हेड आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये मुला-मुलींसाठी शौचालये नाहीत. तसेच त्यांच्या शाळेच्या भोवती जनावरांचा वावर असतो. त्या ठिकाणी एखादा अपघात झाला तर त्यास जबाबदार कोण आहे. उणिवांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. डीपीडीसीच्या धर्तीवर एखादा लेखाशीर्ष निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने नियोजन विभागाकडे योग्य तो पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस माहिती दिली की, दिनांक ३० मार्च २०२१ रोजी शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे **(परिशिष्ट क्रमांक १. ४)**. डीपीडीसीच्या योजनेत आवार भिंत आणि कुपंन घालण्याचा समावेश केलेला आहे. समितीला या समितीने अशी सूचना केली की, सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता डीपीडीसीने प्रस्तावित आराखडा तयार केलेला आहे. त्यामध्ये या बाबींचा कोणताही समावेश केलेला नाही. जिल्हापरिषदेतील शिक्षण विभागाला कळविण्यात यावे. यावर अपर मुख्य सचिवांनी होकारात्मक आश्वासन दिले. समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये बऱ्याचशा अडचणी येतात. मुलींचा विनयभंग आणि छेडछाड केली जाते. अतिक्रमणाचा देखील विषय आहे. ग्रामीण भागातील शाळेच्या अवतीभवती किंवा जागेवर बरीचशी अतिक्रमणे झालेली आहेत. यावर अपर मुख्य सचिवांनी समितीला शिक्षण विभागाकडून पुनश्च एकदा सूचना दिल्या जातील असे आश्वासित केले.

समितीने असे मत व्यक्त केले की, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये ( एमआरईजी) हेडला कन्व्हर्जन दिले तर आपल्या विभागाला अधिकची कामे करता येतील. राजस्थान आणि मध्यप्रदेशने महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्ये (एमआरईजीएस) आवश्यक त्या सुधारणा केलेल्या आहेत. त्या ठिकाणी २५ हजार कोटी रुपयांचा खर्च केला जातो. मग आपल्या राज्यात असे का होत नाही, यावर अपर मुख्य सचिव मृद व जलसंधारण यांनी समितीस विदित केले की, जळगाव जिल्ह्याने अशा प्रकारची कार्यवाही केलेली आहे. अभिस्सारण आणि संयोजन नावांची संकल्पना आलेली आहे. त्यामुळे बॉन्ड्रीवॉल ६०:४० च्या रेश्योमध्ये बसत नसेल तर इतर कामे करून कुशल झालेली असतील तर त्याचा वापर करावयाचा असतो. परंतु, यंत्रणा म्हणावी तशी नियोजन करीत नाही. त्यामुळे मागील ५ वर्षात १ हजार ९०० कोटी रुपये वापरु शकलो नाही. या वर्षी जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये जाऊन प्रयत्न करीत आहोत. त्यानुसार नियोजन केले जात आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मातोश्री नावाची नवीन योजना आलेली आहे. वॉलचे बांधकाम करता येईल. ग्रामीण भागात यंत्रणेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. जिल्हा-जिल्ह्यात मजुरांची यादी ही त्यांच्या खात्यावर लिंक केली जात असताना खूप वाईट अवस्थेला तोंड द्यावे लागत आहे. गट विकास अधिकारी (बीडीओ) आणि ग्रामसेवक तयार होत नाहीत मजुराचे काम मजुराला करावे लागते. यावर अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण यांनी समितीस विदित केले की, मजुरांनी काम केल्यानंतर ते कुशल अतिरिक्त शिल्लक राहते. त्याचा वापर करताना मजुरांनी कामे करण्याची गरज नाही. मातोश्री पांदण रस्त्यामध्ये रोजगार हमी योजेनतील निधी वापरला जातो. १ कि. मी. रस्त्यासाठी २४ लक्ष रुपयांचा खर्च येतो. १७ लक्ष मनरेगा आणि ९ लक्ष राज्य रोजगार हमी योजनेतून वापरावा असे आमच्या विभागाने सांगितले आहे. जिल्हा पातळीवर ६०:४० असे प्रमाण ठेवण्याची गरज असते. या राज्यात ८०:२० असे प्रमाण होते. आता राज्याचा २० टक्के तोटा होत आहे. ६०:४० वर आणण्यासाठी कुशल मटेरिअल वापरण्याची गरज आहे. समितीने असे मत व्यक्त केले की, आमदार निधीसाठी २५१५ लेखाशीर्ष आहे. आयसीडीएस किंवा शाळेचा विषय आहे.

सर्व योजना क्लब करून राबविली तर तिचा चांगला फायदा होणार आहे. राजस्थानने अनेक योजना क्लब करून राबविलेल्या आहेत. ग्रामपंचायत भवन होत असेल तर त्या ठिकाणी शासनाचा हेड अधिक एमआरईजीएस क्लब करून बांधकाम करण्याची आवश्यकता आहे. यामधून चांगली कामे झालेली आहेत. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, सन २०१८ पासून एकूण २८ कामांना असे क्लब करून अभिस्सरण असा मराठी शब्द वापरला आहे आणि इंग्रजीमध्ये कन्व्हर्जन शब्द वापरला आहे. सन २०१८ मधील शासन निर्णय हा २८ कामांसाठी होता. यावर्षी ३० मार्च, २०२१ रोजी आमच्या विभागाने २६२ कामे रोजगार हमी योजनेत अनुज्ञेय असून, ती सर्व कामे त्यामध्ये समावेश केलेली आहेत. जिल्ह्या-जिल्ह्यात जाऊन आम्ही बैठका घेत असून, त्यामध्ये संबंधितांना सांगत आहोत. समितीने असेही मत व्यक्त केले की, कनिष्ठ पातळीवरील यंत्रणा अधिक गतीमान करण्यासाठी योग्य तो पाठपुरावा करण्याची गरज आहे. यावर अपर मुख्य सचिवांनी माहिती दिली की, आपले राज्य रोजगार हमी योजनेचे जनक आहे. त्या काळात जो विचार होता तो विचार बदलण्यासाठी वेळ लागत आहे. हे मुख्य काम आहे. प्रत्येक दारिद्र्यरेषेखाली ४० मनुष्यबळ दिवस निर्माण करते आपले राज्य ३ मनुष्यबळ दिवस करीत आहे. यावर चर्चा सुरू आहे. आपल्याकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. तसेच अनेक वेळा पदे रिक्त असल्यामुळे कामे देखील होत नाही तसेच त्यावेळी संगणक नसल्यामुळे खूप अफरातफरी होत होत्या. सन २०१५ पासून नरेगासाठी एक सॉफ्टवेअर आलेले आहे. सन २०१७ पासून सेक्युलर नावाचे अजून एक सॉफ्टवेअर आलेले आहे. चौकशी फार होते. मागील ७ ते ८ वर्षात किती विभागीय चौकशीच्या प्रकरणांचा एक चार्ट केला होता. सन २०१५ पासून विभागीय चौकशींचे प्रमाण खूप कमी झालेले आहे. समितीने असे सांगितले की, त्या प्रमाणात कामे देखील कमी झालेली आहेत. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस आश्वासित केले की, सन २०१० मध्ये १७६ कोटी रुपयांची कामे होती. या कामांची संख्या वाढून ती आता २ हजार कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. आपल्याला १० हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठावयाचा आहे.

ग्रामविकास विभागातील आरोग्य सेवा संवर्ग रिक्त पदे, ग्रामसेवक आणि इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत समितीने विचारणा केली असता उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, आरोग्य सेवेशी निगडित ग्रामविकास विभागातील पदे आहेत. आरोग्य सेवक, सेविका, प्रयोग शाळा तंत्रज्ञ, आरोग्य पर्यवेक्षकांची पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. सुधारित व्हॅकन्सी मॅट्रिक्स मागविलेला आहे. आता आरोग्य विभागातील भरती प्रक्रिया राज्याने राबविली होती. ग्रामविकास विभागातील पदे लवकरात लवकर भरली जातील अशी अपेक्षा आहे. व्हॅकन्सी मॅट्रिक्स आहे. म्हणजे एसईबीसी, अनुकंपा याची सुधारित माहिती मागविलेली आहे. त्यानुसार भविष्यात भरती प्रक्रियेला सुरुवात होणे अपेक्षित आहे. यावर समितीने विचारणा केली की, ७०९ पदे रिक्त असल्याचे शासनास अवगत केलेले आहे. याबाबत शासनाला केव्हा कळविले आणि आतापर्यंत भरती प्रक्रियेची कार्यवाही का केली नाही , सन २०१८ मधील परिच्छेद आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आरोग्य विभागातील ५ संवर्ग आहेत. यामध्ये औषध निर्माता, आरोग्य सेवक पुरुष, आरोग्य सेवक महिला, अंगणवाडी पर्यवेक्षक आणि विस्तार अधिकारी आहेत. पेसा आणि नॉन पेसामधील ७०९ पदे आहेत. ६७८ पदे ही नॉन पेसा आणि ३१ पदे ही पेसा विभागातील आहेत आणि ती रिक्त आहेत. सन २०१९ मध्ये ग्रामविकास विभागातील रिक्त पदांसाठी जाहीरात वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली होती. त्यानंतर अर्ज मागविले होते. त्यानंतर आतापर्यंत भरती प्रक्रिया राबविलेली नाही. वित्त विभागाने अत्यावश्यक सेवा वगळून भरती प्रक्रियेला मान्यता दिलेली नाही. आता या पदांपैकी जिल्हापरिषदेतील ग्रामविकास आणि आरोग्य विभागातील पदे आहेत. ही पदे भरण्यासाठी मान्यता मिळाली आहे. त्यानुसार पुढील प्रक्रिया सुरू आहे. आरक्षणाच्या बाबतीत चर्चा सुरू झालेली आहे. अपगांचे आरक्षण एक टक्क्यांनी वाढलेले आहे. एसबीसी आणि एसईबीसीसाठी आरक्षण आहे. या अनुषंगाने मंत्रालयाने सर्व जिल्हापरिषदांकडून सुधारित आवश्यक ती माहिती मागविलेली आहे.

सदरहू माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन महिन्यामध्ये आरोग्य विभागाची पदे भरली जातील. ग्रामसेवकांची ९६ पदे रिक्त असून ग्रामविकास अधिकाऱ्यांची २८ पदे रिक्त आहेत. शासन स्तरावरुन दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी सेंट्रल जाहिरात देण्यात आली होती. त्यामध्ये ९६ पैकी ६२ पदांचा समावेश आहे. परंतु पुढील भरती प्रक्रिया झालेली नाही. अत्यावश्यक पदे वगळता इतर पदभरती सध्या बंद आहे. २८ ग्रामविकास अधिकाऱ्यांपैकी ७ ग्रामविकास अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन सुरू आहे. तसेच सरळसेवेच्या बाबतीत वित्त विभागाने तुर्तास पदे भरु नयेत, असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सरळसेवेची पदभरती झाली नाही. यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीमध्ये लिपिक-टंकलेखकाचे पद असते. त्या पदांच्या पदोन्नतीमधून ग्रामसेवकाचे पद भरले जाते काय तसेच अनुकंपा तत्वावरुनही अशी पदभरती करता येते किंवा कसे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लिपिक टंकलेखकांच्या पदोन्नतीमधून ग्रामसेवकाचे पद हे रिक्त पदांच्या दहा टक्के पदे भरता येतात तसेच अनुकंपा तत्वावरुन १० टक्के पदे भरण्याची मर्यादा होती. त्यामध्ये आता वाढ करून ती २० टक्क्यांपर्यंत भरता येतात. त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. मागील वर्षामध्ये काही पदे भरण्यात आली असून चालू वर्षातील रिक्त पदे विहित मर्यादेच्या अधीन राहून भरली जातील. समितीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून दहा टक्के पदे कोणत्या वर्षापर्यंत भरण्यात आलेले आहेत अशी विचारणा

केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, सन २०१९ पर्यंत ही पदे भरण्यात आली आहेत. सन २०२० करिता परवानगी दिलेली नाही.

समितीने अशी विचारणा केली की, अनुकंपा तत्वावर भरती करण्याबाबतचा वयाची अट ४५ वर्षे इतकी आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबतचे धोरण राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून मान्य केले जाते. हे धोरण सामान्य प्रशासन विभागाचे आहे. समितीने शिफारस केली तर त्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपल्याकडे अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी अर्ज प्राप्त झाले तर त्यावर काय कार्यवाही केली जाते , अनेकांची वयाची ४५ वर्षे पूर्ण होऊनही त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळालेली नाही. यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस सांगितले की, अनुकंपा तत्वावरील नोकरीचे धोरण सामान्य प्रशासन विभागाचे आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार त्या अर्जांवर कार्यवाही केली जाते. यावर समितीने आपले मत स्पष्ट केले की, सदरहू नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये वयोमार्यादा पूर्ण झाल्यानंतर नोकरी मिळाली नसेल तर तो व्यक्ती ज्यांचे नामनिर्देशित करेल त्याला नोकरी दिली पाहिजे. यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी माहिती दिली की, यात दोन पर्याय आहे. एखादा कर्मचारी मृत झाल्यानंतर त्याच्या पत्नीचे वय ४५ पेक्षा अधिक असेल तर त्या व्यक्तीच्या मुलासाठी अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी पर्याय उपलब्ध करून दिला जातो. तो मुलगा त्याच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर १ वर्षाच्या कालावधीत अर्ज करु शकतो. यात दोन्ही पर्याय दिलेले आहेत. समितीने अशीही विचारणा केली की, अशा प्रकारणांमध्ये काही प्रस्ताव आपल्या विचाराधीन आहेत काय ज्यांचे वय ४५ च्या पुढे असेल त्यांच्या सूचनेनुसार त्या व्यक्तीच्या रक्ताच्या नात्यातील जो नोकरीसाठी देय आहे अशा व्यक्तीला अनुकंपा तत्वावर नोकरी देता येते काय, यावर उप सचिव यांनी समितीस सांगितले की, आमच्या स्तरावर असा प्रस्ताव विचाराधीन नाही. पुढे समितीने अशीही विचारणा केली की, एखादा कार्यरत कर्मचारी मृत पावल्यानंतर जर त्याची पत्नी अशिक्षित असेल तर त्या वेळेस त्या व्यक्तीच्या मुलांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत अनेक वर्षाचा कालावधी जात असतो. ज्यावेळेस तो व्यक्ती मृत पावतो त्यावेळेस त्याच्या मुलाचा अर्ज स्वीकारता येत नाही काय , पत्नी अशिक्षित असेल तर तिलाही नोकरी देता येत नाही. यात काही बदल करता येतो काय तसेच पत्नी मृत पावली असेल तर त्यासाठी तरतूद आहे काय, यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार मृत पावलेल्या व्यक्तीची पत्नी शासनाच्या प्रतिक्षायादीवर असेल आणि त्या महिलेला तिच्या वयाच्या ४५ वर्षापर्यंत नोकरी मिळाली नाही तर त्या प्रतिक्षा यादीतील नाव बदलण्याची तरतूद सध्याच्या नियमांमध्ये नाही. त्यामुळे तो प्रस्ताव रद्द होतो. याबाबत समितीने शिफारस केली तर सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. पत्नी मृत पावली असेल तर प्रतिक्षा यादीवरील नाव बदलण्याचे प्रावधान नाही. समितीने असे मत व्यक्त केले की, यामुळे त्या पात्र व्यक्तीचा अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्याचा नैसर्गिक अधिकार डावलला जातो. तसेच एखादी अशिक्षित महिला असेल तर तिला नोकरी मिळू शकत नाही. त्या महिलेच्या उदरनिर्वाहासाठी ठराविक रक्कम त्या महिलेस देता येते काय , यावर संचालक, स्थानिक निधी संचालनालय यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या सध्याच्या शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, पती वारल्यानंतर पत्नीने अनुकंपासाठी अर्ज केला असेल आणि त्या महिलेची मुले कमी वयाची असतील आणि दुर्दैवाने ती महिला तिच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच मृत पावली असेल तरच त्या महिलेच्या मुलांना अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी अर्ज करता येतो. त्यामुळे पत्नी मृत पावली तरच त्या महिलेच्या मुलांना लाभ मिळेल आणि ती महिला मृत पावली नसेल व तिला ४५ वर्षे वय पूर्ण झालेले असेल तर ते कुटुंब अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी वंचित राहते. त्यामुळे अनुकंपा तत्वारील नोकरीचा लाभ देण्याचा उद्देश असफल होतो. त्यामुळे या गोष्टींचा विचार होण्याची आवश्यकता आहे. माझ्या माहितीप्रमाणे सध्या मॅटमध्ये अशी तीन ते चार प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत. माननीय न्यायालयाने ही वस्तुस्थिती मान्य केलेली आहे आणि काही ठिकाणी नोकरी देण्याबाबत आदेश दिले होते. अनुकंपा तत्वाचा मूळ उद्देश सफल झाला पाहिजे. सदरहू बाब धोरणात्मक असून त्याबाबत निर्णय घ्यावा लागेल.

समितीने एक प्रकरणाबाबत उदाहरण दिले की, एक कर्मचारी मृत झाले होते. त्या व्यक्तीच्या पत्नीने अनुकंपासाठी अर्ज केला नाही. ती अशिक्षित महिला आहे. त्या महिलेची मुले सध्या इयत्ता १२ वी उत्तीर्ण आहे. असे असताना त्या महिलेचा अर्ज नाकारण्यात आला आहे. यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, त्या महिलेच्या मुलाने वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक वर्षात अर्ज केला तर त्याचा विचार केला जातो. ही प्रकरणे सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात येतात तसेच ज्यावेळेस अशी प्रकरणे येतात त्यावेळेस नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्या महिलेच्या मुलाला सांगावे की, त्याच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अर्ज करावा. हे सांगण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या आस्थापनेची आहे . समितीने अशी विचारणा केली की, परंतु संबंधित विभागाच्या आस्थापनेने ही बाब त्या मुलास कळविली नसेल आणि नंतर त्यांनी अर्ज केला तर तो अर्ज नाकारण्याची कारणे काय आहेत व यातील नियमात सुधारणा करावी लागेल. आस्थापनेने त्याला कळविले नसेल तर तो मुलगा ज्यावेळेस अनुकंपा नोकरीसाठी क्लेम

करेल तेव्हापासून त्याला नोकरी दिली पाहिजे. या विषयावर सकारात्मक निर्णय झाला पाहिजे, अशा प्रकारची शिफारस समितीमार्फत करण्यात यावी. असे समितीने निदेश दिले.

समितीने अशी विचारणा केली की, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविले जाते. यात ग्रामपंचायतीला जो पुरस्कार दिला जातो तो कमी आहे. यावर सह सचिव, पाणी पुरवठा यांनी समितीस विदित केले की, यात लोकसंख्येनुसार बदल करावा, अशी सूचना करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक २३ जुलै रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यामध्ये त्या सूचनेचा विचार करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तशा प्रकारचा निर्णय झालेला नाही. त्यात असा निर्णय झाला की, पुर्वीप्रमाणेच प्रभाग स्तरावर ग्रामपंचायतीमधील प्रथम उत्कृष्ट प्रभागाकरिता १० हजार रुपये व ग्रामपंचायतीला पंचायत समिती स्तरावर ५० हजार रुपयांचा पुरस्कार दिला जातो. यात ग्रामंपचायत निकष गृहीत न धरता लोकसंख्या हा निकष गृहीत धरावा असा निर्णय झाला नाही. विभागाने ग्रामपंचायत असा निकष ठेवून निर्णय घेतला आहे यावर समितीने समाधान व्यक्त केले.

समितीने अशी विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागातील वर्ग-३ व वर्ग -४ कर्मचाऱ्याच्या आकृतीबंधाबाबत काय वस्तुस्थिती आहे यावर विभागीय सचिवांनी असे विशद केले की, वर्ग - १ व वर्ग - ४ च्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध सादर केला आहे. त्या आकृतीबंधामध्ये काही त्रुटी आढळून आल्या होत्या. त्या त्रुटींची पुर्तता करून आकृतीबंध सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला आहे. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शवून सूचना केली की, सदरहू विषयाबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देण्यात व याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

समितीने अशी विचारणा केली की नगरपालिकेतील थकित शिक्षण कर जिल्हा परिषदांना मिळणेबाबत या मुद्यामध्ये १२.६६ कोटी रुपये इतक्या रकमेची शिक्षण कराची रक्कम थकीत आहे. ही रक्कम अदा न करण्याची कारणे काय आहेत यावर सह आयुक्त , नगरपालिका यांनी समितीस विदित केले की, सहा नगरपालिकांकडे सदरहू रक्कम शिल्लक आहे. ही रक्कम शिल्लक असल्याबाबत नगरपालिकेने तत्वतः मान्य केले आहे. यात काही ठिकाणी रकमेबाबत वाद आहेत. नगरपालिकेने विनंती केली की सदरहू रक्कम दुरुस्त करण्यासाठी वेळ मिळावा. नगरपालिकेच्या शाळेवर काही खर्च करण्यात आला असेल, इमारत दुरुस्ती केली असेल तर त्या खर्चाचे समावेशन करून शासनाकडून ती रक्कम समायोजन करावयाची आहे. तसेच १२.६६ कोटी रुपये ही रक्कम सहा नगरपालिकेची आहे. कोविड -१९ च्या काळात नगरपालिकांची वसुली झालेली नाही. त्यामुळे ही रक्कम एक रकमी भरणे शक्य नाही. सबब यासाठी हफ्त्यांमध्ये ही रक्कम अदा केली जाईल, अशी विनंती नगरपालिकांतर्फे करण्यात आली आहे. यावर समितीने अशी सूचना केली की, प्रत्येक नगरपालिकेचे उत्पन्न पाहून ही रक्कम लवकरात लवकर वसूल करण्याबाबत कार्यवाही करावी.

समितीने अशी विचारणा केली की, ग्राम विकास विभागातील वर्ग - ३ व वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांना राज्य स्तरावरील गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतनवाढ देणेबाबत माहिती देण्यात यावी. यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विशद केले की, आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे धोरण आहे. परंतु ते सहाव्या वेतन आयोगापासून बंद करण्यात आले आहे.

समितीने अशी विचारणा केली की, महिला व बालकल्याण विभाग, अहमदनगर अन्वये सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील बालके तसेच गरोदर व स्तनदा माता यांना पोहचविण्यात येणारा घरपोच आहाराच्या देयकावरील माहे एप्रिल, २०१६ ते माहे, फेब्रुवारी, २०२० या कालावधीतील प्रलंबित शुल्क रुपये ६ कोटी ७८ लाख ४५ हजार ६२८ रुपये जिल्हा परिषदेला मिळालेले नाही. याबाबतची मागणी करुनही ही रक्कम प्रलंबित आहे. तसेच ४ कोटी १९ लाख ३ हजार ८७१ रुपये प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे २ कोटी ६९ लाख रुपयेही शिल्लक आहेत. त्याचप्रमाणे १३ कोटी ६७ लाख अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेकडे शिल्लक आहे. ही रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, अभिकरण तत्वावर जिल्हा परिषदेच्या कृषी विभाग आणि महिला व बालकल्याण विभागामार्फत या योजना सुरू केल्या जातात. कृषि विभाग आणि महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषद करीत असते. यात ५ टक्के अभिकरण शुल्क देय असते. कृषि विभागाच्या योजनांचे देयक जिल्हा परिषद स्तरावरुन केले जाते. त्या पाच टक्के मधून ४ टक्के पेमेंट जिल्हा परिषदेकडून अभिकरण शुल्क म्हणून वजावट केले जाते. उर्वरित १ टक्क्यांची मागणी शासनाकडे केली जाते. कृषि विभागाची साधारणपणे ४५ लाख रुपयांची मागणी शासन स्तरावर प्रलंबित आहे **(परिशिष्ट क्रमांक १. ५).** महिला व बालकल्याण विभागाबाबत निदर्शनास आणण्यात येते की, सन २०१६ पासून आतापर्यंत साधारणपणे १३ कोटी ६७ लाख रुपयांचे अधिकरण शुल्क येणे शिल्लक आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या योजना जिल्हा परिषद राबवित असली तरी त्याबाबतच्या निविदा आयुक्त स्तरावरुन काढण्यात येत असतात. त्यामुळे ४ टक्के पेमेंट जिल्हा परिषद कट करीत नाही. याबाबतची मागणी वेळोवेळी आयोगाकडे आणि विभागाकडे करण्यात आली आहे. समितीने असे मत व्यक्त केले की, शासन स्तरावरुन निविदा प्रसिद्ध होत असतात. यामध्ये ठराविक लोकांनाच ही कामे मिळत असतात. यात धोरणात्मक निर्णयाची आवश्यकता

आहे. यापूर्वी कोणी निविदा मिळविलेल्या आहेत त्याची सविस्तर माहिती घेण्यात यावी. त्यानुसार जिल्हा स्तरावरुन याची निविदा प्रसिद्ध करण्याबाबत चर्चा करु. यावर उप सचिव ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, सन २०१९ मध्ये महिला व बालविकास विभागाने एक पत्र दिलेले होते. त्यामध्ये जिल्हा परिषदेकडे अभिकरण तत्वावर योजना राबविण्याकरिता दिल्यानंतर अभिकरण योजनेच्या तरतुदीमधून जिल्हा परिषदेला देय असलेल्या पाच टक्के अभिकरण शुल्कापैकी चार टक्के शुल्क जिल्हा परिषदेने संबंधित वर्षाच्या तरतुदीमधून वळते करून घ्यावे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही समितीस माहिती दिली की, सदरहू विषय टीएचआरसंदर्भातील आहे. याची निविदा राज्य स्तरावरुन होत असल्याने त्याबाबतचे पेमेंटही राज्य पातळीवरुन होते.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ०४ ते ०६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेत तसेच सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावर अनौपचारिक चर्चेच्यावेळी उपस्थित झालेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पुढील विषयांबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. "कृषी विभागाच्या योजना जिल्हा परिषदेला वर्ग करण्याबाबत, नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजुरीसह अस्तित्वात असलेल्या श्रेणी-२ दवाखान्याचा दर्जावाढ करणे, जिल्हा परिषदांना जमीन महसूल उपकर व मुद्रांक शुल्क थकबाकीचा निधी मिळण्याबाबत, वृध्द कलावंत निवडीचा जिल्ह्याला दिलेला वार्षिक इष्टांक वाढवून मिळणे, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना संरक्षक भिंत बांधकामासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत नवीन लेखाशीर्ष निर्माण करून निधी उपलब्ध होणेबाबत, जिल्ह्यातील आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी/आरोग्य सेवकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने आरोग्य सेवा पुरविण्यास अडचणी निर्माण होत असून नवीन मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी निधीची आवश्यकता असणे, जिल्ह्यात ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांसह इतर संवर्गाची अनेक पदे रिक्त असणे, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याची आवश्यकता, जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत, जिल्हा परिषद सेवेतील अनुकंपा भरती संदर्भात कार्यवाही करणेबाबत, नगरपालिकेकडील थकित शिक्षण कर जिल्हा परिषदेला मिळणेबाबत, जिल्हा परिषदेतील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना राज्य स्तरावरील गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाल्यानंतर एक वेतनवाढ देणेबाबत, जिल्हा परिषदेकडे जमा होणाऱ्या पाणीपट्टी उत्पन्नात होत असलेल्या कपातीबाबत व जिल्हा परिषदेला ४ % अभिकरण शुल्क मिळणेबाबत". सदरहू महत्वाच्या बाबीसंदर्भात सकारात्मक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्यासह या विभागांच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले.

- **कृषी विभागाच्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबत:-** ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे नवीन योजना राबविण्यासाठी येणे अपेक्षित असताना जिल्हा परिषदेकडील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या ठिबक सिंचन, तुषार सिंचन योजना व कृषी यांत्रिकीकरणाची योजना शासनाच्या कृषी विभागाकडे वर्ग करण्यात आल्या तसेच गळीत धान्य, तृणधान्य, ऊस, सधन कापूस व मका विकास कार्यक्रमास शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याचे, त्याचप्रमाणे कृषी संदर्भातील विविध परवाने देण्याचा अधिकारही जिल्हा परिषदेकडून काढून घेण्यात आला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती मिळाली की, "या प्रकरणाचे सविस्तर विश्लेषण करून ज्या योजना हस्तांतरीत करणे शक्य होते त्यापैकी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ३ व सेसच्या ७ असे एकूण १० योजना जिल्हा परिषदेकडून क्षमतेनुसार राबविण्यात येत आहेत **(परिशिष्ट क्रमांक १. १).** आता कृषी क्षेत्रात नवनवीन टेक्नॉलॉजीकल इंटरव्हेंशन मोठया प्रमाणात होत आहे त्यामध्ये जेनेटीकली मॉडीफाईड सीड, रिमोट सेंन्सीगचा वापर व पीक विम्यासंदर्भातील विषय जिल्हा परिषदेच्या क्षमतेत नाहीत. तथापि, क्वॉलिटी कंट्रोलच्या इनपुटचे अतिशय महत्वाचे काम जिल्हा परिषदेकडेच असून जिल्हा परिषदेमध्ये कृषी विभागाची पूर्वी जी पदे होती ती जशीच्या तशी व जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाची जी रचना होती तीच रचना आजही कायम आहे. तरी समितीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदरहू बाब पुन्हा मंत्री महोदयांसमोर मांडण्यात येईल असे सचिवांनी समितीस अश्वासित केले".

**शासनाकडून जिल्हा परिषदांचे अधिकार अबाधित रहावे व जिल्हा परिषदांमार्फत योजनांची अमंलबजावणी करण्यात आल्यास ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंतच्या अल्पभूधारक शेतकऱ्यांसह अन्य पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ देता येईल असे समितीचे मत असल्याने कृषी विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या योजना जिल्हा परिषदांकडे पुनश्च वर्ग करण्याबाबतची तपासणी शासनाने करून त्याअनुषंगाने योग्य निर्णय घ्यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

● **नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांना मंजूरी देण्यासह अस्तित्वात असलेल्या दवाखान्यांना दर्जावाढ करण्याबाबतः-** अहमदनगर जिल्ह्यात १६ लक्ष गोवर्गीय व महिषवर्गीय जनावरे असून सुमारे २३ लक्ष लिटर दूध रोज संकलित केले जाते. पशुधन संख्येनुसार जिल्ह्यात पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी असून अद्यापही ११४ दवाखान्यांचा अनुषेश आहे. जिल्हा परिषदेने स्वनिधीतून एकूण २५ दवाखाने सुरू केली आहेत. त्यापैकी १४ दवाखाने समायोजित झाली आहेत. परंतु अद्यापही ११ दवाखाने समायोजित झालेली नाहीत. तसेच अस्तित्वात असलेल्या श्रेणी-२ दवाखान्यांचा दर्जावाढ करण्याची आवश्यकता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी विदित केले की, "शासन निर्णयातील निकषानुसार ५ हजारांपेक्षा जास्त पशुधन असेल तर एक दवाखाना, डोंगरी व दुर्गम भागांमध्ये ३ हजार पशुधनासाठी एक दवाखाना निर्मिती करणे अपेक्षित असून ५ किलोमीटर अंतराच्या आत दुसरा दवाखाना असता कामा नये. सदरहू निकष राष्ट्रीय कृषी आयोगाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने स्विकारलेले आहेत. त्यानुसार ज्या ठिकाणी दवाखान्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे आता तेथे किती पशुधन आहे, कोणत्या ठिकाणी दवाखान्यांची आवश्यकता आहे व कार्यरत असलेल्या कोणत्या श्रेणी-१ / श्रेणी-२ दवाखान्यांची दर्जा वाढ करणे आवश्यक आहे याबाबतचा सर्वकष आढावा घेण्याची गरज आहे. याकरीता सर्व बाबींचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ रोजी अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. **(परिशिष्ट क्रमांक १.२)**".

**महाराष्ट्र राज्य हे दुधाच्या उत्पादनात देशातील अग्रेसर राज्य आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासह जनावरांना तज्ञ पशुवैद्यकांची चांगल्याप्रकारे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याकरीता नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन होणे आवश्यक असुन अस्तित्वात असलेल्या दवाखान्यांचा दर्जा वाढ करणे गरजेचे असल्याने पाच किलोमीटर परीघामध्ये ५ हजार जनावरांसाठी एक दवाखाना याबाबत असलेले निकष बदलून जनावरांची संख्या ३ हजार पर्यंत खाली आणावी, राज्यात नुकतीच सुरू करण्यात आलेली फिरती पशु स्वास्थ्य योजना प्रभाविपणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाहने उपलब्ध करून देण्यात यावी, देशी गायीच्या ब्रीडला प्रोत्साहन देण्यासह विभागनिहाय वातावरणानुसार कंधारी, देवणी, गीर, सेवाल या जनावरांचे ब्रीड वाटप करण्यात यावे. पशुसंवर्धन विभागातील रिक्त असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा तातडीने भरण्यात याव्यात, कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी गावांना भेटी देऊन पशुधनांना वैद्यकीय सेवा नियमीतपणे पुरविण्यासाठी याबाबतची कार्यपध्दती निश्चीत करावी, राज्यातील नादुरूस्त असलेल्या पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती व कर्मचाऱ्यांच्या निवास्थानांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. या सर्व महत्वाच्या बाबींची तपासणी करून अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने योग्य ती कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेने २११ नवीन पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविले आहेत. जिल्हापरिषद सेस योजनेमधून सुरू करण्यात आलेल्या ११ दवाखान्यांचे शासनाकडे समायोजना बाबतचे प्रस्ताव व जिल्ह्यातील ५५ श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करण्यासाठीचे प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. सदरहू प्रस्तावांवर योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

● **जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्काचे थकित अनुदान मिळण्याबाबत :-** अहमदनगर जिल्हा परिषद व जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती मिळून जमीन महसूल उपकर अनुदान व वाढीव उपकर अनुदान रकमेपोटी शासनाकडून रूपये ११ कोटी १० लाख व मुद्रांक शुल्कापोटी रूपये ८ कोटी ७५ लाख इतकी रक्कम येणे बाकी आहे. सन २०२०-२१ अखेर जमीन महसूल उपकर अनुदान रू. १४,२३,९७,८३२/- वाढीव उपकर रक्कम रू. २१,११,८३,७६४/- व मुद्रांक शुल्क अनुदान रू. १३,७७,६७०००/- इतकी रक्कम शासनाकडून येणे थकीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय सचिवांच्या साक्षीत महसूल विभागाच्या सचिवांनी समितीस माहिती दिली की, सदरहू थकित निधीबाबतची यादी **(परिशिष्ट क्रमांक १. ३)** ग्रामविकास विभागाला महसूल विभागाकडून पाठविण्यात आलेली आहे. ग्रामविकास विभाग उक्त निधी वित्त विभागाकडून अर्थसंकल्पात मंजूर करून महसूल विभागास उपलब्ध करून दिल्यानंतर तो निधी जिल्हा परिषदेला देण्यात येतो. ग्रामविकास विभागाकडून अद्यापपर्यंत प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदांना देण्यात आलेला आहे. यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले की, वित्त विभागाकडून कमी प्रमाणात जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क अनुदान वितरीत करण्यात येते त्यामुळे जिल्हा परिषदांचे अनुदान थकीत राहते. वित्त विभागाकडे पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती परंतु सन २०२१-२२ या वर्षातील वितरीत तरतूद ७५ टक्के पेक्षा कमी खर्ची पडत असल्याने सादर करण्यात आलेली पुरवणी मागणी वित्त विभागाने नाकारलेली आहे.

**ग्रामीण भागाचा विकास होण्याच्यादृष्टीने विविध योजना प्रभाविपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्या या महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्था असून यांना विहित वेळेत शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याने या योजनांची योग्य ती फलनिष्पत्ती होत नाही. यासाठी जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्काचे अनुदान जिल्हा परिषदांना शासनाकडून त्या-त्या वर्षी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यास्तव सदरहू अनुदानाचा निधी जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यासाठी महसूल विभागास विहित वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाकडून अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी अथवा पुरवणी मागणीच्या माध्यमातून सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांवर वित्त विभागाने प्राथम्यक्रमाने कार्यवाही करावी तसेच अहमदनगर जिल्ह्याचे सन २०२०-२१ पर्यंत प्रलंबित असलेले जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्काचे रू. १३,७७,६७०००/-इतके अनुदान तातडीने देण्याच्या दृष्टीने वित्त विभागाने योग्य ती कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

- **नगरपालिकेकडील थकित प्रथमिक शिक्षण अंशदान (शिक्षण कर) जिल्हा परिषदेस मिळणेबाबत :-** अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा, राहुरी, राहता, पाथर्डी, शिर्डी व श्रीगोंदा या ६ बिगर प्राधिकृत नगरपालिकांकडून रूपये १२. ६६ कोटी एवढ्या रकमेची प्रथमिक शिक्षण अंशदान (शिक्षण कर) जिल्हा परिषदेस येणे थकित आहे. याबाबत जिल्हा परिषदेकडून संबंधित नगरपालिकांना वारंवार पत्रव्यवहार करण्यात येत आहे. सचिवांच्या साक्षीत सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले की, "सदरहू थकीत रक्कम असल्याचे नगरपालिकांनी तत्वतः मान्य केले आहे तथापि, शाळेवर काही खर्च करण्यात आला असेल अथवा इमारत दुरूस्तीसाठी खर्च केलेला असेल ती रक्कम शासनाकडून समायोजित करावायाची असल्याने त्याला काही कालावधी लागणार आहे. तसेच **कोवीड-१९ च्या काळात नगरपालिकांची वसुली झालेली नसल्याने या रक्कमा एक रक्कमी भरणे शक्य होत नाही त्यामुळे हप्त्यांमध्ये रक्कम अदा केली जाईल असे समितीस सचिवांनी अश्वासित केले. यावर समिती समाधान व्यक्त करीत असुन ६ बिगर प्राधिकृत नगरपालिकांकडून रूपये १२. ६६ कोटी एवढ्या रकमेची प्राथमिक शिक्षण अंशदान (शिक्षण कर) जिल्हा परिषदेस अदा करण्यात येणाऱ्या हप्त्यांचे कालमर्यादेसह सविस्तर विवरण समितीस एक महिन्याच्या आत सादर करावे, अशी समिती शिफारस करीत आहे.**

- **अहमदनगर जिल्ह्याचा वृध्द कलावंत निवडीचा इष्टांक वाढवून देण्यासह जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्याबाबत :-** राज्यातील वृध्द साहित्यीक व कलावंतांना मानधन देण्याची योजना शासनाने सुरू केली आहे. अहमदनगर जिल्ह्यासाठी प्रतिवर्षी कमाल ६० पात्र कलाकारांची निवड करण्याचा इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हा राज्यातील सर्वात मोठा जिल्हा असून या जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. प्रत्येक जिल्ह्याचा इष्टांक निश्चित करताना त्या त्या जिल्हयाचे क्षेत्रफळ, लोकसंख्या व तालुक्यांची संख्या विचारात घेऊन कलावंत निवडीचा इष्टांक निश्चित करणे गरजेचे असुन त्यानुसार अहमदनगर जिल्ह्याचा इष्टांक वाढवण्याची आवश्यकता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती सादर करण्यात आली की, " अहमदनगर जिल्ह्यासाठी प्रतीवर्षी कलाकारांची निवड करण्याचा इष्टांक ६० ऐवजी १०० इतका वाढवून देण्यात आला असुन त्यानुसार वृध्द कलावंतांची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे."

**वृध्द कलावंतांची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर प्रशासकीय समिती गठीत करण्यात येते. परंतु अनेक जिल्ह्यांमध्ये समिती गठीत करण्यात आलेली नसल्याने वृध्द कलावंतांचे मानधन देण्याचे प्रस्ताव २ ते ३ वर्षापासुन जिल्हा परिषदांकडे प्रलंबित आहेत. सदरहू प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने अशासकीय सदस्यांच्या ऐवजी विधानसभा/ विधानपरिषद सदस्य, समाज कल्याण सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व निवृत्त शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेली समिती गठीत करता येईल का, याबाबतची तपासणी करून त्यानुसार जिल्हास्तरावरील समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव सांस्कृतीक कार्य विभागाकडे पाठविण्यात यावा तसेच अहमदनगर जिल्ह्यासाठी वाढवून देण्यात आलेल्या इष्टांकानुसार वृध्द कलावंताची निवड करून त्यांना मानधन देण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

- **जिल्हा परिषदेच्या शाळांना संरक्षक भिंत (पक्की भिंत, तारेचे कुंपण, बाडाचे कुंपण इ. ) बांधणे :-** अहमदनगर जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण ३५६९ शाळांपैकी २९३१ शाळांना संरक्षण भिंत (पक्की भिंत, तारेचे कुंपण, बाडाचे कुंपण इ.) असुन उर्वरित ६३८ शाळांना संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. या कामासाठी एकूण रूपये ४६,८४,३५,०००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे. यापैकी राष्ट्रीय मार्ग, राज्यमार्ग व जिल्हा रस्त्यांच्या लगत असणाऱ्या शाळांची संख्या मोठी आहे. संरक्षक भिंत

नसल्याने जागेवर अतिक्रमण होणे, या जागेचा ग्रामस्थांनकडून गैरवापर होत असणे व शाळा खोल्यांमधील शैक्षणिक साहित्य चोरीस जाण्याचे प्रकार घडत असतात यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांच्या संरक्षण भिंतीसाठी जिल्हा नियोजन अंतर्गत नवीन लेखाशिर्ष निर्माण करून निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी समितीस विदित केले की, " केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत शाळेच्या संरक्षक कुंपनासाठी योजना मान्य होऊन केंद्राचा निधी प्राप्त झाल्यास राज्य हिस्सा उपलब्ध करून कामे केली जातील. तसेच शाळांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांसाठी जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार/खासदार निधी, १४ वा व १५ वा वित्त आयोग व सीएसआर या वेगवेगळया निधीतून फंड उपलब्ध करून देण्यात येतो. त्यानुसार निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार सदरहू निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच **शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयात (परिशिष्ट क्रमांक १. ४) जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्राथमिक शाळा इमारत बांधकाम, प्राथमिक शाळांची दुरूस्ती व माध्यमिक शाळा इमारत बांधकाम/दुरूस्ती या तीन योजनांमध्ये शाळेची आवार भिंत/कुंपण याचा समावेश करण्यात आलेला आहे".**

**शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषद शाळांच्या संरक्षक भिंत बांधकामाचा जिल्हा वार्षिक योजनेत समावेश केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तथापि, सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रस्तावित आराखाडयात या बाबीचा समावेश करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांना परिपत्रकान्वये कळविण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

- **अनुकंपा तत्त्वावरील नोकरीबाबत :-** जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असताना कर्मचारी दिवंगत झाल्यानंतर त्याच्या जवळच्या वारसास अनुकंपा नोकरी देणे बाबतचे शासनाचे धोरण आहे. सद्यःस्थितीत फक्त भरती प्रक्रीया राबवित असताना १० टक्के अनुकंपा भरती करण्यात येते व राज्य शासनाची भरती दरवर्षी नियमितपणे होत नसल्याने अनुकंपा नोकरीसाठी पात्र असुनही प्रतिक्षा सुचीमधील उमेदवाराचे वय ४५ वर्षे पेक्षा जास्त झाल्यास त्या कुटूंबाला अनुकंपा नोकरीचा लाभ मिळत नाही. प्रतिक्षा सुचिमधील पात्र व्यक्तीस वयाच्या ४५ वर्षापर्यंत नोकरी मिळाली नाही तर त्या व्यक्तीचे नाव प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येते, परंतु अशा परिस्थितीत नाव बदलण्याची तरतुद सध्याच्या नियमांमध्ये नाही. विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती मिळाली की, अनुकंपा नियुक्तीच्या भरतीसाठी असलेली १० टक्के मर्यादा वाढवून आता २० टक्के पर्यंत करण्यात आलेली असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

**समितीकडे प्राप्त झालेल्या एका प्रकरणात दिवंगत कर्मचाऱ्याची पत्नी अशिक्षित असल्याने तीने अनुकंपासाठी अर्ज केलेला नव्हता परंतु आता तिची मुले इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले असतानाही त्यांनी १८ वर्षे पुर्ण केल्यानंतर एक वर्षाच्या आत अर्ज न केल्याने त्यांचा अर्ज नाकारण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. वास्तविक कर्मचारी दिवंगत झाल्यानंतर त्या घरातील कर्ता व कमावता माणूस गेल्याने संपूर्ण कुटुंब निराधार होते त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे असे समितीचे मत आहे.**

**तसेच दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे असे कुटुंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटुंबनिवृत्तीविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिकाऱ्यावर बंधनकारक असल्याने सज्ञान नसलेल्या वारसदारांचा दस्ताऐवज तयार करण्यात यावा व त्यात १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या या पात्र वारसदारांना पुढील एक वर्षाच्या आत अनुकंपा नोकरीचा अर्ज सादर करण्याबाबत संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांकडून कळविण्यात यावे अशी कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी, अन्यथा, असा पाल्य ज्यावेळी अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करेल ती तारीख ग्राह्य धरावी अशी समितीची शिफारस आहे.**

**समितीला अनुकंपा तत्त्वावरील मृताच्या पाल्यास नोकरी देण्यासंदर्भात असे आढळून आले की, सामान्य प्रशासन विभागाने निर्धारीत केलेले पाल्याचे/उमेदवाराचे ४५ वर्षे वय उलटून गेल्यावर मृताच्या पाल्यास नोकरी मिळत नाही. त्यामुळे अशा कुटुंबाचे नोकरी न मिळाल्यामुळे हाल होतात काही जणांना कायमची नोकरी मिळत नाही. अनुकंपा तत्वाच्या धोरणाप्रमाणे मृतांच्या कुटुंबियांना समाजात सन्मानाने जगता यावे व त्यांच्या कुटुंबियांचे नोकरीच्या माध्यमातून पालनपोषण व्हावे यासाठी नोकरी करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या वैध पाल्यास नोकरी देण्यात येते. यासाठी पात्र व्यक्तीचे जास्तीत जास्त वय ४५ इतके वय निर्धारीत करण्यात आले आहे. वैध पाल्याचे ४५ वर्षे वयाची मर्यादा उलटून गेल्यानंतर त्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास नोकरी देण्यात येत नाही. वयाची ४५ वर्षे ही निर्धारीत केलेली मर्यादा उलटून गेली असली**

**तरी अशा व्यक्तीच्या जागी त्या कुटुंबातील अन्य पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. यास्तव ज्या उमेदवाराची ४५ वर्षे वयाची मर्यादा उलटून गेली आहे अशा उमेदवाराने तो सुचविल त्या पात्र व वैध व्यक्तीची पात्रता तपासून त्यास अनुकंपा तत्वावरील नोकरी देण्यासाठी निर्णय घेण्यात यावा. तसेच अशा कुटुंबातील पात्र व्यक्तीस अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने सध्या अस्तित्वात असलेल्या नियमात योग्य तो बदल करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

- **पोषण आहाराच्या देयकावरील अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेस मिळणेबाबत:**- ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके व गरोदर/स्तनदामातांना पुरविण्यात येणारा घरपोच आहार (टी. एच. आर.) च्या देयकावरील माहे एप्रिल २०१६ ते माहे सप्टेंबर २०२१ या कालावधीतील रूपये १३,६७,०८,२१९/- इतके अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेस येणे बाकी आहे. याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी करण्यात आलेली आहे. **(परिशिष्ट क्रमांक १. ५)**

**अहमदनगर जिल्हा परिषदेस अभिकरण शुल्क अदा करण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती एक महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दोन

### जिल्हा परिषद, अहमदनगर

### सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जिल्हा परिषदेचा निधी अखर्चित राहील्याबाबत..

पंचायती राज समितीने दिनांक ०४ ते ०६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा परिषदेचा दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांच्या निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेचा निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांच्या ताब्यात आहे. मात्र त्यांच्याकडील निधी खर्च होत नाही. ५ आणि १० लाखाचा निधी शासनाकडून प्राप्त होण्याकरिता खूप प्रयत्न करावे लागतात. येथे करोडो रुपये शिल्लक राहत असताना आपल्याला त्याचे काहीही सोयरसुतक नाही. जिल्हा परिषदेचे सदस्य आणि पदाधिकारी यांची निधी मिळत नसल्याबाबत, निधी वाढवून द्यावा, डीपीडीसीचा निधी वाढवून देण्याबाबत वारंवार तक्रार करीत असतात. कॅफोकडे विचारणा करण्यास गेले तर ते त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येते. अतिशय बेजबाबदारीची भूमिका कॅफोंची आहे. त्यामुळे कॅफोंवरच कार्यवाही केली पाहिजे असे मत व्यक्त करीत समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांना विचारणा केली की, यामध्ये आपली प्रमुख भूमिका असते. या निधीच्या खर्चाबाबत योग्य मार्गदर्शन पंचायत समिती आणि सर्व विभागांना करण्याची तुमची जबाबदारी आहे. मग आपण ही जबाबदारी पार पाडताना का दिसत नाहीत. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ज्यावेळी समन्वय समितीच्या सभा होतात. त्यावेळी वास्तविकपणे कार्यान्वयीन यंत्रणा प्रमुख म्हणून त्या त्या विभागप्रमुखाच्या अधिनस्त खर्चाचे लेखे सुपूर्द केले असतात आणि त्यामुळे तो निधी खर्च करण्याची शंभर टक्के जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची असते. मात्र जर हा संपूर्ण निधी खर्च होत नाही तर त्याबाबत अर्थ समितीमध्ये सर्व विभाग प्रमुखांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली जाते. वास्तविकपणे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त असलेले विभाग व विभागप्रमुख आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या विभाग प्रमुखांच्या मार्फत नियंत्रण होते. जर कोणत्याही योजनेवरील निधीचा खर्च कमी होत असेल तर किंवा डीपीसीमध्ये ते मागे पडत असतील तर त्यासंबंधातील बाबी निदर्शनास आणून दिल्या जातात. याबाबत दरवेळी परिपत्रक काढले जाते. यावर समितीने विचारणा केली की , आपण फक्त निदर्शनास आणून देता. आपण फक्त कायद्याची माहिती देत आहात. पण प्रत्यक्षात काय होते, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रत्यक्षात सुध्दा आम्ही ते करतो असे विदित केले यावर समितीने आपण जर ते प्रत्यक्षात केले असते तर मार्च अखेर आपल्या जिल्हा निधीची किती रक्कम शिल्लक आहे , आपल्या जिल्हा परिषदेचे प्रतिबंधक नियोजन (प्रिव्हेंटिंग प्लॅनिंग) काहीच नाही. त्यामुळे हा निधी अखर्चित राहतो अशी नाराजी व्यक्त केली. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये ४२८ कोटी रुपये इतका निधी शिल्लक असल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली यावर समितीने आम्ही बैठकीमध्ये असे मार्गदर्शन करतो, तसा सल्ला देतो. सीएसआर दरवर्षी १० टक्के वाढतो त्याचा आपण विचार करीत नाही. नुसते ८ टक्के व्याज घेऊन काय करता, ४२८ कोटी रुपये इतका निधी अखर्चित राहत असेल तर ही रक्कम नगण्य आहे काय , अर्थ समितीमध्ये या खर्चाचा आढावा घेतला असता तर हे लोक त्या त्या योजनेच्या अंमलबजावणीपर्यंत गेले असते तसेच जिल्हा निधीची रक्कम किती शिल्लक आहे अशी विचारणा केली असता जिल्हा निधीची ४८ कोटी ५८ लाख २५६ इतकी रक्कम शिल्लक आहे. जिल्हा निधी कॅशबुकची रक्कम सांगितली आहे. यामध्ये अभिकरण हस्तांतरण यामध्ये स्वउत्पन्नाच्या बाबी आहेत असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस माहिती दिली यावर समितीने विचारणा केली की, आपल्या जिल्हा निधीचे एकूण बजेट किती आहे. अभिकरण हस्तांतरण सुध्दा बजेटमध्ये जमा बाजूला लिहितो त्याची माहिती सांगावी. त्यामध्ये अभिकरण हस्तांतरण, उपकर, सापेक्ष अनुदान, बाजाराच्या लिलावाची रक्कम, पाणी पट्टीच्या वसुलीची रक्कम यांचा समावेश असतो. जिल्हा वार्षिक योजनेचे अनुदान वेगळे, शासनाचे अनुदान वेगळे आणि ते सोडून जिल्हा निधीचे हे ४८ कोटी शिल्लक आहेत. माहे मार्च २०१८ अखेर किती निधी शिल्लक होता त्याची माहिती सांगावी.

यावर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, जिल्हा परिषद उत्पन्नाच्या बाबीमध्ये सन २०१४-१५ मध्ये साधारणपणे रु. २६.७६ लाख इतके शिल्लक आहेत व सन २०१८-१९ या वर्षामध्ये स्व उत्पन्नाची आरंभीची शिल्लक रु. २९,९३,५१७/- इतकी आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, उक्त रक्कम सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील आहेत. ही मार्च २०१७ अखेरची शिल्लक आहे. समितीला दिनांक १ एप्रिल २०१८ रोजीची आरंभीची शिल्लक हवी आहे. ही रक्कम या बुकमध्ये येणार नाही. ती आपल्या कॅशबुकमध्ये येईल. कारण आपण सुधारित बजेट तयार केल्यानंतर आपला खर्च झाला नाही. म्हणजे

१ एप्रिल २०१८ अखेरची शिल्लक हवी आहे. आपण दोन तीन कॅशबुक मेन्टेन्ड करता की काय, सीईओ महोदय आपण यांच्या सी.आर. मध्ये याबाबत नोंदी घेतल्या पाहिजेत. मूळात कॅफो तर रिफॉर्म असले पाहिजे. कॅफो काहीच माहिती देत नाहीत अशी नाराजी समितीने व्यक्त केली व अशी विचारणा केली की, दिनांक १ एप्रिल २०१८ अखेरची शिल्लक किती आहे. जेव्हा आपले नवीन वित्तीय वर्ष सुरू झाले तेव्हा आपल्याकडे किती शिल्लक होती. यावर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, दिनांक १ एप्रिल २०१८ अखेरची सेसमधील शिल्लक रुपये १२,९१,४५,५९३/- इतकी रक्कम होती व दिनांक १ एप्रिल २०१८ पासून ते दिनांक २ ऑक्टोबर २०१८ पर्यंत ज्या रिसीट आलेल्या आहेत आणि त्यातून झालेला खर्च वजा जाता दिनांक २ ऑक्टोबर २०१८ अखेर जिल्हा परिषदेचा जिल्हा निधी रु. १७,२२,६१,२२०/- इतका शिल्लक आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपल्या जिल्हा परिषदेचे जिल्हा निधीचे एकूण बजेट किती आहे, यावर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अहमदनगर जिल्हा परिषदेचे जिल्हा निधीचे एकूण बजेट रु. ३४,७४,५२,०७१/- इतके आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, त्यामधील सुमारे १२ कोटींच्या रकमा अखर्चित राहिल्या आहेत. शासनाच्या अनुदानातील निधी रु. ४२८ कोटी इतका अखर्चित आहे. यावर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी आस्थापना अनुदान हे अनेक पदे रिक्त असल्यामुळे वापरात येत नाही अशी माहिती समितीला दिली यावर समितीने नाराजी व्यक्त करित असे मत मांडले की, जिल्हा परिषदेचा ४२८ कोटी रुपये निधी अखर्चित आहे. जिल्हा परिषदेला प्राप्त निधी खर्च करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारीच्या (कॅफो) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे. उक्त निधी खर्च झाल्यानंतर पुढील वर्षासाठी निधी मागणीची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारीच्या (कॅफो) यांची असताना ती त्यांनी पार पाडलेली नाही. उक्त अखर्चित निधी प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. यामध्ये काही अनियमितता झाली असेल तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. समितीच्या सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. निधी अखर्चित ठेवून जिल्ह्याच्या विकासावर परिणाम करण्याचे काम कॅफो यांच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी व नियमानुसार कारवाई करण्यात यावी. उक्त कार्यवाहीचा अहवाल समितीला १ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा. या विषयासंदर्भात सचिवांची साक्ष घेण्यात येईल. असे समितीने विशद केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जिल्हा परिषदेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत अहमदनगर जिल्हा परिषदेचा सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये रुपये ४२८ कोटी एवढा निधी अखर्चित आहे, सदर निधी अखर्चित राहाण्याची कारणे काय आहेत, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

आक्षेपात नमुद रक्कम रुपये ४२८ कोटी ही सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील अखर्चित निधीची रक्कम नसून, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील रोख नोंदवह्यांची शिल्लक रोख रक्कम आहे. सन २०१३-१४ मधील अखर्चित निधीबाबत मा. पंचायती राज समिती परिच्छेद नुसार खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्राप्त अनुदानाअंतर्गत अखर्चित निधीचा तपशील पुढील प्रमाणे :-

| अ. क्र. | तपशिल | सन २०१३-१४ मध्ये प्राप्त अनुदान | सन २०१३-१४ मधील खर्च | सन २०१४-१५ मध्ये झालेला खर्च | एकूण खर्च | शिल्लक निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हस्तांतरण | २४७. ३६ | १५८. ३६ | ८४. ०६ | २४२. ४२ | ४. ९४ |
| २ | अभिकरण | ६४. ३९ | ३३. २९ | २४. ४४ | ५७. ७३ | ६. ६६ |
|  | एकूण | ३११. ७५ | १९१. ६५ | १०८. ५० | ३००. १५ | ११. ६० |

निधी शिल्लक / अखर्चित राहाण्याची कारणे खालीलप्रमाणे.

**हस्तांतरण योजना**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | विभाग | अखर्चित रक्कम | निधी शिल्लक/ अखर्चित राहाण्याची कारणे |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य | ०. ६४ | पात्र लाभार्थी नुसार लाभ देऊन मातृत्व अनुदानाची शिल्लक रक्कम शासन खाती भरणा.<br>प्रा. आ. केंद्र /उपकेंद्र बांधकामे पुर्ण होऊन बचत / शिल्लक निधी शासन खाती भरणा. |
| २ | सा बां उत्तर | ०. ७८ | कामे पुर्ण होऊन बचत रक्कम शासन खाती जमा. |
| ३ | सा बां दक्षिण | ०. ०४ | कामे पुर्ण होऊन बचत रक्कम शासन खाती जमा. |
| ४ | ग्रामीण पाणी पुरवठा | १. ६४ | ग्रामीण भागातील अनु. जाती व नवबौध्द घटकातील कुटुंबांना शासननिर्णय १८/११/२०११ अन्वये वैयक्तिक शौचालय सुविधा या योजनेसाठी रुपये ११,०००/- प्रति लाभार्थी अनुदान देण्यात येत होते. तथापि, स्वच्छ भारत मिशन या योजने अंतर्गत प्रति लाभार्थी १२,०००/- अनुदान मिळत असल्याने सदरच्या योजनेस लाभार्थी प्रतिसाद कमी मिळाल्याने निधी शिल्लक राहिला आहे. |
| ५ | लघु पाटबंधारे | ०. २० | कामे पुर्ण होऊन बचत रक्कम शासन खाती जमा. |
| ६ | समाज कल्याण | ०. ३६ | शिष्यवृत्ती योजने अंतर्गत पात्र लाभार्थीना लाभ देऊन शिल्लक राहिलेली रक्कम शासन खाती जमा. |
| ७ | पशुसंवर्धन | ०. ३२ | कामे पुर्ण होऊन शिल्लक / बचत रक्कम शासनखाती जमा. |
| ८ | ग्रामपंचायत | ०. ८८ | • पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनांतर्गत ग्रामपंचायतीच्या रस्त्यावर सौरपथदिवे बसविणे या योजनेचा केंद्र शासनाकडून केंद्र हिस्सा प्राप्त न झाल्याने राज्य शासनाचा निधी रु. २९. ९० लक्ष अखर्चित निधी शासन खाती भरणा.<br>• ग्रामपंचायतींना जनसुविधा अंतर्गत बांधकामे रु. १८. ०० लक्ष जागेच्या वादामुळे काम रद्द झाल्याने अखर्चित निधी शासन खाती भरणा.<br>• तिर्थक्षेत्र विकास योजनांतर्गत काम पुर्ण होऊन कामातील बचत शासन खाती भरणा. |
| ९ | महिला व बालकल्याण | ०. ०४ | कामे पुर्ण होऊन बचत रक्कम. |
| १० | शिक्षण प्राथ | ०. ०४ | कामे पुर्ण होऊन बचत रक्कम. |
| | **एकूण** | **४. ९४** | |

**अभिकरण योजना**

| अ. क्र. | विभाग | अखर्चित रक्कम | निधी शिल्लक/ अखर्चित राहाण्याची कारणे |
|---|---|---|---|
| १ | कृषि | ०. २६ | अहमदनगर जिल्हातील सर्व तालुक्यात माहे फेब्रु-१४ व मार्च-१४ मध्ये अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने लक्षांक पुर्तीकरिता निवड केलेले लाभार्थी आपत्तीबाधीत झाल्याने बायोगॅस सयंत्र उभारणीचे लक्षांक पुर्ण करता आले नसल्याने अखर्चित निधी राहीला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ग्रामिण पाणी पुरवठा | ०. ०४ | मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम व डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत कामे पुर्ण होऊन बचत रक्कम शासन खाती भरणा. |
| ३ | महिला व बालकल्याण | ६. ३६ | अंगणवाडी बांधकामासाठी प्रती अंगणवाडी ४. ५० लक्ष रुपये प्रमाणे निधी प्राप्त झाला होता. परंतु बांधकामाचे साहित्य दरातील वाढीमुळे मंजुर रकमेत काम होऊ शकत नसल्याने निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याने निधी अखर्चित राहीला आहे. खालील प्रमाणे अखर्चित निधी भरणा करण्यात आलेला आहे :-<br>अ)अंगणवाडी इमारत बांधकामावरील अखर्चित रक्कम रु. ६,२४,५०,०००/-<br>ब)आस्थापना अनुदान वेतन व भत्ते ३,७०,९७०/-<br>क) नाविन्यपूर्ण योजना सन २०१०-११ ते १५-१६ अखेर --- ७,९२,८२०/- अखर्चित रक्कम एकूण रु. ६,३६,१३,७९०/-<br>वरील प्रमाणे एकूण रक्कम रुपये ६,३६,१३,७९०/- शासन खाती भरणा करणेत आलेली आहे. उपरोक्त प्रमाणे अनुपालन स्विकृत होऊन परिच्छेद वगळणेस विनंती आहे. |
| | **एकूण** | **६. ६६** | |

वरिल प्रमाणे हस्तांतर योजनांचा अखर्चित निधी रुपये ४. ९४ कोटी व अभिकरण योजनांचा अखर्चित निधी रुपये ६. ६६ कोटी असा एकूण रुपये ११. ६० कोटी अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाचे वार्षिक लेखे मा. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्रमाणित झालेले आहेत. तरी सदरचे अनुपालन मान्य करण्यात यावे ही विनंती.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय –**

(वित्त-२ )सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षातील रुपये ४२८/- कोटी निधी अखर्चित नसून प्रत्यक्षात रुपये ११. ६० कोटी इतका निधी अखर्चित होता. सदर अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्यात आला आहे. तसेच वार्षिक लेखे स्थानिक निधी लेखा परिक्षा नाशिक यांनी प्रमाणित केले आहे. जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेले अनुपालन मान्य व्हावे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिनांक ४ ते ६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, निधी अखर्चित राहिल्याबाबतचा हा मुद्दा आहे. नंतरच्या कालावधीत हा निधी खर्च करण्यात आलेला आहे का ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती विशद केली की, सन २०१३-२०१४ मध्ये ४२८ कोटी रुपये एवढा निधी अखर्चित राहिलेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ४२८ कोटी रुपये हा २०१३-२०१४ चा अखर्चित निधी नव्हता, तर तो २०१७-२०१८ च्या रोख नोंदवहीतील रक्कम होती. सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये एकूण ११ कोटी ६० लाख रुपये जे आहेत, ते अखर्चित राहिलेले आहेत. त्याचा भरणा केलेला आहे. सन २०१३ - २०१४ आणि सन २०१४-२०१५ चे लेखे सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी प्रमाणित केलेले आहेत. यावर समितीने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने होकारात्मक संमती दर्शविली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ४ ते ६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून माहिती घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षामध्ये ४२८ कोटी इतका निधी शिल्लक आहे. जिल्हा परिषदेस शासनाकडून प्राप्त निधी, स्वउत्पन्नातून प्राप्त झालेला निधी, झालेला खर्च व उर्वरीत अखर्चित निधी यासंदर्भातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून समितीस समर्पक उत्तर न मिळाल्याने याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहिल्याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

या विषयासंदर्भात दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी समितीस विदित केले की, सन २०१३-२०१४ या वर्षात रूपये ४२८ कोटी इतका निधी अखर्चित राहिलेला नसून सदरहू रक्कम सन २०१७-२०१८ च्या रोख नोंदवहीतील आहे. सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये एकूण रूपये ११ कोटी ६० लाख इतका निधी अखर्चित राहिलेला आहे. सदर अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे.

**वास्तविक कार्यालयीन यंत्रणाप्रमुख म्हणून त्या त्या विभागप्रमुखांच्या अधिनस्त असलेला निधी शंभर टक्के खर्च करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची आहे. तसेच सदरहू निधी खर्च करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समन्वय ठेवणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने काम न केल्याने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटूंबाना वैयक्तिक शौचालय सुविधा या योजनेसाठीचे रूपये १ कोटी ६४ लाख, अंगणवाडी इमारत बांधकामासाठीचे रूपये ६ कोटी ३६ लाख यासह अन्य योजनांतील रक्कम मिळून एकूण ११ कोटी ६० लाख इतका निधी अखर्चित राहिला आहे. जिल्हा परिषदेकडून निधी शिल्लक/अखर्चित राहण्याची कारणे नमूद करण्यात आलेली आहेत ती संयुक्तिक वाटत नाहीत. अहमदनगर जिल्हा परिषदेचा वार्षिक अर्थसंकल्पीय निधी एकूण रूपये ३४ कोटी ७४ लाख इतका असताना त्यापैकी एकाच वर्षातील ११ कोटी पेक्षा जास्त रक्कम अखर्चित राहिल्याने शासनाच्या खाती भरणा करण्यात आला आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**यापुढे ग्रामीण योजनांसाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी व स्वउत्पन्नातून प्राप्त झालेला निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करण्याची जबाबदारी त्या त्या विभागप्रमुखांच्या खातेप्रमुखांनी व्यवस्थितरित्या पार पाडावी यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समन्वयाने योग्य ती कार्यपद्धती राबवावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अहमदनगर

### समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधा व साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ४ ते ६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने वसतिगृहाच्या संदर्भात विचारणा केली की, बरेच वसतिगृह हे समाजकल्याण विभागाचे आहेत. जे गरीब, मागासवर्गीय विद्यार्थी आहेत, त्या विद्यार्थ्यांना दोन वेळचे जेवण, राहण्याची सोय, पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आहे. वरिष्ठ पातळीवर समाजकल्याण अधिकारी असताना त्यांनी भेटी देऊन ज्या गैरसोई असतील त्याची तत्काळ दुरुस्ती करीत असाल तर या मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही. कोणत्या वसतिगृहामध्ये अनियमितता होत आहे ही बाब आपले अधिकारी पाहतात की नाही, यासंबंधी जबाबदारी निश्चित करून समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. शालेय पोषण आहारामध्ये तांदुळ आणि इतर साहित्य चांगल्या दर्जाचे दिले गेले पाहिजे. जे साहित्य पुरवठाधारक पाठवितात त्याची तपासणी झाली पाहिजे, परंतु तसे होत नाही. तांदुळाची ५० किलोची पोती असतील तर तेवढ्याच वजनाची पोती आली पाहिजेत. काही स्टॉक रुममध्ये सन २०१६-२०१७ चे छापे पोत्यांवर आढळून आलेले आहेत.

माल चांगल्या दर्जाचा आहे की नाही, याची तपासणी केली पाहिजे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगल्या राहण्याच्या दृष्टीने शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख यांनी पहायला पाहिजे. धान्यादी मालाचा जो पुरवठा केला जातो त्याची प्रत शाळेच्या मुख्याध्यापकांकडे गेली पाहिजे. शाळांमध्ये जे वजन काटे असतात त्यावर माल मोजून घेतला पाहिजे. समितीने सन २०१४-२०१५ मधील धान्याच्या पोत्यांवरील प्रिंटेड सिलसंदर्भात मोठी अनियमितता आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सन २०१४-२०१५ आणि सन २०१६-२०१७ मध्ये एफसीआयकडून जो माल पाठविला गेला तो कोठे गेला, यासंदर्भात सचिवांची साक्ष लावण्यात येईल असे समितीने विशद केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

समाजकल्याण विभागाच्या मागासवर्गीय वसतिगृहामध्ये विदयार्थ्यांना पुरविण्यात येणा-या निकृष्ट साहित्याबाबतः- अहमदनगर जिल्हापरिषदे अंतर्गत समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयिसुविधा, आहार, पिण्याचे पाणी, पुरविण्यात येणारे साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसाय होत असल्याप्रकरणी संबंधिताची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

सदर प्रश्नाचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, पंचायत राज समितीने पारनेर तालुका दौऱ्याच्या वेळी दिनांक ५/१०/२०१८ रोजी धन्वंतरी मेडीकल ॲड एज्युकेशन फाऊंडेशन, अहमदनगर संचलित प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी ता. पारनेर येथे भेट दिली आहे. उक्त भेटीच्या वेळी समितीस आढळलेल्या बाबी ह्या आश्रमशाळा व हंगामी वसतिगृह यांचेशी संबंधित आहेत. समितीने मौजे ढवळपुरी, ता. पारनेर येथील जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे अधिनस्त असलेल्या अनुदानित वसतिगृहास भेट दिलेली नाही. त्यामुळे, याबाबत झालेल्या चर्चेस अनुसरून आश्रमशाळेच्या बाबत सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर यांनी व हंगामी वसतिगृहाचे बाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अनुपालन सादर केले आहे.

इतर मागासवर्गीय, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत धन्वंतरी मेडिकल ॲड एज्युकेशन फाऊंडेशन, अहमदनगर संचलित प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी, ता. पारनेर चालविली जाते, सद्यःस्थितीत सहायक आयुक्त समाज कल्याण अहमदनगर यांचेमार्फत अनुदान वितरण केले जाते. पंचायत राज समितीने दिनांक ५/१०/२०१८ रोजी प्राथमिक आश्रमशाळा, ढवळपुरी ता. पारनेर येथे भेट देऊन वसतिगृहाबाबत विभाग प्रमुखांना बैठकीत सुचना दिल्या. त्यानुसार दिनांक ६/१०/२०१८ रोजी सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर यांनी तपासणी केली व विद्यार्थ्यांकडून सोयीसुविधाबाबत माहिती घेतली.

दिनांक २०/७/२०१९ रोजी सहायक आयुक्त, समाज कल्याण अहमदनगर या कार्यालयाने पंचायत राज समितीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने भेट देऊन ज्यादा विदयार्थी व इमारतीबाबत पत्राद्वारे नोटीस दिलेली आहे. त्याबाबत प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी यांचे पत्र क्रमांक ९४/२०१९ दिनांक २१/०८/२०१९ अन्वये खुलासा प्राप्त झालेला असून तो अमान्य करण्यात आलेला आहे. त्याबाबत मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग, नाशिक यांना पत्र क्रमांक १५३३/२०२० दिनांक २३/७/२०२० अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले होते.

हंगामी वसतिगृहाबाबत गटशिक्षणाधिकारी, पारनेर यांनी दिलेल्या अहवालानुसार सन २०१७-१८ चे अनुदान संबंधित हंगामी वसतिगृहाला दिलेले नाही. तसेच सदर अनुदानाबाबत औरंगाबाद खंडपीठ याचिका क्रमांक ९१२१/२०१८ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेचा निकाल दिनांक ४/७/२०१९ रोजी पारित झालेला असून सदरची याचिका हि खारीज करण्यात आलेली आहे. गटशिक्षणाधिकारी पारनेर यांनी दिनांक ७/५/२०१८ रोजी चलनाने रु. १५४५८३७/- रक्कम भरणा केली आहे. सन २०१८-१९ पासून हंगामी वसतिगृह बंद करण्यात आलेले आहे. वरील अनुपालनाचा स्विकार व्हावा हि, विनंती.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समाजकल्याण विभागाच्या मागासवर्गीय वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाचे साहित्य, सेवा, सुविधा, आहाराबाबतचा हा मुद्दा आहे. यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. या प्रकरणी चौकशी करण्यात येईल, असे सांगितलेले आहे. यावर आयुक्त (समाजकल्याण विभाग) यांनी समितीला पुढील प्रमाणे खुलासा केला की, सन्माननीय समितीने ज्यावेळी भेट दिली होती, सदर वसतिगृह हे प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत सर्व शिक्षा अभियानामधून हंगामी वसतिगृह चालविले जात होते. त्या अनुषंगाने सर्व शिक्षण अभियानांतर्गत शिक्षण विभाग हा निधी त्यांना देत होता. ज्यावेळी त्या हंगामी वसतिगृहाला भेट दिली, त्यावेळी काही अडचणी तेथे जाणवून आल्या. आमच्या अधिकाऱ्यांनी माननीय समितीच्या निर्देशानुसार तपशिलवार (डिटेल्ड) चौकशी केलेली आहे. त्यानंतर त्यांना कारणे दाखवा सूचना (शो-कॉज)देऊन त्यांचा खुलासा प्राप्त करण्यात आलेला आहे. सदर खुलासा अमान्य करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई प्रस्तावित केलेली आहे. दंडात्मक कारवाई झाल्यानंतर त्यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात कारवाईस आव्हान दिले होते. औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये त्यांनी आपल्या विरुद्ध याचिका (केस )टाकली होती. त्या प्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालयाने आपल्या बाजून निकाल दिलेला आहे. ते प्रकरण न्यायालयाने खारीज केलेले आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची सूट न देता त्यांच्याकडूनच उलटपक्षी पंधरा लाख रुपयांची रक्कम भरणा करून घेण्यात आलेली आहे. त्यानंतर हे वसतिगृह सन २०१८-२०१९ पासून बंद करण्यात आलेले आहे. आजतागायत हे वसतिगृह बंदच आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, राज्यात आपले एकूण (ओव्हरऑल) किती वसतिगृह आहेत व त्या बंद झालेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची सोय इतरत्र कुठे केलेली आहे . यावर समाजकल्याण आयुक्तांनी समितीस विदित केले की, हा विषय शिक्षण विभागाचा आहे, बंद केलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था शिक्षण विभाग करीत असते, हंगामी वसतिगृहे रोजगाराकरिता गाव सोडून जाणाऱ्या कुटुंबातील मुलांना गाव सोडून शिक्षणाकरिता बाहेर जावे लागू नये, याकरिता बांधलेली आहेत. याकरिता ही हंगामी वसतिगृह सहा महिन्यांकरिता चालविण्याची प्राथमिक शिक्षण विभागाची योजना आहे. आपल्याकडे शासनाचे ४४१ वसतिगृहे आहेत, जे समाजकल्याण विभाग स्वतः चालवितात. जवळपास २५०० अनुदानित वसतिगृहे राज्यात चालू आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जेवणाचा दर्जा (क्वालिटी) चांगला असला पाहिजे. राहण्याची सुविधा देखील चांगली असणे अपेक्षित आहे. तपासणी नंतर जर काही चुकीचे आढळले तर जे कोणी यामध्ये चुकीचे असतील त्यांच्यावर नियमाने कारवाई होणे अपेक्षित आहे. आपण ही तपासणी स्वतः व्यक्तीशः करा किंवा विश्वासातील अधिकारी यांना सांगितली पाहिजे. खरोखर काही वसतिगृहांमध्ये इतकी भयानक स्थिती आहे की, आपल्याला तेथे गेल्यानंतर उभेही राहावेसे वाटत नाही. यावर समाजकल्याण आयुक्त यांनी समितीस विदित केले की, समाजकल्याण विभागामार्फत जी ४४१ वसतिगृहे राज्यात चालू आहेत. ती सरकारी वसतिगृहे आहेत. त्यापैकी काही वसतिगृहांमध्ये त्यांनी स्वतः भेट दिलेली आहे, आमचे ते रुटीन काम आहे, आम्हाला ते केलेच पाहिजे, यात शंका नाही. यामध्ये आम्ही श्रेणीवाढीचे (अपग्रेडेशन) काम देखील करीत आहोत. आपल्या इमारती देखील चांगल्या आहेत. इमारतींची साफसफाई आणि सुरक्षा व्यवस्था या अनुषंगाने (कंबाईन कॉन्ट्रॅक्ट) जोडून कंत्राट देऊन ते केले जाते. जेथे स्वच्छता आढळत नाही, आपण त्यासंदर्भात लोकांना दंड देखील ठोठावतो. स्वच्छतेच्या बाबत आपली काही वसतिगृहे ठीक आहेत.

पूर्वी सुरक्षेकरिता आमच्याकडे माणसे नव्हती. आता सुरक्षा व्यवस्थेचे सर्व काम कंत्राटी तत्त्वावर दिलेले जाते. जेवढे काम तेवढीच रक्कम रिलीज केली जाते. स्क्वे. फु. च्या प्रमाणात कामाचे पैसे दिले जातात. यामुळे पैशांची बचत होते व कामात सुधारणा देखील होत आहे.

वसतिगृहांमध्ये मुलांना पोषण आहारांतर्गत काय काय दिले गेले पाहिजे, रोज अंडी, फळे दिली गेली पाहिजेत, याचा देखील तेथे पूर्ण आराखडा ठेवलेला आहे. आता याबाबत तेथे तक्रार पेटी (कंप्लेंट बॉक्स) ठेवलेली आहे. जेथून आपल्याला तक्रारी येतात, त्या ठिकाणी आपण कडक कारवाई केली जाते. काही ठिकाणी आपण गृहपालांना शिक्षा देखील केलेली आहे. गेल्या एक वर्षामध्ये जेथे चूक आढळलेली आहे, तेथे आपण शिक्षा देखील केलेली आहे.

समितीने ज्या सूचना दिल्या आहेत त्याची नोंद घेत आहोत, त्याच बरोबर वसतिगहांमध्ये आणखी चांगल्या सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे होकारात्मक आश्वासन आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ४ ते ६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने वसतिगृहांच्या बाबतची माहिती घेतली असता समितीस असे निदर्शनास आले की, वसतिगृह चालविणाऱ्या संस्थांना शासनाकडून वेळोवेळी निधी उपलब्ध करून देण्यात येत असतानाही या संस्थांकडून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात येत नाहीत. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पध्दतीचा आहार दिला जात नाही. पिण्याच्या पाण्याची सोय व्यवस्थितरित्या केलेली नसते. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेशा प्रमाणात स्वच्छता व स्नानगृहांची सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध करून देण्यात येत नाही. या विषयाच्या अनुषंगाने पहाणी करण्याकरिता समितीने दिनांक ५/१०/२०१८ रोजी धन्वंतरी मेडीकल ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन अहमदनगर संचलित प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी, ता. पारनेर या हंगामी वसतिगृहास भेट दिली. त्यावेळेस या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांबाबतची तपासणी करून त्याचा अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती मिळाली की, धन्वंतरी मेडीकल ॲन्ड एज्युकेशन फाऊंडेशन अहमदनगर संचलित प्राथमिक आश्रमशाळा, ढवळपुरी, ता. पारनेर हे वसतिगृह प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत सर्व शिक्षा अभियानामधून हंगामी वसतिगृह म्हणून चालविण्यात येत होते. या वसतिगृहास मागासवर्गीय, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत अनुदान वितरीत करण्यात येत होते. समितीने दिलेल्या निदेशानुसार सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, अहमदनगर यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी या वसतिगृहाची तपासणी करून विद्यार्थ्यांकडून दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. त्याअनुषंगाने ज्यादा विद्यार्थी व इमारतीबाबत देण्यात आलेल्या नोटीशीला संस्थेकडून प्राप्त झालेला खुलासा अमान्य करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावर संस्थेने औरंगाबाद उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मा. न्यायालयाने खारीज करून शासनाच्या बाजूने निकाल दिला आहे. त्यानुसार रुपये १५ लाख वसुल केलेला दंड शासनाच्या खाती भरणा केला असून सन २०१८-१९ पासून वसतिगृह बंद करण्यात आले आहे. धन्वंतरी मेडीकल ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन, अहमदनगर संचलित प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी ता. पारनेर या हंगामी वसतिगृहाबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**रोजगाराकरिता गाव सोडून जाणाऱ्या कुटुंबातील मुलांना गाव सोडून शिक्षणाकरिता बाहेर जावे लागू नये याकरिता राज्यातील हंगामी वसतिगृहे बांधलेली आहेत. या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांना वसतिगृहांच्या सोयी व शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी शासनाकडून संस्थाचालकांना देण्यात येत असतानाही त्या वसतिगृहांमध्ये पायाभूत व आरोग्य विषयक आवश्यक त्या सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येत नाही.**

**ढवळपूरी (ता. पारनेर) येथील हंगामी वसतिगृहास समितीने भेट देऊन तपासणी करून कारवाई करण्याचे निदेश दिल्यानंतर ज्या पध्दतीने अधिकाऱ्यांकडून या वसतिगृहाची तपासणी करण्यात आली, कारवाई करण्यासंदर्भातील कागदपत्रे तयार करून न्यायालयात सादर करण्यात आली व दंडात्मक कारवाई करून सदरचे वसतिगृह बंद करण्यात आले. याच पध्दतीने राज्यातील अशा प्रकारच्या अन्य वसतिगृह व संस्था चालकांकडून पुरविण्यात येणाऱ्या सुविधा यांची तपासणी करून त्रुटी आढळून येणाऱ्या वसतिगृहांवर कारवाई होणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.**

**यासाठी हंगामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची शारिरीक व शैक्षणिक उन्नती होऊन या योजनेची फलनिष्पती होण्याच्या दृष्टीने या वसतिगृहांची ठराविक कालावधीनंतर तपासणी करण्याकरिता राज्यस्तरावर समिती स्थापन करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट – “अ”
## शासनाचे आदेश व परिपत्रके

## परिशिष्ट क्रमांक १.१

**सन २०२१-२२ अंतर्गत कृषि विभागा मार्फत जिल्हा परिषदस्तरावर राबविणेत येत असलेल्या योजनांची माहिती**

| अ.क्र. | योजनाचे नाव | निधी स्त्रोत्र |
|---|---|---|
| १. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | डीपीडीसी |
| २. | बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना क्षेत्रांतर्गत | डीपीडीसी |
| ३. | बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना क्षेत्राबाहेरील | डीपीडीसी |
| ४. | शेतक-यांना कडबाकुट्टी मशिनसाठी किंमतीच्या ५० टक्के अर्थसहाय्य करणे. | जि.प.सेस |
| ५ | कै.वसंतराव नाईक जयंती साजरी करणे, | जि.प.सेस |
| ६. | आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला शेती उपयोगी साहित्यापोटी अनुदान देणे. | जि.प.सेस |
| ७. | अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रमांतर्गत प्रायोगीक तत्वावर राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी सौर विद्युत निर्मीती सयंत्र उभारणी करणे. | जि.प.सेस |
| ८. | नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत कार्यक्रमांतर्गत उभारणी केलेल्या बायोगॅस सयंत्रासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे. | जि.प.सेस |
| ९. | शेती विषयक प्रचार व प्रसिध्दी साहित्य तयार करणे व कार्यालयीन सादिल खर्च. | जि.प.सेस |
| १० | कृषि समिती सदस्य अभ्यास दौरा | जि.प.सेस |

## सन २०२१-२२ अंतर्गत राज्य शासनाच्या कृषि विभागा मार्फत राबविणेत येत असलेल्या योजनांची माहिती

| अ.क्र. | योजनाचे नाव | निधी स्त्रोत्र |
|---|---|---|
| १. | यांत्रिकीकरण | राज्य शासन |
| २. | फळे फुले व वृक्ष लागवड | राज्य शासन |
| ३. | बियाणे व रोप वटिका | राज्य शासन |
| ४. | सिंचन सुविधा | राज्य शासन |
| ५. | उच्च तंत्र शेती | राज्य शासन |
| ६. | साठवणूक व प्रक्रिया केंद्र | राज्य शासन |
| ७. | प्रशिक्षण व अभ्यासदौरे | राज्य शासन |
| ८. | प्रात्यक्षिके | राज्य शासन |
| ९. | बाजार सुविधा | राज्य शासन |
| १० | सेंद्रीय शेती | राज्य शासन |
| ११ | भू-सुधारणा व शेती पध्दती विकास | राज्य शासन |
| १२ | पिक व शेतकरी विमा | राज्य शासन |
| १३ | निविष्ठा | राज्य शासन |
| १४ | कृषि विषयक पुरस्कार | राज्य शासन |
| १५ | शेतकरी उत्पादक कंपनीसाठी अर्थ सहाय्य योजना | राज्य शासन |
| १६ | अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विशेष योजना | राज्य शासन |
| १७ | डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन | राज्य शासन |
| १८ | मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना | राज्य शासन |
| १९ | गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरण-शेतक-यांच्या गटशेतीस चालना देणे | राज्य शासन |
| २० | राष्ट्रीय शास्वत शेती अभियांनातर्गत वनशेती उप अभियान | राज्य शासन |
| २१ | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना | राज्य शासन |

# परिशिष्ट क्रमांक १.२

राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. पविआ-२०२१/प्र.क्र.७/पदुम-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
**दिनांक:- ०७ डिसेंबर, २०२१**

**प्रस्तावना:-**

राष्ट्रीय कृषि आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यात ५,००० पशुधनघटकांसाठी १ पशुवैद्यकीय दवाखाना तर डोंगराळ भागात ३,००० एवढ्या पशुधनघटकांसाठी ०१ पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करणे आवश्यक आहे.

२. राज्यामध्ये सद्यस्थितीत जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय-३३, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये-१६९, श्रेणी-१ चे पशुवैद्यकीय दवाखाने -१७४१, श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने-२८४१ व फिरते पशुवैद्यकीय दवाखाने-६५ अशा एकूण **४८४९** संस्था कार्यरत आहेत. यापैकी श्रेणी-१ चे ५८५ दवाखाने, श्रेणी-२ चे १६५६ दवाखाने व ६५ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने अशा एकूण २३०६ संस्था जिल्हा परिषदेकडे व उर्वरित २५४३ संस्था राज्यस्तरीय आहेत.

३. राज्यामध्ये उपरोक्तप्रमाणे ४८४९ एवढे दवाखाने कार्यरत असतानाही अनेक लोकप्रतिनीधींकडून वेगवेगळ्या ठिकाणी नविन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करणे, कार्यरत असलेल्या श्रेणी-२ दवाखान्यांचे श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणे इत्यादी स्वरूपाची मागणी वारंवार होत आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील अस्तित्वात असलेल्या सर्व पशुवैद्यकीय दवाखान्याचा सर्वंकष आढावा घेऊन राज्यामध्ये कोणकोणत्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणीवाढ करणे आवश्यक आहे, कोणकोणत्या ठिकाणी नविन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्याची आवश्यकता आहे अथवा कोणकोणत्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात वाढ करणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय कृषि आयोगाने विहित केलेले पशुधन घटक संख्या यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे, ही बाब निश्चित करणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, राज्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई/नागपूर/नाशिक /औरंगाबाद /अमरावती /लातूर | सदस्य |
| ३. | प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग | सदस्य सचिव |

४. सदर समितीने राज्यात अस्तित्वात असलेल्या सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांचा जिल्हानिहाय व पशुधनघटकनिहाय आढावा घ्यावा. सदर आढावा घेताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात:-

अ) ज्या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कार्यक्षेत्रात निहित केलेल्या पशुधनघटक संख्येपेक्षा कमी पशुधनघटक असल्यास लगतच्या कोणत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा कार्यक्षेत्राचा विस्तार करून त्या कार्यक्षेत्रातील कोणती गावे कमी पशुधनघटक असलेल्या कोणत्य दवाखान्यात जोडण्यात यावी.

ब) ज्या पशुवैद्यकीय दवाखान्यांत विहित केलेल्या पशुधन संख्येपक्षा जास्तीचे पशुधन आहे ते पशुधन लगतच्या कोणत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये वर्ग करता येईल.

क) कोणत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा दर्जावाढ करणे आवश्यक आहे, त्याबाबत कारणमिमांसेसह तपशिल

ड) कोणत्या ठिकाणी नविन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

इ) राज्यातील पशुधनाच्या वाढीचा दर विचारात घेऊन पुढील ५ वर्षामध्ये राज्यात कोणकोणत्या ठिकाणी नविन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करणे आवश्यक आहे, याबाबतचा बृहत आराखडा सादर करावा.

ई) श्रेणी-१ व श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचे विश्लेषण करणे.

उ) आयटी कन्सल्टंट चा वापर करून प्रत्येक जिल्ह्याचे मॅपिंग करणे.

ऊ) राष्ट्रीय कृषी आयोगाने दवाखाना स्थापन करण्यासाठी डोंगरी व बिगर डोंगरी भागासाठी निश्चित केलेली पशुधनघटक संख्या यामध्ये वाढ करण्याची गरज आहे किंवा कसे,

५. सदर समितीने आपला अहवाल ३ महिन्यांत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(चंद्रकला गावित)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे
५) मा. मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनौज्ञयता व लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
८) सर्व समिती सदस्य
९) मा. प्र.स. (पदुम) यांचे विशेष कार्य अधिकारी, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) निवडनस्ती, पदुम-२

परिशिष्ट क्रमांक १.३

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्र ०२२-२२८३ ०२००  Email ID : sofin3.rdd-mh@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०२१/सं.क्र.२४४/वित्त-३  दिनांक : १५/१२/२०२१.

प्रति,

अध्यक्ष,
पंचायतराज समिती,
आठवा मजला, विधानभवन,
मुंबई.

विषय : मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष .
"पंचायत राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेस दि.०४ ते ०६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत दिलेल्या भेटीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नावलीसंदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या दि.१४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या साक्षीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती."

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने पंचायत राज समितीतर्फे अहमदनगर जिल्हा परिषदेस दि.०४ ते ०६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत दिलेल्या भेटीदरम्यान पुढीलप्रमाणे प्रश्नावली उपस्थित करण्यात आली होती.

**"जिल्हा परिषदांना जमीन महसूल उपकर व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी असलेला थकबाकी निधी."**

२. **सदर प्रश्नावलीवर जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.:-**

या कार्यालयाकडील पत्र क्र.साप्रवि-२/महसूल/२२५/२०२० दिनांक २६/१०/२०२० अन्वये मा. अवर सचिव ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समितींना देय असलेल्या सन २०२०-२१ अखेर जमीन महसूल उपकर अनुदान रु. १४,२३,९७,८३२/- व त्या वर्षातील माफ केलेला वाढीव उपकर रक्कम रु. २१,११,८३,७६४/- इतके अनुदान थकित आहे. याबाबत वरील पत्रान्वये मागणी केलेली आहे.

तसेच मुद्रांक शुल्क अनुदान सन २०२०-२१ अखेर १३,७७,६७,०००/- शासनाकडून येणे प्रलंबीत आहे. याबाबत शासनाकडून प्रलंबित अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक दक्षता घेण्यात येत आहेत.

३. याबाबत ग्रामविकास विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.:-

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १४४ नुसार प्रत्येक १ रूपया जमा जमीन महसुलावर २०० पैसे उपकर आकारण्यात येतो. त्याचप्रमाणे या उपकरावर प्रोत्साहनपर अनुदान देखील उपलब्ध करून दिले जाते. तसेच संबंधित जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ५ रूपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावर तसेच ५ ते १० रूपयापर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावरील उपकर जिल्हा परिषदांना अदा केला जातो. सदरचे वाटप करतांना जिल्हा परिषदांना १०० टक्के जमीन महसूल उपकर दिला जातो. मुख्य लेखाशीर्ष ३६०४ अंतर्गत जमीन महसूल उपकर अनुदानापोटी विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज, मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष वितरीत निधी याबाबतची तीन वर्षातील माहिती पुढीलप्रमाणे आहे.

लेखाशीर्ष ३६०४०४७९ (जमीन महसूल उपकर)

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज | राज्य | | अहमदनगर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद | वित्त विभागाद्वारे प्रत्यक्ष वितरीत निधी | मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद | वित्त विभागाद्वारे प्रत्यक्ष वितरीत निधी |
| १ | २०२१-२२ | १२३,६८,५३,००० | ९७,६०,४७,००० | ७३,२०,३५,२५० | ४,७२,९०,००० | ३,५४,६७,५०० |
| २ | २०२०-२१ | १००,२६,४२,७३४ | ९७,६०,४७,००० | २९,२८,१४,१०० | ४,७२,९०,००० | १,४१,८७,००० |
| ३ | २०१९-२० | ९७,६०,४७,००० | ९७,६०,४७,००० | ७८,०८,३७,६५७ | ४,७२,९०,००० | ३,७८,३२,००० |

२) जमीन महसूल वाढीव उपकर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५५ नुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदाना वाढीय उपकर अनुदानाच्या रूपाने वाटप केला जातो. सदरचा उपकर १ रूपया जमीन महसुलावर रू.५/- इतका असतो. तर याच उपकराच्या एकूण ५ रूपयावर ८ रूपये या प्रमाणात सापेक्ष अनुदान देखील उपलब्ध करून दिले जाते. तसेच ५ रूपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावर व ५ ते १० रूपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसूलावर जो वाढीव उपकर असतो तो देखील संबंधित जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला जातो. याचे वाटप करतांना जिल्हा परिषदा व पंचायत समिती यांच्यामध्ये ४०:६०या प्रमाणात वाटप केले जाते. मुख्य लेखाशीर्ष ३६०४ अंतर्गत जमीन महसूल वाढीव उपकर अनुदानापोटी विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज, मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष वितरीत निधी याबाबतची तीन वर्षातील माहिती पुढीलप्रमाणे आहे.

लेखाशीर्ष ३६०४०४७९ (जमीन महसूल वाढीव उपकर)

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | राज्य | राज्य | | अहमदनगर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज | मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद | वित्त विभागाद्वारे प्रत्यक्ष वितरीत निधी | मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद | वित्त विभागाद्वारे प्रत्यक्ष वितरीत निधी |
| १ | २०२१-२२ | १७७,२०,४६,००० | १७६,२८,६१,००० | १३२,२१,४५,७५० | ५,१२,४५,००० | ३,८४,३३,७५० |
| २ | २०२०-२१ | १९१,५२,८८,८४२ | १७६,२८,६१,००० | ० | ५,१२,४५,००० | ० |
| ३ | २०१९-२० | १७६,२८,६१,००० | १७६,२८,६१,००० | १४१,०२,८८,७०७ | ५,१२,४५,००० | ४,०९,९६,००० |

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५८ अंतर्गत जिल्हा परिषदेच्या कक्षेतील ज्या स्थावर मालमत्तेची विक्री देणगी , फलोपभोग व गहाण दस्तऐवजावर मुद्रांक अधिनियमांन्वये जे मुद्रांक शुल्क आकारले जाते त्या शुल्कात १ टक्के वाढ करण्यात आलेली आहे.ही वाढ करण्यात आलेली जी रक्कम आहे.ती रक्कम मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रूपाने सर्व जिल्हा परिषदांना वितरीत केली जाते.जिल्हा परिषदांना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानाचा तपशील नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होतो.त्या तपशिलानुसार वित्त विभागाकडून अनुदान प्राप्त होते.सदरचे अनुदान जिल्हा परिषद व संबंधित ग्रामपंचायत यांच्यामध्ये ५०/५० टक्के वाटप केले जाते. मुख्य लेखाशीर्ष ३६०४ अंतर्गत मुद्रांक शुल्क अनुदानापोटी विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज, मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष वितरीत निधी याबाबतची तीन वर्षातील माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**लेखाशीर्ष ३६०४०३०७ (जिल्हा परिषदांना देय असलेले १% मुद्रांक शुल्क अनुदान)** (रक्कम कोटींमध्ये)

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | विभागाद्वारे कळविण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज | मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद | वित्त विभागाद्वारे प्रत्यक्ष वितरीत निधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | राज्य | राज्य | अहमदनगर |
| १ | २०२१-२२ | ७८६.५८ | ७६०.०० | ५७०.०० | १४.०५१२ |
| २ | २०२०-२१ | १३६९.३४ | ७६०.०० | १९०.०० | ५.००७५ |
| ३ | २०१९-२० | - | ७६०.०० | ६०८.०० | १३.९६७१ |

४) लेखाशीर्ष ३६०४०३०७ अंतर्गत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचा सोबत जोडलेल्या अहवालानुसार, सन २००९-१० ते सन २०२०-२१ या वर्षातील जिल्हा परिषद १% मुद्रांक शुल्काचा जिल्हानिहाय थकीत मुद्रांक शुल्क अनुदानापोटी एकूण रु. १२८४.६५ कोटी (रुपये बाराशे चौऱ्यांशी कोटी पासष्ट लक्ष फक्त) इतकी तरतूद सर्व संबंधित जिल्हा परिषदांना उपलब्ध करण्यासाठी विभागास

वितरीत करण्याबाबत, नस्ती क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३०/वित्त-३ वरील अनौपचारिक संदर्भाद्वारे वित्त विभागास विनंती करण्यात आली होती. तसेच, सदर थकीत अनुदानासाठी नस्ती क्र. पूरक-२०२१/प्र.क्र.६५/वित्त-३ अन्वये हिवाळी अधिवेशनात मांडण्यासाठी रु. १२८४.६५ कोटी ची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. परंतु, सन २०२१-२२ या वर्षातील वितरीत तरतूद ७५% पेक्षा कमी खर्ची पडल्याने सदर पुरवणी मागणी वित्त विभागाद्वारे नाकारण्यात आली.

५) उपरोक्त नमूद असल्याप्रमाणे विभागातर्फे कळविण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अंदाज व मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी प्रमाणात वित्त विभागाकडून जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क अनुदान वितरीत करण्यात येते. त्यामुळे अनुदान थकीत राहते. विभागास वितरीत करण्यात आलेले अनुदान संपूर्णपणे संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात येते.

६) वित्त विभागाद्वारे सुधारित अंदाजाद्वारे जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर तथा मुद्रांक शुल्कापोटी अतिरिक्त निधी प्राप्त झाल्यास सदर निधी संबंधित जिल्हा परिषदेस वितरीत करण्यात येईल.

सोबत: वरीलप्रमाणे.

आपला,

(पो. द. देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१) अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे स्वीय सहायक.

२) कक्ष अधिकारी, पं.रा.-५, ग्रामविकास विभाग, मुंबई.

३) निवडनस्ती, कार्यासन वित्त-३, ग्रामविकास विभाग, मुंबई.

प,

नोंदणी महनिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकिय ईमारत, दुसरा मजला, विधान भवनासमोर, पुणे.
दुरध्वनी- 020-2641082 e-mail: deputydiraccs@gmail.com

क्र.का.7/लेखा/जि.प./अर्थसंकल्प/695/2021. दि.7/09/2021.

प्रति,

सचिव, (वित्त-3)
महाराष्ट्र शासन,
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,25,मर्झबान पथ,फोर्ट,
मुंबई-400001.

विषय- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-1961 च्या कलम-158 अन्वये जिल्हा परिषदांना 1% मुद्रांक शुल्क सन 2009 ते 2021 या कालावधीचे थकित अनुदान बाबत.

उपरोक्त विषयांकीत बाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-1961 च्या कलम-158 अन्वये सन 2009-10 ते 2020-21 या कालावधीतील थकीत जिल्हा परिषद 1% मुद्रांक शुल्क अनुदानाबाबत राज्यातील जिल्हा परिषदांकडुन विकासात्मक योजना राबविणेसाठी व योजना अमंलबजावणीसाठी वारंवार अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येत आहे. उक्त कालावधीची जिल्हा परिषद निहाय प्रत्यक्ष वसुल झालेली मुद्रांक शुल्क रक्कम, वितरीत केलेली अनुदान रक्कम व वितरीत करण्यावर शिल्लक मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम यांची विवरणपत्रे सोबत सादर करण्यात येत आहेत.

सबब सन 2009-10 ते 2020-21 या कालावधीतील जिल्हापरिषदांना देय असलेले 1% जिल्हा परिषद मुद्रांक शुल्क अनुदान आपले स्तरावरुन परस्पर वितरीत होणेस विनंती आहे.

सोबत- जि.प.मुशु विवरणपत्रे पृष्ठे(3)

(श्रावण हर्डीकर)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे.

का-मत. 24/08/2021

प्रत:- कार्यासन अधिकारी(वित्त-3), महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,25,मर्झबन पथ,फोर्ट,मुंबई-400001 यांना पुढील उचीत कार्यवाहीस्तव.

# जिल्हा परिषदेला (1% मुद्रांक शुल्क)प्रत्यक्ष वसूलीनुसार देय रक्कमेचे विवरणपत्र

कालावधी एप्रिल 2009 ते मार्च 2021 (रक्कम हजारात)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | प्रत्यक्ष वसूलीनुसार देय वर्ष | | | | | | | | | | | | एकूण वसुली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | |
| 1 | ठाणे | 242027 | 318959 | 468338 | 795963 | 945510 | 850667 | 835806 | 512480 | 416585 | 587095 | 694939 | 531018 | 7199387 |
| 2 | पालघर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 212272 | 221066 | 222137 | 327224 | 285683 | 250164 | 1518526 |
| 3 | रायगड | 501106 | 532687 | 819239 | 978934 | 1143452 | 1128018 | 1275855 | 1298987 | 1066064 | 1065499 | 1062859 | 935405 | 11808105 |
| 4 | रत्नागिरी | 31663 | 31663 | 43719 | 64380 | 78675 | 81488 | 93448 | 84769 | 77623 | 106222 | 99904 | 72191 | 865645 |
| 5 | सिंधुदुर्ग | 29202 | 19368 | 31384 | 33378 | 56035 | 54305 | 45459 | 57797 | 46287 | 63209 | 45797 | 42403 | 514574 |
| 6 | पुणे | 993476 | 1044222 | 1341404 | 1499929 | 1670641 | 1698414 | 2474263 | 2162206 | 2574419 | 2695166 | 2513064 | 2348884 | 23216068 |
| 7 | सातारा | 80238 | 81916 | 121832 | 174841 | 198669 | 220781 | 201495 | 224252 | 203570 | 228550 | 215724 | 180419 | 2132187 |
| 8 | सांगली | 24630 | 31974 | 36303 | 58409 | 63612 | 83322 | 71149 | 83666 | 84409 | 93582 | 107111 | 103928 | 841997 |
| 9 | कोल्हापूर | 43250 | 47821 | 67488 | 83706 | 90157 | 108908 | 103740 | 106389 | 103040 | 136457 | 155924 | 164748 | 1210608 |
| 10 | सोलापूर | 45016 | 57968 | 76874 | 95816 | 116607 | 121689 | 120116 | 125544 | 176066 | 220246 | 189747 | 208866 | 1553580 |
| 11 | नाशिक | 101377 | 96295 | 167834 | 213447 | 212564 | 206636 | 159039 | 187787 | 149181 | 177550 | 186495 | 214102 | 2062277 |
| 12 | अहमदनगर | 77607 | 79778 | 115774 | 140030 | 127123 | 134616 | 145692 | 148998 | 152213 | 162936 | 178037 | 187842 | 1650844 |
| 13 | जळगांव | 45888 | 61120 | 69731 | 104481 | 101463 | 93605 | 92661 | 109519 | 75976 | 109066 | 112836 | 107740 | 1073877 |
| 14 | धुळे | 16430 | 19354 | 30751 | 38023 | 40445 | 32796 | 42923 | 36924 | 37285 | 39673 | 42347 | 32420 | 409371 |
| 15 | नंदुरबार | 9192 | 11073 | 13301 | 15865 | 14795 | 16373 | 19345 | 20448 | 18302 | 20531 | 28811 | 23688 | 211424 |
| 16 | औरंगाबाद | 55290 | 65736 | 95195 | 110889 | 103808 | 141139 | 198830 | 182560 | 162736 | 187476 | 224848 | 207535 | 1716041 |
| 17 | जालना | 23400 | 24869 | 35582 | 40010 | 46335 | 53216 | 68704 | 63721 | 56859 | 66139 | 86264 | 73087 | 625966 |
| 18 | बीड | 37190 | 47634 | 53946 | 64046 | 63081 | 82582 | 77264 | 86919 | 74848 | 99710 | 100775 | 95085 | 872980 |
| 19 | लातूर | 31390 | 32291 | 46566 | 57295 | 47355 | 47739 | 58097 | 62648 | 59451 | 74503 | 81509 | 84730 | 663574 |
| 20 | नांदेड | 38297 | 42380 | 41347 | 53814 | 54060 | 67649 | 68821 | 74042 | 69351 | 82965 | 86927 | 94452 | 760105 |
| 21 | परभणी | 14695 | 15230 | 19738 | 24179 | 28766 | 32112 | 38999 | 53725 | 35123 | 45234 | 58336 | 47170 | 413306 |
| 22 | उस्मानाबाद | 18732 | 20860 | 25797 | 29884 | 32237 | 37936 | 42438 | 45315 | 45189 | 62832 | 60154 | 54788 | 466182 |
| 23 | हिंगोली | 9580 | 10362 | 15443 | 21013 | 18274 | 25367 | 23793 | 23200 | 24289 | 31503 | 33539 | 34382 | 272745 |
| 24 | अमरावती | 47725 | 50989 | 47362 | 65453 | 80957 | 89811 | 75268 | 83526 | 104452 | 111743 | 129416 | 112783 | 979487 |
| 25 | यवतमाळ | 34281 | 41463 | 64780 | 76990 | 77401 | 81834 | 21311 | 28036 | 68939 | 72280 | 86003 | 83866 | 727183 |
| 26 | अकोला | 18728 | 20155 | 66695 | 51156 | 60212 | 71831 | 65955 | 61210 | 54110 | 47909 | 54088 | 50240 | 612289 |
| 27 | बुलढाणा | 28608 | 33183 | 47193 | 64305 | 78014 | 78287 | 81238 | 81893 | 82873 | 96988 | 87361 | 93754 | 863697 |
| 28 | वाशिम | 8860 | 9722 | 17459 | 20268 | 24285 | 29095 | 26733 | 27641 | 34448 | 45572 | 37170 | 42548 | 323801 |
